# माणूस

शनिवार । १० जानेवारी १९७६ । एक रुपया

मानवाच्या सर्वांत हीन प्रवृत्तीचा संघटित आविष्कार हे फाशीच्या शिक्षेचे वास्तव स्वरूप. ते नाकारल्यामुळे होणारे समाधान हा सद्सद्विवेकबुद्धीच्या टोचणीवर फारच तात्पुरता उपाय आहे.... ( पृष्ठ २ )

## साप्ताहिक माणूस

**वर्ष पंधरावे – अंक : एकतिसावा**

**१० जानेवारी १९७६**

**मूल्य : एक रुपया**

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
◻
वार्षिक वर्गणी : छत्तीस रुपये
सहामाही वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : पंचावन्न रुपये
◻


प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.


◻
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
◻
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
◻
दूरध्वनी : ४३४५९
◻


फिरोज दारूवाला व दोघे नक्षलवादी यांना झालेल्या फाशीच्या शिक्षेच्या निमित्ताने लिहिलेला लेख...

# फासावरील न्याय !

सतीश कामत

फाशीच्या शिक्षेची अपरिहार्यता हा वादाचा विषय आहे याची मला कल्पना नव्हती असे नाही; परंतु या शिक्षेला असलेला विरोध केवळ 'नैतिक भूमिकेतून उच्च मानवी भावनांना केलेले आवाहन' अशा स्वरूपाचा असला पाहिजे, असाच ग्रह होता. आल्बेर कामू यांची Outsider ही कादंबरी वाचताना फाशी जाणाऱ्या कैद्याच्या भयंकर मानसिक यातनांची प्रथमच जाणीव झाली. तरीही अशा शिक्षेची 'व्यावहारिक उपयुक्तता' हाच मुळात मतभेदाचा मुद्दा असू शकेल, असे माझ्या मनातही आले नाही. सुदैवाने कामू यांचाच Reflections on Guillotine हा निबंध वाचायला मिळाला आणि कधी नव्हे इतके अपराधी वाटू लागले. Koestler यांचे Reflections on hanging वाचून तर खात्री पटली की फाशीची उपयुक्तता हा आज वादाचा विषय उरलेला नाही ! ती निरुपयोगी आहे हे वादातीतपणे सिद्ध झालेले आहे ! फाशीच्या शिक्षेचे वास्तव स्वरूप एकदा माहीत झाल्यावर ती रद्द करणे आपल्या हाती नाही ही खंत मला असह्य होऊ लागली. अशीच खंत इतरांच्याही मनात निर्माण व्हावी, या किमान अपेक्षेने प्रस्तुत लेख लिहीत आहे.

अज्ञान, परंपरेने चालत आलेल्या गोष्टीची उपयुक्तता गृहीत धरण्याची सहज प्रवृत्ती आणि माणसात दबलेली क्रूरवृत्ती यापुढे 'बेकायदेशीर खुनावरील एकमेव उतारा म्हणजे कायदेशीर खून होय' या वर्षानुवर्षाच्या शिकवणुकीमागील विसंगती जाणवली तरच नवल ! फाशी म्हणजे नेमके काय हे आपल्याला माहीत नसते. केवळ सवयीने आपण फाशीच्या सजेवर शिक्कामोर्तब करून मोकळे होतो. हे करताना आपल्या मनात खळबळ माजत नाही. किंबहुना विचार करण्यासारखी ही बाब आहे असे मुळी आपल्या मनात येतच नाही. कारण फाशीची प्रथा दुःखद असेल, तरीही ती आवश्यक आहे अशी आपली धारणा आहे. अशा गुन्हेगाराची हत्या करणे 'समर्थनीय' आहे. कारण ते आवश्यक आहे आणि यावर अधिक चर्चा, चिकित्सा नको. कारण हा सारा प्रकार एकूण दुर्दैवी, दुःखद आहे ! फाशीच्या शिक्षेकडे पाहण्याचा आपला हा दृष्टिकोन आणि सत्ताधाऱ्यांची सोय परस्परांना पूरक असल्यामुळे ही अमानुष प्रथा माणसाच्या सांस्कृतिक, वैचारिक इ. प्रगतीशी संघर्ष येऊ न देता टिकून राहिली आहे ! ही शिक्षा आपल्या, म्हणजे जनतेच्या वतीने दिली जाते तेव्हा तिचे स्वरूप समजून घेणे ही आपली किमान जबाबदारी आहे...

मृत्युदंडाच्या समर्थनार्थ करण्यात येणारा युक्तिवाद सामान्यपणे असा :

(१) या शिक्षेची भावी गुन्हेगाराला 'जरब बसविण्याची क्षमता (deterent value) केवळ अतुलनीय आहे. गुन्हेगाराचे आयुष्य कायद्याने अकाली संपुष्टात आणले जाते, ते केवळ त्याला त्याच्या गुन्ह्याचे शासन होते म्हणून नव्हे, तर हे भयंकर उदाहरण भविष्यात इतरांना गुन्हे करण्यापासून परावृत्त होण्यास प्रेरक ठरते म्हणून होय.

(२) या शिक्षेला पर्याय नाही.

सुरुवातीला आपण पहिल्या मुद्द्याचा विचार करू. विरोधी बाजूला पूर्ण न्याय देण्यासाठीच मानवतावादी, भूतदयावादी भावना तात्पुरत्या बाजूला ठेवू आणि निव्वळ तर्क आणि अनुभवाने सिद्ध झालेले पुरावे या निकषावर फाशीची भावी खुन्यांना जरब बसविण्याची क्षमता तपासून पाहू.

जन्मठेपेच्याही नव्हे तर केवळ फाशीच्याच भयाने खुनापासून परावृत्त होणारे गुन्हेगार कोण असू शकतात...

खून प्रत्यक्ष घडला आहे, अशा सर्वच प्रसंगी फाशीची शिक्षा गुन्हेगाराच्या मनात दहशत निर्माण करू शकलेली नाही यावर वाद नसावा. जे खून करून नंतर आत्महत्या करतात, त्यांनाही मृत्युदंडाची भीती गुन्ह्यापासून परावृत्त करू शकत नाही. वेडे, मानसिक घडी बिघडलेले किंवा मद्याच्या नशेत क्षणिक क्रोधाच्या भरात खून करणारे यापैकी कोणावरही फाशीची जरब परिणामकारक ठरू शकत नाही. असे खून सरासरी ८० ते ९०% असतात. काहींची खून करण्यामागील प्रेरणाच मुळी फाशी जाणे ही असते–आणि आश्चर्य वाटेल, हे प्रमाणही दुर्लक्षणीय नाही. काहींचा आपल्या खुनाच्या पद्धतीच्या निर्दोषतेवर इतका विश्वास असतो की आपला गुन्हा उघडकीस येऊ शकेल ही कल्पनाही ते करू शकत नाहीत. अर्थात फाशीचे भय त्यांच्या कृती नियंत्रित करू शकत नाहीत. उरला एकच गट. व्यावसायिक गुन्हेगारांचा. पुरावा असा आहे की व्यावसायिक गुन्हेगार खुनाकडे क्वचितच वळतात.

ही 'वस्तुस्थिती' फाशीचे समर्थकही मान्य करतात; परंतु मृत्युदंडाची deterent म्हणून उपयुक्तता संशयास्पद आहे, हा निष्कर्ष त्यांना मान्य नाही. 'आज अशी परिस्थिती आहे खरो.. पण फाशीच्या शिक्षेचे भय नाहीसे केले तर हा वर्ग निश्चितच खुनाकडे वळेल आणि या गुन्ह्याचे प्रमाण वाढेल, हा युक्तिवाद त्यांना अधिक समाधानकारक वाटतो.

वस्तुत: हे स्पष्टीकरण नसून केवळ सोयिस्कर असे गृहीत आहे, आहे. हे सिद्ध करणारे अनेक पुरावे Koestler यांनी दिलेले आहेत. आवश्यक ते निष्कर्ष संक्षेपाने पुढीलप्रमाणे :

(१) १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात चोरीसारख्या सौम्य गुन्ह्यांना फाशीची शिक्षा होती, तो आज रद्द करूनही या गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ झालेली नाही किंवा आजच्या तुलनेत त्या काळातील अशा गुन्ह्यांचे प्रमाण कमी नव्हते.

(२) सर्वस्वी भिन्न परिस्थितीतल्या, भिन्न संस्कृती असलेल्या ज्या अनेक देशांनी (१९५५ मध्ये ३६ देश) खुनासाठी फाशीची शिक्षा रद्द केली आहे, त्या सर्वांचा अनुभव एकच आहे :

'...फाशीची शिक्षा रद्द केल्यामुळे कोठेही गुन्ह्यांच्या प्रमाणात वाढ झालेली नाही किंवा अन्य लक्षणीय दुष्परिणाम घडून आलेले नाहीत.'

(३) ज्या देशात फाशीची शिक्षा अस्तित्वात नाही व जेथे ती अजूनही वापरात आहे, अशा देशांतील गुन्ह्यांच्या प्रमाणाचा तुलनात्मक अभ्यास करून ब्रिटिश रॉयल कमिशनने पुढील निष्कर्ष काढला: 'These rates are conditioned by other factors than the death penalty.'

मला वाटते हे पुरावे फाशीची deterent म्हणून असमर्थता वादातीतपणे सिद्ध करतात. अर्थात ही वस्तुस्थिति वाटते तेवढी आश्चर्यकारक तर नाहीच उलट अपेक्षित आहे, हे पुढे दिसून येईल.

'फाशीच्या शिक्षेचे महत्त्वाचे उद्दिष्ट 'गुन्हेगाराला शासन' एवढेच नसून भावी गुन्हेगारांवर त्यांचे भवितव्य उदाहरणाने ठसविणे हे आहे.' हा फाशीच्या समर्थकांचा दुसरा आवडता मुद्दा; परंतु हा फाशीच्या Exemplary value वरील विश्वास खरा मानायचा तर उदाहरण मनावर बिंबविण्यासाठी जाहीरपणे फाशी द्यायला हवी, ही अपेक्षा रास्त ठरते. हे 'उदाहरण' अधिक परिणामकारक व्हावे म्हणून प्रचाराच्या सर्व माध्यमांतून कैद्याला येणाऱ्या भयंकर मृत्यूची प्रसिद्धीही करायला हवी; परंतु प्रत्यक्षात मात्र हे कार्य जेव्हा भल्या पहाटे निवडक लोकांसमोर, तुरुंगाच्या आड, समाजाच्या साखरझोपेतही व्यत्यय येणार नाही अशा प्रकारे उरकले जाते, तेव्हा फाशीच्या समर्थकांचा तिच्या 'उदाहरणात्मक मूल्यावरील' विश्वास संशयास्पद वाटू लागतो. ज्या काळात फाशीची शिक्षा शक्य तितक्या प्रसिद्धीनंतर व समारंभपूर्वक दिली जात असे, त्या काळात तरी ती कितपत परिणामकारक होती ? पुढील दोन उदाहरणे मोठी बोलकी आहेत.

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला इंग्लंडमध्ये ज्या २५० गुन्हेगारांना फाशी देण्यात आले, त्यापैकी १७० गुन्हेगारांनी पूर्वायुष्यात किमान एकदा तरी जाहीरपणे दिलेली फाशी पाहिली होती. १८८६ साली हाच आकडा १६७ पैकी १६० असा होता.

ज्या काळात खिसेकापूंना फाशी दिले जात असे, त्या काळी हा समारंभ पाहण्यास रंगलेल्या गर्दीत खिसेकापू आपले हस्तलाघव दाखवीत असत. प्रत्यक्ष सुळावर चढविण्याचा क्षण हा धंद्याला सर्वात योग्य. कारण त्या वेळी सर्वांची नजर वर, सुळाकडे लागलेली असते, हे त्यांचे अनुभवाचे बोल !...ही वस्तुस्थिती वरवर पाहता आश्चर्यकारक वाटते; परंतु मानवी स्वभावातील गुंतागुंतीचे भान ठेवले तर ती तेवढी अनाकलनीय राहात नाही.

माणूस सर्वांत घाबरतो मृत्यूलाच, हे नाकारण्यात अर्थ नाही. त्यामुळे फाशीची शिक्षा ही सर्वांत परिणामकारक ठरावी ही अपेक्षा साधार आहे; परंतु कायद्याचे तर्कशास्त्र हे नेहमीच मानवी स्वभावापेक्षा सोपे, सुसंगत असते. मृत्यूचे भय ही जितकी वस्तुस्थिती आहे, तितकीच हे भय उत्कट मानवी भावनावेगावर मात करण्यात वेळोवेळी अपयशी ठरले आहे, हीही एक वस्तुस्थिती आहे. बेकनने म्हटल्याप्रमाणे, 'There is no passion so weak that it can not confront and overpower fear of death.' स्वातंत्र्यलालसा किंवा देशप्रेम मृत्यूच्या भयावर मात करू शकतात हा आपला अनुभव आहे. हीच किमया पराकोटीचा क्रोध, तिरस्कार, द्वेष किंवा सूडाची आग करू शकत नाही, हे कसे शक्य आहे ? मानवी स्वभावातील गूढ इतक्यावरच उलगडत नाही. जीवनाची आसक्ती ही मानवाची जितकी मूलभूत प्रवृत्ती आहे, तितकीच मृत्यूची ओढ ही देखील आहे. म्हणूनच 'जिवंत राहणे' ही एकच प्रवृत्ती मानवाच्या प्रत्येक कृतीची प्रेरणा ठरावी ही अपेक्षा व्यर्थ ठरते. ज्या वेळी आत्मक्लेशाची किंवा स्वत:लाच नष्ट करून टाकण्याची विचित्र ओढ अधिक प्रभावी ठरते त्या वेळी फाशीच्या शिक्षेचे भय वाटण्याऐवजी आकर्षण वाटू लागते.

मानवी स्वभावातील हे वैचित्र्य समजून घेतले तर 'फाशीच्या शिक्षेचा व गुन्हेगारीच्या प्रमाणाचा काहीही संबंध नाही' या वर उल्लेखिलेल्या निष्कर्षाचे समाधानकारक स्पष्टीकरण मिळते.

मृत्युदंडाचे समर्थक ही आकडेवारी अमान्य करीत नाहीत; परंतु त्यावरून काढलेला निष्कर्ष मात्र त्यांना एकांगी वाटतो ! कारण

त्यांच्या मते, “ … फाशीच्या दहशतीमुळे किती जणांनी गुन्हा करण्याचा आपला विचार बदलला हे जाणून घेणे अशक्यच ! अर्थात् फाशीची शिक्षा exemplary नाही हे निर्विवादपणे सिद्ध होत नाही ! ” याचा अर्थ इतकाच की कधी ना कधी एक तरी व्यक्ती फाशीच्या भयाने खून करण्यापासून परावृत्त होईल, अर्थात् कोणाच्याही नकळत आणि फाशीच्या शिक्षेची उपयुक्तता सिद्ध करील, या आशेवर फाशीचे समर्थक ही अमानुष प्रथा चालूच ठेवणार ! या आशेला आधार फक्त जी पडताळून पहाणेच मुळी अशक्य अशी ‘ शक्यता ! ’

प्रामाणिकपणे कबुली द्यायची तर यालाच ‘ सूड ’ म्हणतात !

‘ जशास तसे ’ हा न्याय (Law of Retaliation) हा सूडाच्या प्रेरणेशी निगडित आहे. या संकल्पनेचा उगम जंगलातील मानवाइतका प्राचीन आहे. आपल्यावरील अन्यायाविरुद्ध आदिमानवाच्या झालेल्या नैसर्गिक प्रतिक्रियेला केवळ व्यक्तिगत स्वरूप न येता त्या समाजात मान्यता व कायद्याचे स्थान मिळावे, एवढेच त्याचे उद्दिष्ट; सूडप्रवृत्ती जोपासणे किंवा तिला प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हे नव्हे. खून जर माणसाच्या रक्तातच असेल तर या कायद्याचे उद्दिष्ट ही प्रवृत्ती बळावण्यास हातभार लावणे हे नसून, ती सुधारण्याचा प्रयत्न करणे हे आहे. ‘ जशास तसे ’ हे असंस्कृत तत्त्वही फाशीच्या तुलनेत न्याय्यच ठरते. कारण त्यात गुन्ह्याची ‘ भरपाई ’ व्हावी एवढेच प्रायःश्चित्त अभिप्रेत असते; त्यापेक्षा अधिक शिक्षा अन्याय्य समजली जाते.

गुन्हेगाराच्या कृत्यामुळे समाजाच्या निरपराध घटकाचा जाणूनबुजून मृत्यू घडून येतो. त्याची भरपाई गुन्हेगाराचा मृत्यू घडवून आणल्यामुळे होते. फाशीची शिक्षा ‘ जशास तसे ’ न्यायाशी सुसंगतच आहे ’ असे जेव्हा आपण समजतो तेव्हा त्यात तथ्य किती आणि केवळ वैचारिक जडतेमुळे केलेली स्वतःची फसवणूक किती, याचा शोध उद्बोधक ठरावा. एकदोन दिवस नव्हे तर महिनोनुमहिने शरीर आणि मन उद्ध्वस्त, पार खच्ची करून टाकणारे भय ही मृत्यूपेक्षा असह्य अशी शिक्षा आहे. दयेचा अर्ज मान्य होण्याची शक्यता जगण्याची ओढ अधिकच वाढविते. मृत्यूपासून सुटका होण्याची आशा आणि दुसऱ्याच क्षणी मृत्यूच्या निकटतेची जीवघेणी जाणीव,या मानसिक छळाची अमानुषता शब्दापलीकडची आहे. मृत्यूची अनिश्चितता आणि जिवंत राहण्याची ओढ यांचा सततचा संघर्ष या दुर्दैवी माणसातील सारे चैतन्य, सजीवपणा शोषून घेतो. हा ‘ मृत्यू ’ नंतरच्या लौकिक मृत्यूपेक्षा भयानक असतो. आपले अस्तित्व नकोशा झालेल्या समाजाच्या हिंस्र एकजुटीपुढे अगतिक झालेला, एकटेपणाच्या जाणिवेमुळे आणि आत्यंतिक भयामुळे निस्त्राण झालेला कैदी जेव्हा मृत्यूला सामोरा जातो, तेव्हा आमच्या समाजाच्या सुसंस्कृततेचा, वैचारिक प्रगतीचा आणि मानवतावादाचा दावा फार पोकळ, उद्दामपणाचा वाटू लागतो. एका मृत्यूला कारणीभूत झाल्याबद्दल दोन मृत्यूंची शिक्षा देणाऱ्या प्रगत न्यायसंस्थेच्या तुलनेत, ‘ जशास तसे ’ हे तत्त्व अधिक मानवी व न्याय्यही वाटते. त्या संस्कृतीतही हा न्याय एक पूर्णपणे निरपराधी आणि दुसरा पूर्णपणे अपराधी अशा दोघातच लागू होता. आज बळी गेलेला जरी पूर्णपणे निरपराधी मानला तरी त्याच्या वतीने अपराध्याला प्रायश्चित्त घ्यायला लावणारा समाज गुन्ह्याच्या संदर्भात आपण पूर्णपणे निरपराधी आहोत असा दावा करू शकत नाही. ज्या गुन्हेगाराला तो इतक्या निर्दयपणे शासन करतो, तो ‘ घडविण्याची ’ जबाबदारी अंशतः का होईना, तो नाकारू शकत नाही. ‘ मानवाच्या सर्वांत हीन प्रवृत्तीचा संघटित आविष्कार ’ हे फाशीच्या शिक्षेचे वास्तव स्वरूप. ते नाकारल्यामुळे होणारे समाधान हा सदसद्विवेकबुद्धीच्या टोचणीवर फारच तात्पुरता उपाय आहे !

फाशीची शिक्षा ही एकच अशी शिक्षा आहे की जी अपरिवर्तनीय आहे. अपरिवर्तनीय शिक्षेत न्यायपद्धतीची निर्दोषता गृहीत आहे. चुका हा मानवाचा स्वभाव मानला तर न्याय-यंत्रणेच्या निर्दोषतेवरील श्रद्धा हा अप्रामाणिकपणा ठरतो आणि एकदा ही ‘ चूक होण्याची शक्यता ’ वस्तुस्थिती म्हणून मान्य असली की झालेली चूक उमजूनही ती सुधारण्याची संधी नाकारणारी कोणतीही शिक्षा असमर्थनीय म्हणावी लागते. चूक होण्याची शक्यता हे केवळ युक्तिवादासाठी धरलेले गृहीत किंवा कल्पना नव्हे. Koestler यांच्या Rfleections on hanging आणि Scot यांच्या History of Capital Punishment या पुस्तकांत अशा चुकांचे ‘ बळी ’ झालेल्या दुर्दैवी गुन्हेगारांची अनेक उदाहरणे आहेत. विशेषतः रोलंडची केस वाचून मन सुन्न होते. १८६० साली एका कायदेपंडिताने संख्याशास्त्राचे नियम लावून असा निष्कर्ष काढला की फाशी गेलेल्या २५७ व्यक्तींमागे किमान एक निरपराध व्यक्ती फाशी जाते. वरवर पाहता हे प्रमाण दुर्लक्षणीय वाटेलही; परंतु ते इतर शिक्षांच्या संदर्भात ! फाशीच्या शिक्षेचे स्वरूप लक्षात घेतले तर हे प्रमाण अमर्यादच मानले गेले पाहिजे. शिवाय एकदा माणूस मृत झालेला असला की त्याचे निरपराधित्व सिद्ध होणे जवळजवळ अशक्यच. कारण निरपराधित्व सिद्ध करण्याची जबाबदारी बचावपक्षाची आणि ज्यासाठी इतका अट्टाहास करायचा तो तर आधीच फाशी गेलेला : न्यायदानातील चुका उघडकीला येणे हे जितके अशक्य, तितकी फाशी गेलेल्या परंतु चूक उघडकीस येऊ न शकलेल्या निरपराध्यांची संख्या आज आपण मानतो त्यापेक्षा अधिक असण्याचा संभव जास्त ! आपल्या चुकांचा पाठपुरावा करतानाची आपली एकजूट कौतुकास्पद असली तरी तिचा वापर समर्थ अशा न्याययंत्रणेच्या चुकांवर पांघरूण घालण्यासाठी व्हावा, असहाय कैद्याचा मात्र तिच्यावर अधिकार असू नये ही विसंगती आपल्या न्यायबुद्धीचे द्योतक नाही.

एखाद्या व्यक्तीचे तिच्या हयातीत अंतिम मूल्यमापन करून तिच्यावर ‘ जिवंत ठेवण्यास (कायमचा) नालायक ’ असा शिक्का मारणे, म्हणजे पुढील आयुष्यात संधी दिली तरी कैदी सुधारण्याची शक्यता नाही हे आपणच ठरविणे ! यामुळे कदाचित आपले सार्वभौमत्व सिद्ध होतही असेल; परंतु पात्रता नव्हे. हा अधिकार आपल्याला नाही. ‘ Without absolute innocence, there is no supreme judge ” स्वतःला सुधारण्याची संधी उपलब्ध करून देणारा जिवंत राहण्याचा हक्क हा प्रत्येक सजीवाचा मूलभूत अधिकार मानला गेला पाहिजे. न्यायदानातील मानवी चुकांची शक्यता आपण पूर्णपणे टाळू शकत नाही; शंभर टक्के निरपराधित्वाचा दावाही करू शकत नाही, ही वस्तुस्थिती जर नम्रपणे समजून घेतली तर फाशीच्या जागी ‘ जन्मठेप ’ ही तडजोड म्हणून स्वीकारायला हरकत असू नये.

# मुक्काम पुणे

प्रकाश जोशी

## स्वच्छता मोहीम

सुंदर पुणे, स्वच्छ पुणे हे घोषवाक्य आता जुने झाले आहे. आपल्याला स्वच्छ व्हायला, सुंदर व्हायला अजून किती अवकाश आहे हे मधूनमधून लक्षात आणून देण्याचं काम हे वाक्य करून देत असतं.

कुठं तरी कोणी तरी वैतागून का होईना स्वच्छता–मोहीम हाती घेतं, सभा–समारंभ होतात, सुंदर व स्वच्छ पुणे-घोषणेची सर्वांना आठवण होते. महापालिकेचे पदसिद्ध अधिकारी नगरसेवक यांना या घोषवाक्याचे महत्त्व किती पटलं आहे हे त्यांच्या भाषणावरून लक्षात येतं, कुठल्या तरी कॉलेजच्या नॅशनल सर्व्हिस स्कीमचे विद्यार्थी आलेले असतात. ते खरोखरीच मनापासून स्वच्छता-मोहीम राबवितात. जागा साफ–स्वच्छ होते, सुंदर दिसते. आपला आपल्यालाच अभिमान वाटतो. काही दिवस जातात. तुम्ही विसरता, आम्ही विसरतो आणि परत ये रे माझ्या मागल्या !

'सुंदर पुणे स्वच्छ पुणे' ही कल्पना प्रत्यक्षात आणण्याचा चंग पालिकेच्या स्थायी समितीचे अध्यक्ष हनुमान अमराळे यांनी बांधला आहे. मागील अनुभवावरून निराश न होता त्यांनी एक मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेत विविध पेठांतील नादुरुस्त संडास, मुताऱ्यांची डागडुजी, फुटलेल्या वॉटर आणि ड्रेनेज लाइन्सची दुरुस्ती, कचरापेट्यांतील कचऱ्याची वेळोवेळी विल्हेवाट लावणे अशा योजनांचा समावेश असल्याचे त्यांनी एक सुंदर पत्रक काढून जाहीर केले आहे.

ही स्वच्छतेची तरतूद. शहर सुंदर दिसावं, वातावरण प्रसन्न असावं तर ठिकठिकाणी रस्त्यांच्या कडेकडेने वनस्पती हवी. सिमेंट-कॉंक्रीटच्या इमारती उठविण्याच्या नादात व ऑक्टोपससारख्या चारी अंगांनी विविध दिशांना पसरत चाललेल्या पुण्याच्या उपनगरांनी एके काळी गर्द झाडांच्या कुशीत वसलेल्या सुंदर पुण्याला पार उघडंबोडकं करून टाकलं आहे. त्यामुळे वृक्षारोपणाचा कार्यक्रम हाती घेण्याची नितांत आवश्यकता. ही आवश्यकता पालिकासदस्यांना एकदम मान्य; पण करणार काय? त्यांचाही नाइलाज झालेला आहे. पुण्यातील प्रत्येक वॉर्डात प्रत्येकी तीस झाडे पालिकेने लावावी असा एक ठराव मांडण्यात आलेला होता. प्रत्येक वॉर्डात तीस याप्रमाणे एकंदर २२५० झाडे निरनिराळ्या रस्त्यांच्या दुतर्फा उभी करण्याच्या या योजनेला झाडांसाठी लोखंडी कुंपण उभारणे, पाणी देणे वगैरे मिळून साडेसात लाख रुपये खर्च येणार होता. स्थापत्यसमितीच्या तरतुदीमध्ये एवढी रक्कम सध्या तरी उपलब्ध नसल्याचा शेरा कमिशनरांना मारावा लागला. महापालिकेच्या निरनिराळ्या समित्या निरनिराळ्या प्रमुख शहरांचे दौरे काढून पुण्याच्या सर्वांगीण विकासासाठी (दौऱ्यात मोटारीचे मीटर बंद ठेवून का होईना) प्रयत्न करीत असताना केवळ वृक्षारोपणासाठी इतका खर्च करणे शक्य आहे काय हा खरा प्रश्न. त्यामुळे तूर्त तरी वृक्षारोपणयोजनेला वाटाण्याच्या अक्षता लावण्यात आल्या आहेत. ◻

◻ शनिवारवाडा पुण्याचे मानचिन्ह! पुण्यात येऊन शनिवारवाड्याला भेट दिल्याशिवाय पुणे-भेट पूर्ण झाल्याचे समाधान लाभत नाही; परंतु या शनिवारवाड्याची आतली जाऊ द्या आसपासच्या परिसराची अवस्था इतकी शोचनीय झाली होती की कॉलेजविद्यार्थ्यांनीच या प्रकरणाकडे लक्ष द्यायचं ठरविलं. पूर्वी पोरांना दत्तक घेत. आता पोरांनी शनिवारवाडा दत्तक घेतला असून त्याची स्वच्छता राखण्याचं काम शिरावर घेतलं आहे. शनिवारवाड्याभोवतीचा परिसर स्वच्छ करण्यासाठी निरनिराळ्या कॉलेजांतील विद्यार्थी कुदळ-फावडी हातात घेऊन उभे राहताच पर्यटन-खात्यापासून पार पालिका-अधिकाऱ्यांपर्यंत सर्वांचं शनिवारवाड्यावरचं प्रेम उफाळून

---

मी 'तडजोड म्हणून' असे शब्द वापरले. वास्तविक 'अधिक न्याय्य म्हणून समर्थनीय असा पर्याय म्हणून' असे म्हणायला हवे होते. तुरुंगात जावे लागण्याची शरम आणि तुरुंगातील जीवन याचा अर्थ स्वातंत्र्य हिरावलेले, घर आणि कुटुंब यांचा वियोग, नियमांनी बांधलेली चाकोरी, शारीरिक श्रम आणि सर्वांत जाचणारे म्हणजे प्रौढ, जबाबदार व्यक्ती म्हणून काढून घेतलेली मान्यता–जन्मठेपेचे हे स्वरूप उपयुक्ततेच्या दृष्टीने सौम्य आहे, असे म्हणता येणार नाही. शिवाय ही शिक्षा अधिक आत्मविश्वासाने, अधिकाराने देता येईल.

क्रौर्य हा मानवाचा स्वभाव आहे. त्याचा आविष्कार किमान व्हावा हे संस्कृतीचे कार्य. क्रौर्याच्या आविष्काराला, शासनाचे अधिष्ठान लाभले की प्रतिष्ठा प्राप्त होते आणि एकदा अशी प्रतिष्ठा प्राप्त झाली की समाजातील इतर घटकांकडून त्याची या ना त्या स्वरूपात पुनरावृत्ती होण्याची शक्यता वाढते. गुन्हेगाराच्या सूडाने आंधळा झालेला समाज अहेतुकपणे शिक्षेच्या मर्यादा वाढविण्याचे अधिकार शासनाला देऊन बसतो आणि भविष्यातील शासकीय अत्याचारांचा, जुलमाचा मार्ग स्वतःच्या हाताने खुला करतो.

'फाशीची शिक्षा' हा 'कायद्याचा भाग' असणे ही वस्तुस्थिती म्हणूनच अधिक धोकादायक असते. खून हा जेव्हा शासनाच्या सार्वभौम अधिकारात केला जातो, तेव्हा त्याचे स्वरूप गंभीर ठरते. कारण अशा प्रत्येक प्रसंगी तो 'न्याय' म्हणून ओळखला जातो. याचा सामूहिक आविष्कार अपरिहार्यपणे युद्ध, सामुदायिक कत्तली यात होतो.

जे दुरुस्त करायला आपण अपुरे पडतो, ते पूर्णतः नष्टच करून टाकणे हा आळसाचा मार्ग झाला, कर्तृत्वाचा नव्हे. हा 'जीवघेणा' आळस झटकून टाकणे आज आपल्याला जर शक्य नसेल तर निदान या कत्तलखान्याला पावित्र्य, प्रतिष्ठा लाभू नये असा आपण प्रयत्न करू या.

बेल्जिअममध्ये फाशीची शिक्षा रद्द केल्यावर कबुली दिली होती : 'The lesson has been learnt that the best means of in culcating respect for human life is to refrain from taking life in the name of law.'

आपणही हा धडा शिकावा ही इच्छा ! ◻ ◻

आलं. विद्यार्थ्यांनी त्या परिसरातील गवत, काटेकुटे, कचरा एका ठिकाणी घाम गाळून गोळा केला; पण पालिका-ट्रक तो वाहून नेण्यासाठी वेळेवर येऊन पोहोचलाच नाही!

उदात्त प्रेमाचं प्रतीक असलेल्या मस्तानीबद्दल कॉलेजविद्यार्थ्यांत प्रेम असणं स्वाभाविकच. बिचारी मस्तानी! तिच्या स्मृतिस्थानावरच एक चर्मकार आपलं दुकान थाटून बसलेला. आजूबाजूला आकाशाच्या छपराखाली थाटलेले लहानमोठे संसार! अखेरीस पालिका-अधिकाऱ्यांच्या मदतीने ती जागा मोकळी करून घ्यावी लागली. त्यानंतर सफाई!

कॉलेजच्या कट्ट्यावर नाही तर चहाच्या कपाभोवती कॅफेत रमणारा कॉलेजातील तरुणतरुणींचा घोळका हातात कुदळफावडे घेऊन स्वच्छतेचे काम पूर्ण करीत असल्याचे दृश्य आसपासची मंडळी कुतूहलानं पहात होती.

थोडा भाग स्वच्छ करावयाचा राहिला होता. स्वच्छ केलेल्या जागेत हरळी लावायची होती म्हणून कॉलेजातील ही मंडळी पुढच्या रविवारी परत शनिवारवाड्याजवळ आली तेव्हा त्यांना धक्काच बसला! आपण स्वच्छ केलेला परिसर हाच का? असा प्रश्न पडावा इतपत केरकचरा साठलेला व त्याबरोबरच दुर्गंधी! तेव्हा मुलांनी ठरविलं फक्त परिसर स्वच्छ करून भागणार नाही तर आसपासच्या प्रतिष्ठित सभ्य नागरिकजनांना हा परिसर स्वच्छ राखण्याची विनंती केली पाहिजे! विद्यार्थ्यांनी एका ऐतिहासिक वास्तूबाबत दाखविलेल्या आस्थेची कदर घाणकरी-मंडळी करतात की नाही हे पहावयाचे आहे.

'एक पाउल पुढे टाका' ही कसबापेठेत नंदू घाटे व काका वडके यांनी सुरू केलेली एक अभिनव योजना. ती खूपच यशस्वी झाली आहे असं म्हणावंसं वाटतं. कारण समारंभपूर्वक लोक मोठ्या उत्साहाने, कौतुकाने सर्वांच्या देखत 'एक पाऊल पुढे टाकतात'; पण नव्याचे नऊ दिवस संपले की पूर्वीचीच आखूड पावलं पडायला लागतात, कचराकुंड्या भरून केर रस्त्यावर पडायला लागतो, पावलं आणखी आखूड होत दारातून, खिडकीतून, गच्चीतून केरकचरा बाहेर फेकला जातो व स्वच्छतामोहीम एक मोहिमच ठरते! पण 'एक पाऊल पुढे टाका' ही योजना अतिशय उत्कृष्टरीत्या राबविल्यास त्या भागातील नागरिकांची पावलं अद्यापी मागं पडू लागली नसल्याचे दिसून येते. चार कार्यकर्त्यांनी जमून तो परिसर स्वच्छ करून प्रश्न सुटत नाही तर अस्वच्छतेची सवय लागलेल्यांना बदलणे हे या योजनेचे तत्त्व! घोरपडेपेठेतही 'एक पाऊल पुढे टाका!' योजना नुकतीच सुरू करण्यात आलेली आहे. घोरपडेपेठही आता आपले स्वरूप पालटत आहे; पण स्वारगेट पोलिसवसाहतीला मात्र 'एक पाऊल पुढे टाका!' आवाहन कोणी केलेले दिसत नाही. या वसाहतीच्या आवारात जागोजागी असलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्यांबरोबरच काँग्रेसगवतही बरेच वाढलेले आहे. त्याचे दुष्परिणाम भोगायला लागण्यापूर्वीच त्याची विल्हेवाट लागणे आवश्यक आहे.

तर पुणे शहर सुंदर करण्यासाठी, स्वच्छ ठेवण्यासाठी तुरळक प्रयत्न चालू आहेत. 'सुंदर पुणे, स्वच्छ पुणे' ही पाटी दिमाखात झळकविणाऱ्या खांबाच्या पायथ्याशी तरी कुणी साक्षरानं कचरा टाकू नये हीच अपेक्षा! ◻

## रस्त्यावरून चालणे—एक कसरत

◻ पुणे शहर सध्या उसवलं आहे. शहरातील रस्ते हे शहराचे निरनिराळे भाग एकत्र आणणाऱ्या डांबरी शिवणीच. त्या जितक्या भक्कम, त्यावरची वर्दळ जितकी सुरळीत, देवाण-घेवाण जितकी सुलभ तितके गाव एकसंध. मग त्यात पूर्व-पश्चिम असे दोन परस्पर अलग भाग सहसा पडत नाहीत.

तर पुणे शहर उसवलंय म्हणजेच महत्त्वाचे रस्ते सध्या उकललेले आहेत. कारण नेहमीच्याचपैकी पाणीपुरवठा, ड्रेनेज, वीजमंडळ किंवा टेलिफोन खाते.

'रस्ता न खणता टेलिफोनची केबल काढण्याची योजना पुण्यात सुरू' ही बातमी वाचून मी खूष झालो. रस्ते वारंवार खणण्याचं एक कारण तरी संपलं; पण ती बातमी पूर्ण वाचल्यानंतर मात्र खचलो. कारण बातमीत पुढं म्हटलं होतं.'

'वारंवार रस्ता खणून नागरिकांना होणारी डोकेदुखी व वाहतुकीला होणारा अडथळा कायमचा टाळण्यासाठी पुण्यात एक सहा कोटींची योजना आखण्यात आली असून ती टप्प्याटप्प्याने सहा वर्षांत पूर्ण होईल.' टप्पा-टप्पा म्हटलं की मला जरा भीती वाटते. कारण एक तर हे टप्पे किती असतात याचा पत्ता लागत नाही व ते केव्हा पूर्ण होतील याचाही भरवसा नसतो.

आता या योजनेच्या पहिल्या टप्प्याची पहिली सुरुवात बाजीरावरोडवरील टेलिफोन एक्सचेंजच्या इमारतीपासूनच झालेली आहे. त्यामुळे एक्सचेंजच्या इमारतीची एखाद्या खंदकातल्या किल्ल्यासारखी अवस्था झालेली आहे.

बाजीरावरोड खणून झाला आहे. रस्त्याच्या मध्यभागी खणलेल्या मातीची टेकडी. वर उरलेल्या चार-पाच फूट रस्त्यावर एकेरी वाहतूक. त्यात पी. एम. टी ची बस आहे, रिक्षा आहे, सायकलवरचे दोन हात सोडून निघालेले सायकलस्वार आहेत, धूळ खाणारे स्कुटरवाले आहेत. तर या सर्वांना चुकवत चुकवत चालणारे पादचारी आहेत. काही आयडियाबाज माणसांनी शक्कल लढविली. 'रस्त्यावरून जाण्यापेक्षा मातीच्या टेकडावरून मिरवत चालणेच त्यांनी पसंत केले. पहिल्या पंधरा दिवसात प्रचंड धूळ उडत होती. धुळीचा त्रास वाचविण्यासाठी पाणीपुरवठा खाते मदतीला आले.

एका कोपऱ्यावरचा पाण्याचा पाइप लिक झाल्याने सध्या धूळ उडणे काही प्रमाणात बंद झाले असून चांगला चिखल तयार झाला आहे. त्यात एखादी रिक्षा किंवा स्कुटर नजर चुकवून किंवा नजरचुकीने या वनवेत घुसली की काय होते ते विचारू नका!

लक्ष्मीरोडवरही काही ठिकाणी रस्ते खणले आहेत. कँपात काही चौकांत कामं चालली आहेत. डेक्कनवर खणलेल्या रस्त्यामुळे जाम झालेल्या रहदारीतील पुढच्याने हलावे म्हणून मागच्याने मारलेले, हॉर्नस् कानठळ्या बसवितात.

या सर्वांना जोड आहे नव्यानं उभ्या राहणाऱ्या चार मजली-पाच मजली फ्लॅटस्‌च्या बांधकामाची! जुनी घरं जमीन दोस्तहोत आहेत. नवी उभी राहत आहेत. वाळूविटांचे ढिगारे, सिमेंटचे कालवण, कामगारांची धावपळ, वाळू ओतण्यासाठी मध्येच थांबलेला ट्रक ही हमखास दिसणारी, परिसराचा चेहेरामोहोरा बदलणारी, रहदारीस अडथळा करणारी नेहमीची दृश्ये.

त्यामुळे पायी चालणं ही एक कसरत झाली आहे. ◻ ◻

# सोलकढी

## □ बस मला धार्जिणी नाही

मला एक छानपैकी नोकरी आहे. नोकरी-पलीकडे, माझ्या कलागुणांना वाव देत देत बऱ्यापैकी पैसे मिळवून देणारे काही उपक्रम मला सहज करता येतात. घर-संसारात काही तकलीफ नाही. दत्तो वामन पोतदारांएवढी नसली तरी माझी प्रकृती तशी ठणठणीत आहे. दिवसातून दोन वेळा मला निर्वेध झोप लागू शकते. माझे निकटवर्ती असे दोनपाच हजार मित्र वेळीअवेळी माझे कौतुक करत असतात; पण यावरून मी म्हणजे सुखाच्या समुद्रात सुखाचा मासा होऊन सुखाने पोहत असेन अशी तुमची कल्पना असेल तर ती तितकीशी बरोबर नाही.

म्हणजे मी सुखात नाही असे नाही. सुखात आहे; पण काही लोकांच्या सुखाला एक साय चढलेली असते ना तशी माझ्या सुखाला चढलेली नाही. ती साय चढायची तर अनेक पूर्वजन्मांच्या पुण्याईचे फिक्स डिपॉझिट हवे. उदाहरणार्थ, मला झोप लागते, पण ती निर्वेध; तिच्यात बिल्बिलोरी, रंगी-बेरंगी स्वप्ने नाही दिसत. नाटका-चित्रपटांची तिकिटे मिळतात मला; पण ती दूरदृष्टीने आगाऊ राखून ठेवली तरच; आयत्या वेळी जाऊन ती मिळणारा महाभाग मी नव्हे. मला मिळणारे ताजे मासे कधी स्वस्त असत नाहीत. मी आणलेले कलिंगड मोठ्ठे जरूर असते; पण ते लालेलाल निघत नाही. लांबच्या प्रवासात मला जागाबिगा ठीक मिळते; पण सुंदर आणि विशेषतः धीट तरुणीच्या शेजारची मिळत नाही. दरवर्षी पावसाळ्यात दुकानातून मी नेमक्या हरवणाऱ्या छत्र्या कशा आणतो याचे मलासुद्धा आश्चर्य होऊन राहिलेले आहे. मी अशा मोक्याच्या ठिकाणी राहतो की बहुतेक बस-थांबे अगदी नजीक आहेत; पण बस मात्र मला धार्जिणी नाही.

मुंबईत बस ज्याला धार्जिणी नाही त्याच्या सुखाला साय चढणे अवघड आहे. चुकून चढलीच तरी तिला खरपुसखमंग रंग चढणे शक्य नाही. माझ्या स्वभावात जी उदार सहिष्णुता आणि प्रगाढ सोशिकता पैदा झाली आहे तिचे बहुतांशी श्रेय या बसप्रवासाला द्यायला हवे. एखाद्या ठिकाणी जायला केवळ बसप्रवासाला पंधरावीस मिनिटे लागणार असली तरी थांब्यावर माझ्या दोन-तीन तासांचा भुगा सहज होऊन जातो. कधीकधी तर एखाद्याला दादरहून चर्चगेट वा बोरी-बंदरला जायला जितका वेळ लागतो त्याच्यात पुण्याला जाऊन 'थिएटर ॲकॅडमी'चे नाटक पाहून आणि मंडईतून मटार घेऊन मुंबईला परतणे सहज शक्य होते. मला हवी असते ती बस सोडून बाकीच्या बसेस मात्र रुग्णवाहि-केच्या किंवा आगीच्या बंबाच्या तत्परतेने येत राहतात. बऱ्याच वेळाने मला हवी असते ती बस जेव्हा येते तेव्हा ती उतारूंनी लदबदलेली असते. पुष्कळ वेळा ती थांब्यावर थांबतच नाही. जेव्हा थांबते तेव्हा बसमधल्यांची खाली उतरायची आणि माझ्यासकट थांब्यावरच्यांची वर चढायची जी तुमुल घाईगर्दी होते तिच्यात मी सदेह थांब्यावरच राहतो. खरे म्हणजे मी चांगला तगडाबगडा आहे. खांदेदामटू आणि कोपरखळचामारू सुद्धा आहे; पण बसमध्ये शिरकावणे काही मला जमत नाही. त्याला एक वेगळीच अस्मिता लागते हे माझ्या लक्षात येऊन चुकले आहे. ती आमच्याकडे नाही. मात्र बऱ्याच मुंबईकरांकडे ती असावी असे वाटते. ती वाढीला लागावी म्हणूनच बसेसना (आणि रेल्वेगाड्यांनासुद्धा) चढाय-उतरायला एकच एक दार खुबीने ठेवलेले असावे.

उद्योग-मंत्रालयाने नेमलेल्या एका समितीच्या सदाशिवांना ही खुबी कळलीच नाही. उतारूंच्या दृष्टीने अधिक सोयिस्कर बस कशी तयार करता येईल हे ठरवण्यासाठी समिती सिद्ध झाली होती. समितीच्या शिफारसींना म्हणे निर्णायक स्वरूप असणार आहे. (पूर्वीच्या बसेसना होती तशी) यापुढे बसला चढण्यासाठी वेगळे आणि उतरण्यासाठी वेगळे अशी दोन दारे असतील. तशा काही बसेस मुंबईच्या रस्त्यावरून अजून धावतात आणि त्या उतारूंची काही अधिक सेवा करतात, सोय पाहतात असे दिसत नाही. आणिबाणी-साठी बसमध्ये आणखी एक दार असते. तेच जणु काही खुले केले आहे असे या दोन दारांच्या बसेसकडे पाहून वाटते. मुंबई आणि मुंबईचे महाजीवन यांचा एक डोळस आणि डोकेबाज अभ्यासक म्हणून मला असे सुचवावेसे वाटते की दारेच एकमेकाला चौफेर जोडून बस जमवली तर ती सोयिस्कर ठरायची थोडीफार शक्यता आहे. अशा बसेस केल्या तर त्यांच्यातल्या उतारूंच्यासाठी खास टपालसेवा उपलब्ध करून देणेही सुलभ होईल. इतकेच काय पण विविध प्रकारची अन्य सेवा सुद्धा पुरवता येईल. खरे तर सेवेचीच दारे खुली होतील. शिवाय अशा दारांतून उतारूंना चढणे-उतरणे सोपे होईल ते होईलच.

तसे झाले तर माझ्या सुखाला पातळशी का होईना पण साय चढेल. बिनसायीचे सुख हा खरोखर दुःखाचाच एक प्रकार आहे, असे जे एका जातक-कथेत सुचवले आहे ते अगदी योग्य, उचित आणि स्वाभाविक होय.

—अनंतराव



पुणे येथील फिल्म कल्चरल सेंटर या संस्थेने आपला दहावा वर्धापनदिन गेल्या आठवड्यात साजरा केला. यानिमित्त दाखविण्यात आलेल्या निवडक आंतरराष्ट्रीय चित्रपटांपैकी हा एक चित्रपट

# त्लायुकन

अशोक प्रभाकर डांगे

पैसा नावाची चीजच मुळी विलक्षण देखणी असते. ती लांबूनच प्रत्येकाला भुरळ पाडते; पण जवळ गेल्यास सरळ पाठ दाखविते आणि डावलून नेल्यास अस्तित्वच अशक्य करून सोडते. पैसा ही संज्ञाच महाबेरकी असते. आयुष्यातले सुख-दुःखांचे प्रदेश ती नकळत वाटून टाकते. आशा-आकांक्षांच्या शर्यतीत अडथळे उभे करते आणि स्वप्न नावाच्या सुंदर वास्तू लिलावात काढते. पैसा ही संवेदना समाजजीवन प्रवाहित करते. माणसाचे खोटे व्यक्तिमत्त्व सजविते किंवा सच्चेपणाची घरं कोसळवून टाकते. ती डॉलरच्या मॅक्सी चढवो किंवा रुबलचे झगे पांघरो, येनचे झोकदार किमोनो वागवो किंवा पौंडाची लक्तरं पांघरो, ती कुठेही वावरो, कशीही दिसो, तिचं अंतःकरण तितकंच नागवं असतं. ही दोन शब्दांची संज्ञाच असणं आणि नसणं यातला फरक छान समजावून सांगते. माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची ती व्याख्या करते. म्हणूनच तिचे अस्तित्व प्रत्येक समाजजीवनात अपरिहार्य ठरते. पैसा ह्या संज्ञेचा समतोल एखादा समाज अचूक राखू शकला नाही की समाजजीवनात संघर्ष उभा रहातो. 'त्लायुकन' ही चित्रपटकथाच मुळी अशा संघर्षातून आकार घेते.

पडद्यावर उभा केलेला असतो एक करडा देश. त्यातली माती आपल्या चेहऱ्यामोहऱ्याची वाटणारी. कदाचित आपली आणि तिची विषुववृत्ताशी असणारी जवळीक कारण असेल. कदाचित नसेलही. तरी पण इथली घरं मात्र देशावरल्या एखाद्या नगण्य खेड्यासारखीच दगडामातीतनं घडवलेली किंवा घराभोवती दगडांचे गडगे. थेट कोकणची याद करून देणारी. कुंपणांची दारं फळकुटांनी बांधलेली आपल्यासारखीच. झाडं सुद्धा विलक्षण बोलकी. इथल्या भूमीत उसाचे देखणे तुरे मिरवतात आणि नद्यापण हवं तितकं वाहतात. कदाचित ह्या लोकांचा धर्म जरा वेगळा असेल किंवा त्यांच्या शरिराची मोजमापंही मोठी असतील. त्यांची पोरं अधिक चलाख असतील. परसात उघड्यावर गाईगुरांऐवजी डुकरं बांधलेली असतील. त्यांच्या स्त्रियासुद्धा देखणेपणात उजव्याच असतील किंवा पुरुषसुद्धा व्यक्तिमत्त्वात भारी ठरतील. मेक्सिकोतल्या ह्या विलक्षण खेड्याबद्दल आपणाला आपुलकी वाटो अथवा न वाटो, तिथे बोलली जाणारी स्पॅनिश भाषा आपल्याला उमजो अथवा न उमजो, त्लायुकन हा चित्रपट आपल्याला त्याच्या पडद्यावरील अस्तित्वाशी इमान राखणं भाग पाडतो यात शंका नाही.

अल्कोरिझा नावाचा दिग्दर्शक मेक्सिकोतलं एक अख्खं खेडंच पडद्यावर आणतो. ह्या खेड्याची भूमिका केवळ मुक्या साक्षीदाराची नाही. दिग्दर्शक ह्या अडाणी खेड्याला चक्क बोलतं करतो. ओबडधोबड रस्त्यांचं हे डोंगरी गावच मुळी मागे राहून नायकाची भूमिका वठविताना दिसतं. तशा लाक्षणिक अर्थानं त्याला एखादा नायक असला तरी हे गाव तिथला प्रत्येक माणूस, तिथलं चर्च, घरं प्रत्येक जणच आपली आपली ठरवलेली की न ठरवलेली भूमिका मनापासनं वठवीत असतो.

युफेमिका नावाच्या माणसाची ही गोष्ट. ह्या उमद्या माणसाचा स्वभाव विलक्षण मनस्वी आहे. अन्यायाची त्याला चीड आहे. त्याविरुद्ध उभं रहायची त्याच्या रक्तालाच आदत आहे. म्हणून तर या ढोंगी जगात मुफेमिया नावाच्या सच्च्या माणसाला झगडण्याशिवाय पर्याय नाही. कारण त्याच्या भवितव्यातच तसं लिहून ठेवलंय. गावातल्या एकुलत्या एक फॅक्टरीत याला चांगली नोकरी आहे; पण तिथनं पण तो हाकलला जाणं स्वाभाविकच असतं. कारण हा भला माणूस सारखाच भांडतो. प्रसंगी इतर मित्रांसाठी सुद्धा भांडत रहातो. इतरांवर झालेला अन्याय ते सहज पचवू शकतील; पण ह्या माणसानं तो उगाच का म्हणून सहन करावयाचा ? त्याच्या सहनशक्तीच्याच ते पलीकडचं आहे. अल्कारिझो मग आणखी एक व्यक्तिमत्त्व उभं करतो. चबेली विलक्षण मोहक व्यक्तिमत्त्वाची दिसते. युफेमियाची ही भाबडी बायको, ह्या भांडखोर माणसाच्या पार्श्वभूमीवर उठून दिसते. त्याचं सारं घर ती उभं करते. दुसरं संभाळते. नितळ तारुण्यात वावरणारी ही देखणी स्त्री आपल्या सुखदुःख तच सहजपणे वावरत रहाते. दोघं पैशानं कमीच आहेत. मनानं तितकेच मोठे म्हणून तर चर्चमधल्या आंधळ्या कॅस्तीनोला चबेला कॉफी वाटते तर युफेमियो आपलीच अर्धी भाकर देऊ करतो. ह्या दोघांचा लहान मुलगा सुद्धा कथेत वावरतो. तो आईला मदत करतो. बापाची करमणूक करतो. खेचरावरून शाळेत जातो. ह्याला एकच गोष्ट मनस्वी आवडते. आइस्क्रीम आणि ते न मागता येण्याइतका बाप सुद्धा बेकार असतो. म्हणूनच निको गावाबाहेरच्या उच्चभ्रू हॉटेलात वरचेवर जातो. कोलांटचा-उड्या मारून चार पैसे गोळा करतो. ते श्रीमंत स्त्री-पुरुष ह्याला कौतुकानं देतातही. मग आइस्क्रीम खाण्याचा ह्याचा मार्ग मोकळा होतो.

अल्कारिझो आणखी एक भन्नाट माणूस आपल्याला दाखवते. युफेमियोच्या घरासमोरच्या हवेलीत रहाणाऱ्या ह्या म्हाताऱ्याचं नाव डॉन टॉमस. हवेली त्याच्याच मालकीची. तसा भलताच पैसेवाला असणारा डॉन टॉमस 'चिक्कू म्हातारा' म्हणून प्रसिद्धी पावलेला. ह्या रिकामटेकड्याचा धंदा एकच. सफरचंदे चोरणाऱ्यांवर राखण करणे आणि घरातल्या व्हरांड्यातून समोरच्या घरात वावरणाऱ्या देखण्या चबेलाला न्याहाळणे.

अगदी दिवसभर. ती डुकरांना खाणे घालत असो किंवा गावाबाहेर नदीत डुंबत असो याचा धंदा एकच. तिला पहात रहाणे मग ती पण घाणेरडी गाणी इतर स्त्रियांबरोबर म्हणून त्याला सुद्धा पळवून लावते. ह्या गावात गरिबीत रेंगाळणारे युफोमिया, चवेला, निको, कॅस्तीना दिसतात तसेच श्रीमंतीत लोळणारे डॉमटॉमसारखे पण असतात. आता अल्कारिझो आणखी एक स्त्री पडद्यावर आणतो. ती स्वतःला तरुण समजते; पण आपण तिचं वय सहज ओळखतो. प्रौढ प्रिन्सेस्का अविवाहित सुद्धा असते. स्वाभाविकच विक्षिप्तपणा हा असतोच. चिडचिड करते. आपला राग नेहमीच दुसऱ्यावर काढते. फुकटचा छंद म्हणून सारखी स्वच्छता करत राहाते. तिच्या लेखी जगात फक्त घाणेरडेच घस्ती करतात.

अल्कोरिझाच्या ह्या देखण्या खेड्याचं संघटन करणारी एकच गोष्ट अस्तित्वात असते. ते असतं तिथलं सेंट लुइसाचं चर्च. गावाबाहेरच्या ह्या जुनाट पण भव्य वास्तूबद्दल प्रत्येक जणच आदर राखून असतो आणि थोडीशी भीती पण बाळगतो. म्हणून तर माता लुइसाची नवी मूर्ती घडवायला प्रत्येकजण हातभार लावतो. वर्गणी देतो; पण मेक्सिकोतली असली तरी काय ही सारी माणसंच असतात. त्यांच्या श्रद्धा सुद्धा ढोंगीच असू शकतात. कारण लुइसावर श्रद्धा ठेवून असणाऱ्या प्रत्येकाचंच तिच्याकडे काही ना काही मागणं असतंच. आंधळा कॅस्तीनो आपल्या दृष्टीसाठी साकडं घालून असतो. कारण त्याची श्रद्धाच दांडगी असते. माता लुइसा एक ना एक दिवस आपल्याला निश्चित दृष्टी देईल. म्हातारी प्रिन्सेस्का आपल्या न होणाऱ्या लग्नाची आशा बाळगून असते. ह्या श्रद्धांना स्वार्थाचीच झालर असते. म्हणून अल्कोरिझा ह्या चर्चचा फादरसुद्धा तितकाच ढोंगी दाखवत रहातो. लोकांच्या भावनांचा तो पुरता लाभ उठवतो. त्याला लोकांशी घेणं नसतं. त्यांच्या सुखदुःखांशी तर त्याहून नसतं. त्याला कर्तव्य वर्गणी गोळा करण्याशीच असतं. मग वर्गणी न दिलेल्यांची यादी तो चर्चच्या फळ्यावर झळकवून टाकतो. मग ह्या ढोंगी माणसाचा आपणाला विलक्षण तिरस्कार वाटू लागतो आणि तसा तो वाटणं सुद्धा अटळच ठरतं. बोर्डावरची चार नावं त्या अख्ख्या गावात खळबळ उडवून देतात. डॉम टॉमस मात्र भयंकर खवळतो. कारण त्याचं नाव तर पहिलं असतं. कसली मूर्ती? कसची वर्गणी? त्याचा म्हणे असल्या फालतू गोष्टींवर विश्वासच नसतो; पण मुळात हे सारंच खोटं असतं. कारण त्याचा विश्वास फक्त पैसे वाचवण्यावरच असतो. आपलं नाव पाहून तो खवळतो. फादरला धमक्या देतो व बोर्ड पण फेकून देतो. दुसऱ्या नंबरावर असतो युफेमियो. मग इतर. ती साधी माणसं फादरचे पाय धरायला चर्चमध्ये जातात. फादरच तो. भलताच ढोंगी! खूप भाव खातो. देवाचं काम आधी, मग बाकीचं. स्वतःला विका. नाही तर बायकोला. त्याला काहीच कर्तव्य नसतं; पण आधीचाच बेकार युफेमियो व इतर मनधरणी करतात. मग तो थोर माणूस थोडी मुदतवाढ मंजूर करतो. तेवढंच समाजकार्य. अल्कोरिझाचा हा धर्मगुरू विलक्षण चीड आणतो. धर्माचा धंदा करणारी ही जमात सर्वच धर्मांच्या आश्रयानं वाढत असते. ढोंगाचे डोलारे ती उभी करतात आणि नीतिमत्तेला मूठमाती देतात. युफेमियोचा नाइलाज होतो. आपली डुकरं तो विकतो. वर्गणी भरून टाकतो; पण हे करताना त्यालाच काय आपल्यालाही विलक्षण खंत वाटते. अल्कारिझोनं त्या साऱ्या कुटुंबाचीच स्वप्नं ह्या डुकरांच्या अस्तित्वावरच उभारलेली असतात. आशा मोठ्या असतात. ही मोठी होतील. अंगानं मस्त माजतील. मग ती विकू बरेच पैसे मिळवू. जमिनीचा एखादा तुकडा विकत घेऊन टाकू आणि मग पिढीभर पोसलेलं हे दारिद्र्यपण घराबाहेर काढू. चवेला, युफेमो दोघांचीही देखणी स्वप्नं डुकरांच्या विक्रीबरोबरच कोलमडताना दिसतात. शिवाय नवे मालक त्यांना फुकटच पोसायला ती डुकरं तिथेच ठेवतात.

त्लायुकन ह्या चित्रपटाची सुरुवातच एका देखण्या गावाचं सुंदर व्यक्तिमत्त्व उभं करते. अखेर वर्गणी गोळा होते. मूर्ती समारंभानं बसवली जाते. सारं गावच समारंभाचा भाग बनून जातं. नंतर मग सेंट लुइसाची जत्राही नेहमीप्रमाणेच भरते. तसं गाव पण लहान. जत्रापण बेताचीच दिसते. तशी या जत्रेत सुद्धा धमाल होते. एकांतात बसून नदीकाठी प्रेम करणाऱ्या युफेमियो दाम्पत्याला म्हातारी प्रिन्सेस्का पहाते. मग काय उघड्यावरचा शृंगार पाहून ती भलतीच खवळते. स्वच्छ जीवनाची चाड राखणारी ती स्त्री सरळ चर्चमध्ये जाते आणि फादरकडे तक्रार नोंदवते. फादर पण पक्का असतो. त्याचं म्हणणं सरळ असतं. विवाहितांनी प्रेम करणं ह्यात चूक कसली? दोष युफेमिओचा नाही. चवेलाचा नाही. असलाच तर तिचाच आहे. दोष तिच्या कुवारपणातच दडलेला आहे. मग अल्कारिझो भांडते. भिकारी दाखवतो. ते सारे आंधळे चर्चच्या पायऱ्यांवर उत्सवाची भीक मागत असतात. कॅस्तीनोचा दावा मोठा असतो. त्याचीच लुइसावर खरी भक्ती असते. कारण तोच रोजच्यारोज तिचं दर्शन घेतो. बाकी जत्रेच्या दिवशी नेमके उगवतात. गोष्ट तशी खरी दिसते. मग बाकीचे सारेच खवळतात आणि पडद्यावर आंधळ्यांच्या हाणामाऱ्या घडतात. अल्कोरिझो माणसांच्या खऱ्या मनोवृत्तींना बोलका करत रहातो.

पृष्ठ २५ वर



# महाभारतातील एक प्रक्षिप्त प्रकरण

श्री. मा. भावे

कुरुकुलोत्पन्न राजा जनमेजयाची श्रेष्ठ पुरुषांनी युक्त आणि वैभवसंपन्न अशी राजसभा अवाक् आणि तटस्थ होऊन ऐकत होती. ऋषी वैशंपायन ह्या क्षत्रियकुलावंतस राजाच्या पूर्वजांच्या आयुष्यातील एका काळयाकुट्ट भागाची कथा सांगत होता. वाऱ्याने केळीला पीडा द्यावी त्याप्रमाणे दुःशासनाने द्रौपदीला खेचले होते. ती काकुळतीला येऊन कौरवसभेतील महात्म्या भीष्मांकडून संरक्षणाची, न्यायाची, न्यूनतम सहानुभूतीची अपेक्षा करीत होती आणि तो महामन गांगेय विमूढ होऊन स्वस्थ बसला होता. त्याच सभागृहात घडलेला हा क्लेशकारक इतिहास ऐकताना सारी राजसभा स्तब्ध आणि निःशब्द होती. चेहरे काळवंडले होते, मान वर होत नव्हती !

इतक्यात त्वेषाने श्वास सोडीत परंतप राजा जनमेजय म्हणाला, ' हे महामुने, आपण काही तरी लपवून ठेवीत आहात ! तो महाबाहु, बलशाली आणि नीतिरक्षणासाठी प्राणाची पर्वा न करणारा दृढव्रत गांगेय भीष्म अशा निकराच्या क्षणाला स्वस्थ बसेल तरी कसा ? दुरात्म्या दुःशासनाकडून आर्यस्त्रियांना भूषणभूत अशा पांचाळीवर जबरदस्ती होत असता तो नरर्षभ तटस्थ राहील हे संभवतच नाही ! हे सर्वज्ञा, भीष्माची थोरवी पूर्वी आपणच वर्णिली आहे. मूर्तिमंत शुचीच अशा गंगेचा तो पुत्र, अतिश्रेष्ठ परशुरामाचा तो शिष्य, महर्षींनी स्तुति करावी असे त्याचे धर्मज्ञान; असा तो कुरुकुलभूषण पितामह द्रौपदीच्या विनवणीकडे दुर्लक्ष करून मौन धारण करील, हे खरे वाटत नाही ! आपण काही तरी सांगण्याचे टाळत आहात असे मी नम्रपणे म्हणतो. '

इतिहासज्ञ वैशंपायन पराभवसूचक स्मित करीत, मस्तक लववून म्हणाला, ' हे महाप्रज्ञ राजा, जे तुझ्या लक्षात येऊ नये असे मला वाटत होते ते तू जाणलेसच. हे भरतकुलसत्तमा, तो वृद्ध शांतनव त्या वेळी जे बोलला ते इतके अतर्क्य आणि विपरीत होते की ते तुला कळले तर आपल्या श्रेष्ठ पितामहाविषयी कलुषित विचार मनात येऊन तुला शीण होईल असे वाटून मी ते सांगणार नव्हतो. चंद्रावर राहूची छाया पडावी, कमलावर शेवाळे जमावे त्याप्रमाणे स्थिरमती आचार्यांची प्रज्ञाही कश्मल होते असे मानल्याखेरीज भीष्माच्या भाषणाचा उलगडाच होत नाही. हे सत्त्वस्था, त्या प्रसंगाचे आणि भीष्माच्या भाषणाचे तुझ्या आग्रहावरून मी विस्ताराने वर्णन करतो, ते तू एकचित्ताने ऐक !'

राजसूययज्ञाच्या वेळी घडलेल्या अवभृथस्नानाची स्मृती जे विसरलेले नाहीत ते याज्ञसेनीचे सुदीर्घ केश धरून वध्यपशूला यज्ञवेदीवर आणावे त्याप्रमाणे दुःशासनाने तिला ओढत आणले, तेव्हा धृतराष्ट्राच्या त्या राजसभेत हाहाःकार माजला ! भविष्याच्या शंकेने कौरवांची मने देखील व्याकुळ झाली आणि अनर्थाच्या अपेक्षेने सभागृह झाकोळून गेले. त्या वेळी स्वपक्षीयांना धीर देण्यासाठी आणि आपल्या बाजूच्या न्याय्यतेविषयीची शंका दूर करण्यासाठी दुरात्मा दुर्योधन छद्मी हास्य करीत उठला व द्रौपदीला उद्देशून म्हणाला,

' हे पांडवभार्ये, तुझ्या पतींचे सर्व राजवैभव त्यांच्या स्वतःसकट मी द्यूतात जिंकून घेतले आहे आणि तूही आमची गुलाम झाली आहेस ! आमच्या अंतःपुरातली दासी म्हणून तुला ठेवण्याचा अधिकार आम्हाला प्राप्त झाला आहे; पण आम्ही ते करणार नाही ! कारण आर्यस्त्रीच्या प्रतिष्ठेविषयी आमची आस्था निरपवाद आहे.

हे द्रुपदसुते, केवळ एक पण पूर्ण झाल्याने देशोधडीला लागलेल्या व ब्राह्मणवेषाने फिरणाऱ्या अर्जुनाशी तू विवाह करावास हे आर्यावर्तातील बहुसंख्य राजांना पसंत नव्हते. तुझ्या सुदैवाने तू द्यूतात जिंकली गेलीस ! आम्हापैकी कोणाशीही तू विवाह कर आणि पृथ्वीच्या राज्याचा उपभोग घे! स्वयंवराच्या स्वातंत्र्याचा तू दुरुपयोग केलास, ती चूक आता सुधार !

पातिव्रत्य आणि विवाह यांचे महत्त्व मी कमी लेखत नाही; पण त्यात कालमानानुसार आणि परिस्थितीनुरूप बदल झाले पाहिजेत. या सभेतील बहुमत तुझ्या नवविवाहाला संमती देईल अशी निश्चिती आहे.

आम्हा कौरवांचे बाहुबळ पांडवांपासून तुझे रक्षण करण्यास समर्थ आहे. त्यांना आम्ही तत्काळ वनवासात पाठवून देऊ !

हे कोमलांगी, अनाठायी विरोध सोडून कौरवराजमंडळाची सम्राज्ञी तू व्हावीस हेच योग्य होय !'

कुटिलमती दुर्योधनाच्या या विषपूर्ण भाषणाकडे दुर्लक्ष करून ती कुरुस्नुषा द्रौपदी नीतिज्ञ भीष्मास म्हणाली, ' आपणांसारख्या वृद्धांमुळे राजसभा महत्त्व पावतात. वृद्धांच्या वचनांना वजन ती धर्मानुसारी असल्याने येते. कपटयुक्त भाषण कधीच धर्मानुसारी नसते. या राजसभेतील धर्मनिधी वृद्ध आपणच आहात ! तरी हे देवव्रत भीष्मा, आपणच माझा न्याय करावा ! द्यूताच्या फाशात, सम्राटांच्या बळात, दुष्टांच्या कपटनैपुण्यात अगर या राजसभेच्या बहुमतात एखाद्या पतिव्रतेची निष्ठा बदलण्याचे सामर्थ्य असावे काय ? राजसभेच्या बहुमतापुढे किंवा आर्यावर्तातील राजांच्या बळापुढे मान तुकवून स्वयंवराचे वेळी स्वयंस्फूर्तीने घेतलेला निर्णय मी बदलावा काय ?'

द्रौपदीचे भाषण संपून भीष्म काही बोलणार तोच दुर्बलांच्या हृदयाचे विदारण करणारा हुंकार करीत महाभुज भीमसेन आपली विक्राळ गदा सरसावीत उभा राहून म्हणाला, ' आचार्य, आपल्या उपस्थितीमुळेच आणि आपण न्याय द्याल या समजुतीनेच मी स्वतःला आवर घातला आहे; नाही तर चांडाळांनी भरलेली आणि पाशवी बलाच्या दबावाखाली नीतीवर निखारे ठेवणारी ही राजसभा खणून काढून तिची माती मी यमुनेत केव्हाच टाकली असती ! आपण आता त्वरित निर्णय द्या ! तुम्ही जे सांगाल ते धर्म-

युक्त, नीतिपूर्ण व सदाचाराला साजेल असे असणार यात संशय नाही.'

भीमाचा आवेश, क्रोधयुक्त मुद्रा आणि भयंकर आकृती पाहून धृतराष्ट्राच्या हृदयात भीतीचे काहूर उठले. दुर्योधनाने संकेत करताच आपली शस्त्रे सरसावीत ते भीष्माभोवती गोळा झाले. तेव्हा दिवाभीतांच्या थव्यात गरुड शोभावा तसा तो भीष्म तेजाने झळकू लागला. हे पारीक्षिता, त्या निकराच्या क्षणी भीष्माच्या मनात भावनांच्या सहस्रशः लहरी उसळल्या. भंवती जमलेल्या बलाढ्य कौरवांकडे आणि वैभवसंपन्न राजसभेकडे त्याची दृष्टी गेली. हे राजपुत्र कौरव आपल्या सेवाशुश्रूषेत रत असतात याचे स्मरण त्याला झाले. त्याच राजसभेत तो पितामह शंभर वर्षे बसत आला होता. ती सभा त्यानेच संवर्धिली होती, प्रतिष्ठेला आणिली होती. या सगळ्याच्या आसक्तीचे गढूळपण त्याच्या शुद्ध मनावर जमा झाले आणि त्या संभ्रम अवस्थेत तो बोलला, 'हे याज्ञसेनि, भीष्म हल्ली क्वचितच बोलतो. सांसारिक गोष्टीत मुळीच लक्ष घालीत नाही. तेव्हा आताच्या प्रसंगावर भीष्म काही बोलेल असे नाही.

भीष्म या राजसभेत बसू लागला त्याला शंभर वर्षे झाली. त्या वेळी स्वतंत्र, निर्भय आणि पूर्वग्रहविरहित अशा ऋषींच्या शिस्तीत समाज चालत असे. हे महर्षी निःपक्षपाती असत. त्यामुळे समाजशासनाचे नियम न्यायाचे असत. समाजशासनाची संहिता पाळावी लागे. आज आपण तोच आदर्श ठेवला पाहिजे. ज्या भूमीत हे महर्षी झाले त्याच भूमीत धृतराष्ट्र राज्य करीत आहे. त्याचे राज्य अनुशासनाची संहिता पाळील असा माझा विश्वास आहे. द्रौपदी, तू शासननिपुण धृतराष्ट्रावर विश्वास ठेव!

भीमा, तुझे आकस्ताळी वर्तन अनुशासनसंहितेत बसत नाही! आत्मसंयमन, शिस्त आणि प्राचीन आदर्शानुसारी वर्तन यातूनच शांतता व स्थैर्य निर्माण होतात. राज्यात अराजक व अस्थैर्य माजावे म्हणून मगधसाम्राज्यासारख्या महाशक्ती टपून बसल्या आहेत. अशा स्थितीत तुझ्या अनुशासनहीन वर्तनास स्थान नाही!'

भीष्माचे हे भाषण संपताच राजा दुर्योधन 'साधु, साधु' असे म्हणाला. त्याचे शतशः प्रतिध्वनी कौरवराजमंडळातून उमटले. □

# काँग्रेस अधिवेशन

## कच्चा दुवा कच्चाच राहिला

वा. दा. रानडे

आणीबाणी चालू राहणार आणि लोकसभा निवडणुका एक वर्ष लांबल्या हेच सामान्य माणसाच्या दृष्टीने चंडीगडच्या कोमागातामारुनगर येथे भरलेल्या काँग्रेसच्या ७५ व्या अधिवेशनातील महत्त्वाचे निर्णय. आणीबाणी किती काळ राहणार, निवडणुका ठरलेल्या मुदतीत होणार की पुढे ढकलणार याबद्दल गेले काही आठवडे निर्माण झालेली अनिश्चितता एकदाची दूर झाली. काँग्रेसला निवडणुकांची भीती वाटते म्हणून निवडणुका पुढे ढकलण्यात आलेल्या नाहीत, निवडणुका आपण सहज जिंकू. असे निरनिराळ्या राज्यांतील काँग्रेसनेत्यांनी मला सांगितले; पण काँग्रेसपेक्षा देशाचे हित अधिक महत्त्वाचे आहे. देशाच्या सुरक्षिततेला अंतर्गत व बाह्य शक्तींपासून निर्माण झालेला धोका दूर होईपर्यंत आणीबाणी उठविता येणार नाही व निवडणुका घेता येणार नाहीत असे आपल्या निर्णयाचे समर्थन पंतप्रधान श्रीमती गांधींनी केले.

अंतर्गत प्रतिगामी शक्ती व बाह्य शक्तींपासून देशाच्या सुरक्षिततेस धोका असल्याचे मोघम आरोप अधिवेशनात करण्यात आले. पंतप्रधानांनी चिली व बांगला देशमधील घटनांचा उल्लेख केला व आरोपांचा पुरावा देण्याची गरज नाही असे सांगितले; पण पुराव्याने आरोपांना अधिक बळकटी येते. प्रतिगामी कटवाल्यांविरुद्ध सरकारने एखादा प्रतीकात्मक खटला भरावा. त्यात ते पुराव्यानिशी दोषी ठरल्यास सरकारची बाजू अधिकच बळकट होईल. पुरावा न देता सरकार विरोधकांवर मोघम आरोप करीत आहे अशी टीका करणारांची तोंडे त्यामुळे बंद पडतील.

आणीबाणी असताना निवडणुका होत नाहीत हे एका अर्थाने लोकशाहीच्या दृष्टीने योग्यच आहे. कारण खुल्या निवडणुकांसाठी आणीबाणीतील निर्बंध उठून निरनिराळ्या पक्षांना व वृत्तपत्रांना लेखनस्वातंत्र्य, भाषणस्वातंत्र्य, प्रचारस्वातंत्र्य वगैरे मूलभूत हक्क मिळाले पाहिजेत. आणीबाणी उठविणे सरकारला सध्या देशहिताचे वाटत नसल्याने निवडणुका पुढे ढकलण्यात येत आहेत. आणीबाणीतही निवडणुका घेता येतात. यापूर्वीच्या निवडणुका आणीबाणी असतानाच झालेल्या आहेत, अशा आशयाचे विधान एका केंद्रीय मंत्र्यांनी काही दिवसांपूर्वी केले. त्यामुळे आणीबाणी चालू ठेवून निवडणुका घेतल्या जाणार काय? अशी शंका निर्माण झाली होती. काँग्रेस अधिवेशनातील ठरावाने ती दूर झाली आहे; पण लोकसभा–निवडणुका पुढे ढकलाव्या की नाही याबद्दल वरिष्ठ काँग्रेसनेत्यांचाही अखेरच्या क्षणापर्यंत निश्चित निर्णय झालेला नव्हता. काँग्रेसकार्यकारिणीच्या मूळ ठरावात निवडणुकांसंबंधी किंवा लोकसभेच्या मुदतवाढीसंबंधी काहीच उल्लेख नव्हता. आणीबाणी चालू ठेवावी एवढीच सूचना त्यात होती; पण विषयनियामक समितीत ठराव मांडताना त्यात आयत्या वेळी ही दुरुस्ती करण्यात आली.

आणीबाणीमुळे लोकसभा–निवडणुका पुढे ढकलल्या; पण सर्वच निवडणुकांबाबत हे धोरण स्वीकारण्याची काँग्रेसनेत्यांची तयारी दिसत नाही. आणीबाणीतील उद्दिष्टे गाठण्यासाठी लक्ष केंद्रित करता यावे असे केंद्र सरकारला खरोखरच वाटत असेल तर सर्वच राज्यांतील विधानसभा व स्थानिक स्वराज्यसंस्थांच्या निवडणुका पुढे ढकलावयास हव्या होत्या. केरळमधील विधानसभा–निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या; पण तामिळनाडूमध्ये निवडणुका घेण्याची मागणी तेथील काँग्रेस प्रतिनिधींनी काँग्रेस अधिवेशनात केली. महाराष्ट्रातील स्थानिक संस्थांच्या निवडणुका पुढे ढकलण्यात आल्या; पण गुजरातेत त्या घेण्यात आल्या. गुजरातच्या निवडणुकाही पुढे ढकलाव्या असे केंद्राने सांगितले असते तर राज्यसरकारने ते निश्चित मानले असते. या प्रश्नावर काही संघर्ष केला नसता; पण या निवडणुकांत आपले बळ अजमावण्याची

आलेली संधी सत्तारूढ कॉंग्रेसला गमवायची नव्हती. या निवडणुकांत आपण विजय मिळविला तर जनताआघाडीत फाटाफूट पडून राज्याची सत्ताही आपल्या हाती येईल असे त्यांचे मनसुबे होते. तामिळनाडूमध्येही कॉंग्रेसला याच उद्देशाने निवडणुका हव्या आहेत. कॉंग्रेस, कम्युनिस्ट, अण्णा द्र. मु. क. यांची आघाडी करून आणि संघटनाकॉंग्रेसचाही एक गट आपल्या बाजूला वळवून तेथे सत्तेवर येण्याचा कॉंग्रेसनेत्यांचा प्रयत्न आहे. सध्याची परिस्थिती त्यासाठी अनुकूल आहे असे त्यांना वाटते म्हणून तेथे निवडणुकांबद्दल त्यांचा आग्रह आहे. केरळमधील निवडणुका पुढे ढकलल्या याचे कारण केवळ आणीबाणी नव्हे. निवडणुकांत आपण बहुमत मिळवू याची खात्री तेथील सत्तारूढ आघाडीला वाटत नव्हती. कारण तोपर्यंत केरळ कॉंग्रेसशी समझोता झालेला नव्हता. लोकसभा-निवडणुका पुढे ढकलल्या जात असतील तर तामिळनाडूच्या निवडणुकाही पुढे ढकलाव्या अशी द्र. मु. क. सरकारची भूमिका आहे; पण आपली सत्तेवर लौकर येण्याची संधी त्यामुळे हुकते म्हणून कॉंग्रेसनेत्यांना ती मान्य नाही. केवळ पक्षीय दृष्टीने विचार न करता आणीबाणीच्या काळात निवडणुकांबाबत सर्वत्र एक धोरण हवे.

राजकीय ठरावावर झालेल्या चर्चेत उपस्थित झालेला दुसरा महत्त्वाचा मुद्दा घटनादुरुस्तीचा. घटनादुरुस्ती आवश्यक आहे; पण लोकांच्या पाठिंब्यानेच ती केली पाहिजे असे मत पंतप्रधानांनी त्यापूर्वी वकिलांच्या परिषदेपुढील भाषणात व्यक्त केले होते. याच मताचा पुरस्कार बहुतेक सर्व वक्त्यांनी केला. पार्लमेंटला घटनेची मूलभूत चौकट बदलण्याचा अधिकार आहे की नाही हा महत्त्वाचा प्रश्न या संदर्भात उपस्थित झालेला आहे. सध्याच्या घटनेत काही दुरुस्त्या करून भागेल की सबंध घटनाच नव्याने तयार करायला हवी याचा विचार करण्यासाठी घटनासमिती स्थापणे हा सर्वांत चांगला मार्ग; पण घटनासमितीच्या निवडणुका, लोकसभेच्या निवडणुका असा वेगवेगळा खर्च करण्यापेक्षा आगामी निवडणुकांनंतर स्थापन होणारी लोकसभा हीच घटनासमिती म्हणून काम करील असे निवडणूकघोषणेच्या वेळीच जाहीर करण्यात यावे. राजकीय पक्षांनी आपल्या निवडणूकजाहीरनाम्यात आपल्या घटनादुरुस्तीच्या कार्यक्रमाचाही समावेश करावा. निवडणूकमोहिमेत घटनादुरुस्ती हाही एक महत्त्वाचा विषय असावा म्हणजे घटनेचा सर्व बाजूंनी विचार होऊन मुख्य दुरुस्त्या कोणत्या हव्यात हे लोकांपुढे येईल व लोक त्या आधारे आपले मत बनवून त्यानुसार प्रतिनिधी निवडतील.

' हे संघटनेचे वर्ष म्हणून पाळले पाहिजे ' असे अध्यक्ष देवकांत बारुआ यांनी आपल्या भाषणात सांगितले. समाजवादी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीसाठी केवळ नोकरशाहीवर विसंबून चालणार नाही. शिस्तबद्ध पक्षसंघटना उभारली पाहिजे यावर त्यांचा भर होता; पण नुसते आवाहन करण्यापलीकडे त्यावर चर्चा झालीच नाही. विस्कळित संघटना, गटबाजी, अंतर्गत हेवेदावे हा कॉंग्रेसचा सर्वांत कच्चा दुवा आहे. कॉंग्रेसच्या फुटीनंतर इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखाली नव्या शिस्तबद्ध पक्षाची उभारणी होईल अशी आशा बाळगणारांचा भ्रमनिरास झाला. जुन्या कॉंग्रेसमधील सर्व दोष नव्या कॉंग्रेसमध्येही आलेले आहेत. आणीबाणीच्या काळातही गटबाजी थांबली नाही. तीन राज्यांचे मुख्य मंत्री बदलणे भाग पडले. अधिवेशनात या गटबाजीबद्दल कोणी एका शब्दाने उल्लेख केला नाही, मग त्याबद्दल नापसंती व्यक्त करणे बाजूलाच राहिले. ही कार्यकर्त्यांची पक्षशिस्तीबद्दलची आस्था! शिस्तबद्ध पक्ष उभारणीशिवाय कोणत्याही कार्यक्रमाची परिणामकारक अंमलबजावणी कठीण आहे. □




हे विवेचन म्हणजे विचारार्थ प्रसृत केलेले एक प्रकट चिंतन आहे

# स्वातंत्र्य म्हणजे काय ?

नरहर कुरुंदकर

'स्वातंत्र्य' या कल्पनेचा धार्मिक, राजकीय, सामाजिक, आर्थिक, वैचारिक असा कोणताही संदर्भ न घेता केवळ एक शुद्ध संकल्पना म्हणून मी कधी विचार केलेला नाही. तशी गरजच भासली नाही. विचारक्षेत्रातील एक भूमिका अशी आहे की, जर आपण भाषेतील एखादा शब्द बिनचूकपणे वापरीत असू तर मग त्या शब्दाचा अर्थ आपल्याला नीट कळलेला आहे असे समजावे. मी निरनिराळ्या संदर्भांत 'स्वातंत्र्य' हा शब्द सतत वापरीत गेलो. तो वापरही सर्वांना मान्य असा राहिला. म्हणून मी असे गृहीतच धरून चालतो की या शब्दाचा वाक्यात बिनचूक असा वापर ज्या अर्थी मी करतो, त्या अर्थी ह्या शब्दाचा अर्थ मला कळलेला आहे.

काहीही कारण नसताना एक दिवस माझ्या असे लक्षात आले की मी वापरत असलेल्या अनेक शब्दांचा अर्थ मला माहीत नाही. अर्थ न समजता जे अनेक शब्द मी वापरीत आलो, त्यांतील 'स्वातंत्र्य' हा एक मोहक शब्द आहे आणि हा एकच शब्द मी अगदी वेगवेगळ्या अर्थांनी वापरीत आलो आहे. केवळ एखाद्या शब्दाचा भाषेतील वापर आपण बिनचूक करू शकतो इतक्या आधारे त्या शब्दामागे असणारा आशय आपणाला समजला हे गृहीत धरणे धोक्याचे आहे. असे सांगतात की विचारवंतांनी 'स्वातंत्र्य' ह्या शब्दामागे असणाऱ्या कल्पनेच्या वेगवेगळ्या अशा दोनशे व्याख्या नोंदवलेल्या आहेत. त्या साऱ्याच समजून घेण्याचा योग मला आलेला नाही; पण सर्व ललितलेखक आणि कलावंत एकाच वेळी कलावंत आणि कलाकृतीच्या स्वातंत्र्याविषयी बोलत असल्यामुळे आणि स्वातंत्र्याच्या नावे स्वतःचे समर्थन करीत असल्यामुळे सर्वच लेखकांना, समीक्षकांना व विचारवंतांना ह्या प्रश्नाचा विचार करणे भाग आहे. एकदा 'स्वातंत्र्य' म्हणजे काय ह्या प्रश्नावर आपण काही तरी विचार करू शकलो म्हणजे त्या आधारे विचारस्वातंत्र्याचाही विचार करता येईल. कलावंताच्या स्वातंत्र्याचाही विचार करता येईल.

मला 'स्वातंत्र्य' ह्या कल्पनेचा विचार करताना असे दिसते की ह्या प्रश्नाचा विचार तीन निरनिराळ्या दिशांनी केला जातो. काहीजण स्वातंत्र्याच्या कल्पनेत 'फ्रीडम ऑफ' आणि 'फ्रीडम टू' असे दोन भाग आहेत असे मानतात. कशाच्या तरी पासून, 'स्वातंत्र्य' ही कल्पना नकारात्मक असून कशाच्या तरी साठी 'स्वातंत्र्य' ही कल्पना भावात्मक आहे असे मानतात. मला ही विभागणी फारशी समाधानकारक वाटत नाही. कारण ह्या ठिकाणी स्वातंत्र्याच्या दोन कल्पना सांगितल्या जात नसून स्वातंत्र्याची एकच कल्पना दोन बाजूंनी पाहिली जात आहे असे वाटते.

मला विचार करण्याच्या तीन दिशा जाणवतात. त्यांपैकी एक दिशा बंधन आणि स्वातंत्र्य यांना परस्परांच्या समोर एकाच सत्तेतील दोन विरोधी कल्पना समजणारी आहे. स्वातंत्र्य म्हणजे काय ? बंधन आणि गुलामगिरीतून सुटका म्हणजे स्वातंत्र्य, हे ह्या पद्धतीचे उत्तर आहे. ज्या पातळीवर आणि ज्या सत्तेत बंधन आहे त्याच पातळीवर स्वातंत्र्यही आहे. ह्यापैकी बंधन ही अभावात्मक, नकारात्मक कल्पना असून स्वातंत्र्य ही भावरूप कल्पना आहे अशी पूर्वग्रहदूषित भूमिका मी स्वीकारणार नाही. 'स्वातंत्र्य म्हणजे बंधनाचा अभाव' हे सांगताना बंधन भावरूप व त्याचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य अशी स्वातंत्र्याची नकारात्मक व्याख्या आपण करतो. पुढे 'स्वातंत्र्य नसणे म्हणजे बंधन' अशी आणखी एक नकारात्मक व्याख्या करून आपण भरपाई करतो. मृताची व्याख्या जिवंत नसणे व जिताची व्याख्या मृत नसणे अशी सांगितल्यानंतर एका कोटीला भावरूप व दुसऱ्या कोटीला अभावरूप म्हणण्यात फारसा अर्थ उरत नाही; पण जर कुणाला पौर्वापर्य पाहून भावअभाव ठरवावयाचा असला तर ते मी मान्य करण्यास तयार आहे. पुनर्जन्माची कल्पना एकदा अमान्य केल्यानंतर जो जन्माला आला तो त्यापूर्वी केव्हा तरी मृत झाला होता असे मानण्याची गरज पडत नाही. जो जन्माला आला तेथून त्याचा आरंभ. हा जन्म, त्या माणसाचे जिवंत असणे मूळचे म्हणजे पूर्वीचे आणि मरण नंतरचे. ह्या मरणाने पूर्वीच्या जिवंतपणाचा अभाव होतो म्हणून जिवंत असणे भावरूप व मरण अभावरूप नकारात्म हा पौर्वापर्याचा मुद्दा झाला. एक कल्पना अशी आहे की मुळात माणूस स्वतंत्र म्हणून जन्माला आला; पण नंतर तो सर्वत्र बंधनात सापडला.

स्वातंत्र्य हे मूळचे स्वाभाविक आणि नैसर्गिक; बंधने ही नंतरची अस्वाभाविक, अनैसर्गिक व म्हणून अयोग्य. आपल्या मूळच्या रूपात माणूस सुखी होता. त्या रूपाकडे परत जाण्याचा त्याला हक्क असला पाहिजे. हे मूळचे स्वातंत्र्य भावरूप आणि बंधने नंतरची म्हणून अभावरूप अशी ही भूमिका आहे. नकळतपणे या भूमिकेच्या मागे पार्श्वभूमी म्हणून धर्म उभा आहे. फक्त धर्माने बंधनाच्या नाशानंतर स्वातंत्र्य सांगितले असते. येथे बंधनाच्या पूर्वी स्वातंत्र्य सांगितले आहे; पण ह्या कल्पनेइतकीच महत्त्वाची दुसरीही कल्पना आहे. ह्या कल्पनेनुसार मानवजातीचा सगळा इतिहास म्हणजे क्रमाने स्वातंत्र्याकडे वाटचाल आहे. ही भूमिका बंधन मूळचे मानते. ते मूळचे असल्यामुळे मागासलेपणाचे, अविकसितपणाचे द्योतक असून क्रमाने येणारे स्वातंत्र्य हे विकसित मानलेले आहे. येथे पूर्वीचे असल्यामुळे बंधन भावरूप मानले

गेले आहे. स्वातंत्र्याचा विचार करताना 'पॉझिटिव्ह-निगेटिव्ह'; 'भावात्म-अभावात्म' ही सगळी परिभाषाच सोयिस्कर होते की काय कोण जाणे !

तत्त्वज्ञानाचे अभ्यासक 'बंधनाचा अभाव' म्हणजे स्वातंत्र्य, ही प्राथमिक व्याख्या विचाराला आरंभ म्हणून नेहमी स्वीकारतात. हाच मुद्दा सांगण्याची एक निराळी पद्धत आहे. ह्या पद्धतीप्रमाणे इच्छानुसारी वर्तनाची पूर्ण संधी म्हणजे स्वातंत्र्य. येथे वर्तन म्हणताना कृती आणि विचार दोन्ही गृहीत आहेत. कारण विचार हे मानसिक वर्तनच आहे. इष्ट काय, अनिष्ट काय ? चांगले काय, वाईट काय ? हिताचे काय, अहिताचे काय ? खरे काय आणि खोटे काय ? याबाबत विचार करण्याचा, निर्णय घेण्याचा व त्यानुसार वर्तन करण्याचा पूर्ण हक्क व्यक्तीला असला पाहिजे. हा हक्क म्हणजेच इच्छानुसारी वर्तनाची पूर्ण संधी. हेच माणसाचे स्वातंत्र्य; पण पूर्ण संधी ही कल्पना केवळ एवढ्याने स्पष्ट होत नाही. समजा, मी माझ्या इच्छेनुसार वागणे इतरांनी दंडनीय मानले नाही; पण दुर्लक्षणीय मानले अगर क्षम्य मानले तर मला पूर्ण संधी मिळाली असे म्हणता येणार नाही. जरी माझी अडवणूक झाली नाही तरी मला पूर्ण संधी मिळत नाही. दंडनीय काय समजावे, क्षम्य काय समजावे हे समाज ठरवितो. समाज मान्य करील त्या परिघात वावरणे इतकाच स्वातंत्र्याचा अर्थ करता येणार नाही.

समाज एखादी बाब क्षम्य व दुर्लक्षणीय मानतो म्हणजे चूकच मानतो व समाजाने माझे वर्तन क्षम्य मानले तरी चूक मानल्यामुळे मला सहकार्य व सहानुभूती गमवावी लागते. माझ्या इच्छानुसारी वर्तनाबाबत समाज क्षमा करणारा असूनच चालणार नाही. समाजाने नुसते उदासीन राहून चालणार नाही,— तर एका व्यक्तीचे इच्छानुसारी वर्तन इतर सर्वांनी समर्थनीय व उचित मानल्याशिवाय मला इच्छानुसारी वर्तनाची पूर्ण संधी मिळाली असे होणार नाही. जेव्हा माझ्या इच्छानुसारी वर्तनामुळे मला प्रतिष्ठा मिळते तेव्हाच मला पूर्ण संधी मिळाली असे म्हणता येईल. ह्याचा सरळ अर्थ हा की, एका व्यक्तीचे पूर्ण स्वातंत्र्य सिद्ध होण्यासाठी इतर सर्वांच्या स्वातंत्र्याचा पूर्ण संकोच गृहीत धरणे भाग असते. इतरांच्या स्वातंत्र्याचा तत्त्वतः तरी पूर्ण अभाव एकाच्या स्वातंत्र्यामुळे होतो. राजकारणात राजांनी, हुकूमशाहीत हुकूमशहांनी ह्या प्रकारच्या स्वातंत्र्याची अपेक्षा स्वतःच्या मनाशी ठेवलेली दिसते.

व्यक्तिस्वातंत्र्याच्या पुरस्कर्त्यांनी हा धोका ओळखलेला होता. त्यामुळेच त्यांनी एका व्यक्तीच्या इच्छानुसारी वर्तनाला इतरांच्या स्वातंत्र्याच्या आड न येण्याची कायम अट घातलेली आहे. ही अट लादून आपण 'स्वातंत्र्य' ह्या कल्पनेचा खून करीत आहो असे मात्र ह्या मंडळींना वाटले नाही. इतरांच्या स्वातंत्र्याच्या आड यावयाचे नाही या भूमिकेचे दोन परस्पर भिन्न अर्थ आहेत. ह्या भूमिकेचा एक असभ्य अर्थ आहे. दुसरा सभ्य अर्थ आहे. तत्त्वज्ञ आणि विचारवंत ह्यांच्या मनात प्रायः सभ्य अर्थ असतो. हितसंबंधीय राजकारणाचे प्रत्यक्ष सूत्रधार ह्यांच्यासमोर पूर्वीच्या शतकात असभ्य अर्थ असे. रशियन राज्यक्रांती आणि तिच्या नेत्यांच्यासमोर व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न नव्हता असा ग्रह अनेकांनी करून घेतला आहे; पण निदान फ्रेंच राज्यक्रांतीचे नेते, अमेरिकन राज्यक्रांतीचे नेते ह्यांच्या समोर तर स्वातंत्र्याची कल्पना होती. फ्रेंच राज्यक्रांती धर्मगुरू आणि चर्च ह्यांच्या दास्यातून समाजाच्या मुक्ततेची प्रतीक्षा करीत होती. १७९१ साली क्रांतिकारकांच्या कायदेमंडळाने असा ठराव केलेला आहे की फ्रान्समध्ये कामगारांना आपल्या संघटना निर्माण करता येणार नाहीत. कारण कामगारांच्या संघटनांचा हेतू मालकांच्या स्वातंत्र्यावर बंधन आणणे हा असतो. स्वतंत्र अमेरिकेच्या शासनाने दीर्घकाळपर्यंत असे मानले होते की नीग्रोंची गुलामगिरी व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध असण्याचे कारण नाही. किमान वेतन कायदा मात्र व्यक्तिस्वातंत्र्याच्या विरुद्ध आहे. स्वातंत्र्य म्हणजे सर्वांना स्वातंत्र्य. जे इतरांना गुलाम करू शकतात त्या जमीनदारांना, त्या उद्योगपतींना, इतरांना गुलाम करण्याचे स्वातंत्र्य. बलवान राष्ट्रांना इतर दुबळ्या राष्ट्रांवर दास्य लादण्याचे स्वातंत्र्य. असा स्वातंत्र्याचा अर्थ करण्यात आला.

राजकारणी पुरुषांनी केलेला 'स्वातंत्र्य' ह्या कल्पनेचा हा असभ्य अर्थ आहे. हा अर्थ असभ्य असला तरी तत्त्वज्ञानदृष्ट्या अगदी तर्कशुद्ध अर्थ आहे. कारण इच्छानुसारी वर्तनाची पूर्ण संधी ह्या भूमिकेतच एकाच्या स्वातंत्र्याच्या पूर्णतेत अनेकांच्या स्वातंत्र्याचा संकोच गृहीत असतो. विचारवंतांना मात्र हे अभिप्रेत नव्हते. ते ज्या वेळी स्वातंत्र्याचा विचार करीत होते त्या वेळी त्यांना सर्वांचे स्वातंत्र्य अभिप्रेत असे. म्हणून एकाचे स्वातंत्र्य दुसऱ्याच्या विरोधी जाऊ नये अशी अट ते लादीत. या अटीचा अर्थ काय ? सर्वांना एकाच वेळी अविरोधी स्वातंत्र्य भोगावयाचे असेल तर प्रथम प्रत्येक व्यक्तीचे हक्क निश्चित करावे लागतील. त्याखेरीज समूहाचे हक्क ठरवावे लागतील. हे हक्क व्यक्तींच्यासाठी कर्तव्य म्हणून साकार होतात. हक्क आणि कर्तव्याच्या या दुहेरी भूमिकेची अंमलबजावणी योग्य असावी म्हणून 'कायद्याचे राज्य' ही कल्पना स्वीकारावी लागते.

इच्छानुसारी वर्तन म्हणजे 'स्वातंत्र्य' इथून आरंभ करून समाज व्यक्तींचे जे हक्क मान्य करील त्या कक्षेत हे हक्क भोगावे व हक्क भोगताना कर्तव्ये पार पाडावीत आणि ह्या दोन्हींचे ग्रथन करणारा कायदा चोखपणे पाळावा. ह्या ठिकाणी यावयाचे हा प्रवासच आपल्या व्याख्येच्या विरुद्ध जाणारा आहे. कारण हा प्रवास व्यक्तींना असणारे हक्क सांगण्याचा प्रयत्न करताना खरोखरी समाजाने व्यक्तींना दिलेले हक्क सांगतो. या हक्कांच्या मर्यादा पुन्हा समाज ठरविणार. अपवादात्मक परिस्थितीत हे हक्क तात्पुरते रद्दही होणार. ह्यातून स्वातंत्र्याची एक वेगळीच व्याख्या निर्माण होते. 'स्वातंत्र्य' म्हणजे काय ?— तर समाजाने व्यक्तींचे जे हक्क मान्य केले व ज्या मर्यादेत मान्य केले ते हक्क त्या मर्यादेत भोगावयास सापडणे म्हणजे स्वातंत्र्य. शुद्ध तात्त्विक भाषेत हा मुद्दा असा मांडता येईल की, बंधने आणि स्वातंत्र्य ह्या कल्पना परस्परविरोधी नसून सुसंगत आहेत. ह्या दोन्ही कल्पना समाज स्वेच्छेने स्वीकारतो त्या वेळी बंधने स्वातंत्र्याचा भाग असतात. ज्या वेळी या दोन्ही कल्पना समाजावर लादल्या जातात त्या वेळी स्वातंत्र्य हा बंधनाचाच आविष्कार असतो. स्वातंत्र्य आणि बंधने या दोन्ही कल्पना व्यवस्थेचा भाग आहेत. या व्यवस्थेकडे उचित म्हणून पाहणारे तिला स्वातंत्र्य मानतील. ह्या व्यवस्थेकडे अनुचित म्हणून पाहणारे एका निराळ्या उचित व्यवस्थेचा पुरस्कार करतील. कारण स्वातंत्र्य

आणि बंधने ह्या कल्पना विरोधी भासतात; पण त्या विरोधी नाहीत.

माणसाला पूर्णपणे इच्छानुसारी वर्तन ठेवणे शक्य आहे का, हा माझ्यासमोरचा प्रश्न नाही. समाजाबाहेर जेव्हा माणूस एकटा असतो, तेव्हा त्याच्यावर आक्रमण करण्यास इतर माणसांचा बनलेला समाज नसतो; पण मानवी समाज नसला तरी अचेतन व सचेतन निसर्ग असतो. प्राणी, पशू व पक्षी असतात. त्यांच्या आक्रमणाची भीती असते. समाजाच्या सह काय किंवा समाजाच्या शिवाय काय केव्हाही माणूस खऱ्या अर्थाने एकटा असू शकत नाही. त्यातल्या त्यात माणूस कळपात असला म्हणजे जास्त सुरक्षित असतो. प्रश्न मानवी समूहात अगर समूहाच्या बाहेर असणाऱ्या माणसाला इच्छानुसारी वर्तन शक्य आहे का हा नसून स्वातंत्र्याची ही कल्पना रास्त आहे का हा आहे. माणूस अपूर्ण आहे म्हणून संपूर्णपणे इच्छानुसारी वर्तन त्याला शक्य होणार नाही, हे मान्य करता येईल. संपूर्ण इच्छानुसारी वर्तन शक्य नाही म्हणून व्यवहारात पूर्ण स्वातंत्र्य शक्य नाही हेही मान्य करता येईल आणि त्यानंतर शक्य ते जास्तीत जास्त स्वातंत्र्य माणसाला मिळवून देता येईल. प्रश्न हा नाही. प्रश्न इच्छानुसारी वर्तन ही स्वातंत्र्याची व्याख्या मानावी काय, हा आहे. इच्छानुसारी वर्तनाचा प्रत्येकाला हक्क आहे ही कल्पना निरपवाद मानली म्हणजे एकाच्या स्वातंत्र्यात सर्वांचे दास्य गृहीत होते आणि जितके शक्य होईल तितके इच्छानुसारी वर्तन रास्त ठरवायचे म्हणजे समाज व राज्य हे हक्क मान्य करणार नाही ते वगळून उरलेल्या क्षेत्रात आपल्या इच्छानुसारी वर्तनामुळे इतरांच्या स्वातंत्र्यावर आघात झाल्यास तो स्वातंत्र्याला अविरोधी आहे असे समजायचे. माझा प्रश्न असा आहे की इतरांची पूर्ण अगर अंशतः गुलामगिरी ज्या स्वातंत्र्याच्या कल्पनेत गृहीत धरावी लागते ती कल्पना एक विचार म्हणून स्वातंत्र्याची कल्पना असू शकते का ?

ह्या ठिकाणी येणारा आक्षेप मी आधीच नोंदवून ठेवतो. एक व्यक्ती आपल्या स्वातंत्र्यासाठी इतरांवर आक्रमण करील असे गृहीत का धरावे ? आक्रमकता ही माणसांमध्ये मूलभूत आणि स्वाभाविक आहे असे का समजावे ? मुळात हा प्रश्न एका धर्मसंबद्ध भूमिकेतून उदयाला येतो. माणूस मूळचा प्रेमळ, सज्जन आणि विवेकशील प्राणी आहे असे निदान केले म्हणजे मूळचा स्वतंत्र माणूस सुखी असल्याचे सांगता येते. आधुनिक विज्ञान ही भूमिका मान्य करणार नाही. माणसाला इच्छानुसारी वर्तनाची मुभा दिली म्हणून काय होणार ? माणसाच्या गरजाच त्याच्या इच्छा ठरविणार. शरीर टिकविण्यासाठी अन्नाची गरज लागणार. ह्या गरजेची जाणीव म्हणजे भूक. भूक लागली की अन्न मिळविण्याची इच्छा निर्माण होणार. ह्या इच्छेला अनुरूप वर्तन म्हणजे अन्न मिळविण्याचा प्रयत्न करणे. माझ्या गरजा, माझे वर्तन ह्यांची इष्टानिष्टता पुन्हा मीच ठरवणार. माझ्या वर्तनाची समर्थनीयता मीच सांगणार. ही परिस्थिती एका अन्नापुरती नसून सर्वच गरजांसाठी असणार. भुकेप्रमाणेच काम हीसुद्धा एक गरज आहे. स्वसंरक्षण ही अशीच गरज आहे. त्यातून भीती निर्माण होते. मला भीती कशाची वाटते, हे मीच ठरविणार. जिथून मला धोका वाटतो ते सारे आक्रमण करून नष्ट करणार व हे माझे करणे योग्य की अयोग्य हेही मीच सांगणार. अन्न, काम, भीती इत्यादी माझ्या गरजांच्या क्षेत्रातील सर्व आक्रमणे इतर सर्वांनी नुसती सह्य मानू नयेत तर समर्थनीय मानावीत, असा याचा अर्थ आहे. 'इच्छानुसारी वर्तनास पूर्ण संधी' ह्या व्याख्येचा कच्चेपणा येथे स्पष्ट होतो.

इच्छानुसारी वर्तन म्हणजे सहजप्रेरणांना अनुसरून वर्तन. ह्या प्रेरणांना जर बंधन घालायचे असेल तर इतरांनी दिलेले इष्ट-अनिष्ट, चांगले-वाईट ह्याचे निर्णय मान्य करणे भागच असते. हे निर्णय नुसते मान्य करून चालणार नाही. व्यक्तीने आपले वागणे इतरांच्या अपेक्षांना अनुसरून ठेवले पण मनाने मात्र जर तो इच्छानुसारी वर्तन हा आपला हक्क मानत राहिला तर तो इतरांचे निर्णय नाइलाजाने मान्य करीत आहे असे मानावे लागते. सहजप्रेरणांना बंधन व मर्यादा असणे रास्त आहे असे मानणारा माणूसच सहजप्रेरणांना आवर घालण्यात आपले स्वातंत्र्य आहे असे मानू शकेल. सगळ्या नीतिशास्त्राचा हा गाभ्याचा मुद्दा आहे. नैतिक मार्गदर्शन व्यक्तीच्या इच्छेला अनुसरून नसते. नैतिक मार्गदर्शनाच्या आधारे व्यक्ती आपल्या इच्छा न्याय्य मानतात. हे नैतिक मार्गदर्शन व्यक्तीच्या इच्छानुसारी वर्तनाच्या विरुद्ध असते. 'माणसाला प्राणिसृष्टीतून वारसाहक्काने मिळालेल्या सहजप्रेरणा आणि जीवशास्त्रीय प्रेरणा ह्यांची निरपवाद अधिसत्ता मान्य करणे म्हणजे स्वातंत्र्य अशी स्वातंत्र्याची अजून एक व्याख्या ह्या विवेचनातून सिद्ध होते.

'बंधनाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य', ह्या व्यक्तिवादी व्याख्येपासून आरंभ करून आपण दोन निर्णयांवर आलो आहोत. एक म्हणजे ही व्याख्या एकाच्या स्वातंत्र्यात सर्वांचे दास्य गृहीत धरते. दुसरे म्हणजे ही व्याख्या सहजप्रेरणांच्या दास्याला स्वातंत्र्य म्हणते. स्वातंत्र्याचा विचार करताना असे आपण दास्याकडे का जातो आहो? मला असे वाटते, हा प्रवास दोन प्रारंभिक चुकांमुळे होतो आहे. पहिली चूक बंधने आणि स्वातंत्र्य म्हणजेच व्यवस्था आणि स्वातंत्र्य ह्या कल्पना परस्पर विरोधी मानण्याची आहे. गुलामगिरी ही जशी एक व्यवस्था आहे, तिच्यात व्यक्तींवर बंधने आहेत, त्याप्रमाणे स्वातंत्र्य हीही एक व्यवस्था आहे व वेगवेगळ्या प्रकारची बंधने स्वातंत्र्यातच गृहीत आहेत, असे मानल्याविना ह्या चौकटीतून आपणाला बाहेर पडता येणार नाही. स्वातंत्र्याची व्याख्या एकदा मी 'उच्चतर व्यवस्थेचा स्वीकार' अशी केली. ही व्याख्या व्यक्तिस्वातंत्र्यविरोधी हुकूमशाहीच्या राजकीय भूमिकेतून जन्माला येते असे काही जणांनी सुचविले. सत्य असे आहे की, व्यक्तिस्वातंत्र्यवाद्यांनी



स्वातंत्र्याची जी व्याख्या केली आहे ती मी मान्य करीत होतो. फक्त त्यांची कल्पना मी वेगळ्या भाषेत सांगत होतो इतकेच. बर्ट्रंड रसेल-सारख्या सूक्ष्म तर्काच्या आणि कुशाग्र बुद्धीच्या व्यक्तीला स्वातंत्र्य आणि संघटना ह्या कल्पना परस्परविरोधी वाटाव्या हे आश्चर्य नव्हे काय ? जणू दास्याचीच संघटना असते आणि स्वातंत्र्याला संघटना नसते.

दुसरी चूक व्यक्तीचा समाजनिरपेक्ष विचार करण्याची आहे. समाजाचा संदर्भ ध्यानात न घेता समाज विसरून व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा विचार करता येईल असे आपण मानतो. समाजाने मान्य केलेले व्यक्तीचे हक्क इतकेच व्यक्तीच्या स्वातंत्र्याचे रूप असते हे आपण विसरतो. स्वातंत्र्य व्यक्तीच्या सुरक्षिततेच्या विरोधी नसते. समाजव्यवस्था आणि सुरक्षितता या सर्वांच्या विरोधी जर स्वातंत्र्य असेल तर मग ते कुणालाच भोगता येणार नाही. एरिक फ्रॉम ह्याने स्वातंत्र्याचा असा विचार केला आहे. त्याला असे वाटते की माणसाला स्वातंत्र्याची भीती वाटते. आपल्या दुबळेपणाच्या, एकाकीपणाच्या जाणिवेमुळे माणूस सुरक्षिततेकडे वळतो. मग ते, धोक्यापासून पलायन असावे त्याप्रमाणे 'फ्रीडम फ्रॉम'चा विचार करू लागतात व यापेक्षा निराळे 'फ्रीडम टू' असे काही आहे, असे प्रतिपादन करतात. विचारस्वातंत्र्य हे एकमेव स्वातंत्र्य असून विचार करणारांचे स्वातंत्र्य हा भ्रामक मुद्दा आहे असे काही आपण मानू शकतो काय ?

विचारस्वातंत्र्य हे महत्त्वाचे स्वातंत्र्य आहे हे तर मी मानतोच; पण ती सर्व स्वातंत्र्याची परिपूर्णता आहे असेही मी मानतो; पण हे विचारस्वातंत्र्य विचार करणाऱ्याला गुलाम करणाऱ्या बाबी संपवून निर्माण करावे लागते. व्यक्तीला सुरक्षितता देऊन व दिल्यामुळे, व्यक्तीचे हक्क मान्य करून व मान्य केल्यामुळे व्यक्तीच्या हक्कांवर आक्रमण होणार नाही अशी काळजी घेऊन व ती घेतल्यामुळे स्वातंत्र्य निर्माण होत असते. व्यवस्थाविरोधी स्वातंत्र्य हा जसा व्याज तर्कवाद आहे त्याप्रमाणेच सुरक्षितताविरोधी स्वातंत्र्य हाही व्याज तर्कवाद आहे. वर सांगितलेल्या दोन्ही प्रारंभिक चुका टाळून जर आपण स्वातंत्र्याची व्याख्या करू शकलो तरच ती गुलामगिरीच्या विरुद्ध होईल.

कलावंतांच्या अभिव्यक्ति-स्वातंत्र्याच्या संदर्भात हा मुद्दा असा मांडावा लागेल : ज्या वेळी कलावंत सहजप्रेरणांच्या गुलामगिरी-विरुद्ध असतात आणि नव्या उच्चतर व्यवस्थेचा पुरस्कार करण्या-साठी झटत असतात त्या वेळी ते अभिव्यक्ति-स्वातंत्र्याचा हक्क वाप-रीत असतात. इतर वेळी ते सहजप्रेरणांचे दास्य आपल्या उदाहर-णाने सिद्ध करीत असतात.

बंधनाचा अभाव म्हणजे स्वातंत्र्य, ह्या विचारपद्धतीला जर लेबलच लावावयाचे असेल तर हिला आपण स्वातंत्र्याचा विचार करण्याची नीतिमुक्त पद्धत म्हणू.

स्वातंत्र्याचा विचार करण्याची ह्याहून निराळी अशी दुसरी पद्धत आहे. ह्या पद्धतीचे आद्यगृहीतकृत्य शरीर आणि इंद्रिये ह्यांच्यापासून निराळा असा एक आत्मा असतो हे आहे. सर्व धार्मिक विचारांमध्ये वेगवेगळ्या भाषांत ह्या पद्धतीने स्वातंत्र्याचा विचार मांडलेला असतो. हा जो देहभिन्न असणारा आत्मा (काहीजणांच्या मते जीव) बंधनात अडकलेला असतो ह्या बंधनाला कुणी अविद्या म्हणतात. कुणी मोह, ममत्व, माया, मूलपाप असे नाव देतात. हा बंधनात अडकलेला जीव इंद्रियांचा गुलाम असतो. शरीराच्या गरजांचा म्हणजे वासनांचा दास असतो. या गुलाम जीवाची आणि गुलाम मनाची प्रवृत्ती इंद्रियाला अनुकूल असा तर्क व युक्तिवाद करण्याची असते. या गुलामगिरीतून मुक्त झाल्याशिवाय माणूस खऱ्या अर्थाने मुक्त होतच नाही. ह्या विचारपद्धतीत बंधन एका सत्तेत असते. अद्वैतवेदांताच्या पद्धतीने सांगायचे तर बंधन व्यावहारिक सत्तेत असून स्वातंत्र्य पार-मार्थिक सत्तेत असते. साऱ्या स्वार्थाचा मोह सोडून जेव्हा मन स्वार्थ-निरपेक्ष, निर्मळ आणि शुद्ध होईल तेव्हा ते खरोखरी स्वतंत्र होईल. (ह्या धार्मिक भूमिकेतील एक अंश सर्वांनी मान्य केलेला आहे. सहजप्रेरणांना आवर घालणे, मुरड घालणे, त्यांना मर्यादित ठेवणे ह्या मार्गांनी माणूस संस्कृती निर्माण करतो. ही संस्कृती निर्माण करतानाच तो स्वातंत्र्याकडे जातो ही कल्पना सर्वांनी मान्य केलेली आहे.) शंकराचार्यांच्या अद्वैतदर्शनात मोक्षाची कल्पना सांगताना अतिशय रेखीवपणे ह्या स्वातंत्र्याची कल्पना सांगितलेली आहे. इहलोकी आणि परलोकी जे हितसंबंध गुंतलेले आहेत, जी फल-भोगाची इच्छा आहे त्यांच्याविषयी पूर्ण वैराग्य आले म्हणजे मोक्ष-चिंतनाला आरंभ होतो व मी देह नव्हे ही जाणीव पक्व होऊन, आत्म्याचा देहभिन्नत्वाने साक्षात्कार झाला म्हणजे मोक्ष मिळतो, हेच स्वातंत्र्य आहे.

शंकराद्वैतापेक्षा जडवादी सांख्याची स्वातंत्र्याची कल्पना अधिक निर्दोष आणि परिपूर्ण आहे; पण तिची आज उपलब्ध असणारी मांडणी पुरेशी तर्कशुद्ध नाही. सांख्यदर्शनाचा एक महत्त्वपूर्ण भाग आज गहाळच असल्यामुळे एके काळी वेदान्ताचे प्रधान विरोधक असणारे हे दर्शन आपल्या मूळ रूपात स्वतःची मांडणी कशी करीत असे हे अनुमानाने समजणेसुद्धा कठीण झालेले आहे. उरलेल्या सर्व स्वतः द्वैती म्हणविणाऱ्या अगर न म्हणविणाऱ्या द्वैती दर्शनांत आणि एकदेववादी दर्शनात वैराग्याचा उपदेश आहे. इहलोकीच्या सगळ्या बंधनांपासून, ममत्वापासून मोकळे होण्याचा आदेश आहे. व्यवहारात धर्मप्रधान जगाचा व्यवहार कसाही असो—पण तत्त्वज्ञान म्हणून सारेच धर्म माणसाला विरागी व स्वार्थमुक्त होण्याचा उपदेश कर-तात. सहजप्रेरणांच्या दास्यातून माणूस मोकळा व्हावा ही धार्मिक तत्त्वज्ञानाची धडपड असते; पण द्वैती व देववादी दर्शन इहलोकीच्या भौतिक दास्यातून मुक्त होऊन विनाअट, निरपवाद आणि निरपेक्ष असे ईश्वरी दास्य स्वीकारण्यास सांगतात. ही ईश्वरी दास्याची प्राप्ती, ह्यालाच ही धार्मिक दर्शने स्वातंत्र्य मानतात. जगातील बहुतेक धर्म आणि धार्मिक तत्त्वज्ञाने अशी आहेत. ती अनुचित दास्याला (म्हणजे इहलोकातील व्यक्तीच्या स्वार्थप्रेरणेला) गुलाम-गिरी मानतात, पाप मानतात व उचित दास्याला (म्हणजे ईश्वराच्या दास्याला) सुटका व स्वातंत्र्य मानतात. जणू गुलाम असणे हे न टळणारे भवितव्य असून निवड फक्त कुणाचे गुलाम व्हावे इतकीच आहे. ईश्वर आहे का ? असल्यास त्याचे नाव विष्णू, कृष्ण, राम, शिव, अकाल, अल्लाह, प्रभू आहे की आणखी काही निराळे आहे ? मृत्योत्तर अस्तित्व आहे का ? मोक्षाचे स्वरूप काय ? तो तरी खरा आहे काय ? इत्यादी प्रश्नांत मला येथे शिरायचे नसून बहुतेक

धार्मिक दर्शने ह्या एक प्रकारच्या दास्याला स्वातंत्र्य मानतात, इतकीच येथे नोंद करावयाची आहे.

शांकर अद्वैती, मूल बौद्धदर्शन, सांख्य इत्यादी दर्शनांत मोक्षाचे म्हणजे स्वातंत्र्याचे स्वरूप ह्याहून निराळे आहे. तिथे ईश्वराची कृपा किंवा त्याचे दास्य दार्शनिक मांडणीत अपरिहार्य नाही. बौद्धदर्शनात तृष्णेचा कंद मुळातून छेदला गेल्यामुळे कर्माची गती थांबते व शून्यात सगळा लय होतो, हाच मोक्ष आहे. शांकर अद्वैतात निर्गुण-निराकार ब्रह्माशी एकरूप व्हायचे असते. म्हणून ह्या दोन्ही दर्शनांत एकाचे पूर्ण स्वातंत्र्य हा दुसऱ्याच्या स्वातंत्र्याला अडथळा नसतो. प्रत्येकाचे पूर्ण स्वातंत्र्य एकाच वेळी एकमेकांशी अविरोधी राहून संभवते; पण ह्या स्वातंत्र्यात इतरांचे दास्य नसले तरी स्वतःचा पूर्ण लय आहे. जेव्हा मन इंद्रियांचे गुलाम असते तेव्हा स्वार्थ असतो, तृष्णा असते. तेव्हा आपण पण बंधनात असतो. जेव्हा आपण स्वतंत्र होतो तेव्हा आपण नसतोच. गुलाम असणे किंवा पृथक्त्वाने अस्तित्वच नसणे ह्या दोन कोटी आहेत. अद्वैत आणि बौद्धदर्शनाची स्वातंत्र्याची कल्पना अशी विलक्षण आहे की स्वातंत्र्य मिळताना अस्तित्वच संपते.

सांख्याची कल्पना मात्र ह्याहून निराळी आहे. ह्या ठिकाणी मोक्ष मिळताना इहलौकिक बंधनाचा निरास होतो. आपण स्वतंत्र होतो, तरी शिल्लक राहतो, नष्ट होत नाही. सांख्यदर्शनातील मोक्षात स्वतःचा लयही नाही, दास्यही गृहीत नाही. म्हणून स्वातंत्र्याची ही कल्पना अधिक निर्दोष म्हटलेली आहे; पण आज ह्या दर्शनाचा जो भाग शिल्लक आहे तो आपण बंधनात का पडतो हेही सांगत नाही, मुक्त कसे होतो हेही सांगू शकत नाही. मूळ सर्गाचे कारण व हेतूच सांख्यतत्त्वज्ञानात अस्पष्ट झाला आहे.

ईश्वरी दास्य आणि अस्तित्व संपणे या स्वातंत्र्याच्या दोन प्रमुख कल्पना धर्मांनी आपल्या समोर ठेवलेल्या आहेत. माझी वृत्ती धार्मिक नसल्यामुळे मला ह्यांपैकी एकाही कल्पनेचे आकर्षण नाही. जे धर्म-श्रद्ध आहेत त्यांना कोणतीही कल्पना स्वीकारण्याचे संधि-स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्याविषयीच्या या कल्पनेबाबत माझी मुख्य अडचण ही आहे की ह्या ठिकाणी स्वातंत्र्य ही विकासाची संधी नाही, विकासाची हमी नाही. व्यक्ती आणि समाज ह्यांपैकी एकाच्याही प्रगतीला अगर विकासाला ह्या स्वातंत्र्याचा उपयोग नाही. कारण सगळा विकास व प्रगती पूर्णपणे जिथे संपते तिथे स्वातंत्र्य आहे. स्वातंत्र्याविषयी विचार करण्याच्या ह्या पद्धतीला स्थूलपणे 'लोकमुक्त' विचारपद्धती म्हणता येईल. (लोक म्हणजे 'इंद्रियाधिष्ठित पुराव्याच्या कक्षेत येणारा प्रपंच' असा अर्थ शंकराचार्यांच्या विवेचनात आलेला आहेच.)

कलावंताच्या अभिव्यक्ति-स्वातंत्र्याच्या संदर्भात हा मुद्दा असा मांडता येईल : ज्या वेळी कलावंत व त्याची कला सहजप्रेरणा व इहलोक ह्यांच्या विरोधी झगडत असतात त्या वेळी ते स्वातंत्र्यासाठी प्रयत्नरत असतात. कलावंताची अभिव्यक्तीची इच्छा संपते तेव्हा तो स्वतंत्र होतो.

'स्वातंत्र्य' या कल्पनेचा विचार करण्याची अजून एक तिसरी पद्धत आहे. ही पद्धत धार्मिक दर्शनांप्रमाणे प्रकृतीच्या व्यूहाला बंधन मानीत नाही. व्यक्तिवादाच्या पद्धतीप्रमाणे संस्कृतीच्या व्यूहालाही बंधन मानीत नाही. संघटना विरुद्ध स्वातंत्र्य, सुरक्षितता विरुद्ध स्वातंत्र्य, व्यक्ती विरुद्ध समाज अशी खोटी द्वंद्वे ही विचारपद्धती मान्य करीत नाही. ह्या विचारपद्धतीचा प्रमुख आधार सत्य असतो. वास्तवाचे निर्दोष आकलन म्हणजे सत्य. ह्या सत्याचा नैतिक वापर म्हणजे स्वातंत्र्य. अशी ह्या विचारपद्धतीने स्वातंत्र्याची व्याख्या केली आहे. समाजवाद्यांची स्वातंत्र्याचा विचार करण्याची ही पद्धत आहे; पण सहसा समाजवादी विचारवंत प्रश्न मांडावयाची व उत्तरे देण्याची माझी पद्धत मान्य करणार नाहीत. कारण ते विचारतील मी ह्या ठिकाणी नैतिक म्हणजे काय हे सांगितलेले नाही. ते सरळ सांगता येणेही सोपे नाही. स्वातंत्र्य ही कल्पनाच नैतिक आहे. ती एक सांस्कृतिक कल्पना आहे. 'भययुक्त समाजात भयमुक्त माणूस' म्हणजे स्वातंत्र्य. ह्यातील 'भय' हा मुद्दा महत्त्वाचा आहे. स्वातंत्र्य हे सगळ्या नैतिक विचारांचे आद्य अधिष्ठान आहे. 'इमॅन्सिपेशन ऑफ मॅन' ह्या भाषेत हा मुद्दा सांगितला जातो. स्वातंत्र्य हीच जर एक नैतिक कल्पना असेल तर 'सत्याचा स्वातंत्र्यासाठी वापर' अशी शब्दरचना अधिक योग्य ठरेल. मी स्वतः न्याय, समता, स्वातंत्र्य ह्या सगळ्याच कल्पना नैतिक मानतो, परस्परसंलग्न मानतो. म्हणून मी 'सत्याचा नैतिक वापर' अशी शब्दरचना केली आहे.

मला वाटते स्वातंत्र्याबद्दल विचार करताना ह्या पद्धतीत सत्य हा मुद्दा मध्यवर्ती होतो. सत्य म्हणजे काय ? तर वास्तवाचे निर्दोष आकलन. वेगवेगळ्या बाजूंनी पाहताना वास्तवाचे वेगवेगळे पैलू दिसतात. अग्नी अंधारात प्रकाश देतो हा एक पैलू आहे. थंडीत ऊब देतो हा दुसरा पैलू आहे. अन्न पचण्यास सुलभ करतो हा एक पैलू आहे. धातू वितळवितो हाही एक पैलू आहे. शिवाय अग्नी जाळतो. हे सर्व पैलू निर्दोषपणे जाणणे म्हणजे सत्य. हे सत्य सर्व समाजाला भयमुक्त करण्यासाठी वापरणे म्हणजे स्वातंत्र्य. ही स्वातंत्र्याची व्याख्या प्रथमदर्शनी वेडगळपणाची आणि ओबडधोबड अशी वाटते;


पॅपिलॉन
पॅपिलॉन

लेखक : हेन्री शॅरीयर
अनुवाद : रवींद्र गुर्जर

किंमत : पंचवीस रुपये
राजहंस प्रकाशन, पुणे ३०

पण ती सर्वांत व्यापक आणि मार्मिक व्याख्या आहे. ही व्याख्या प्रथमदर्शनी ओबडधोबड वाटते ह्याचे कारण वास्तव म्हणजे काय, ह्याबाबत आपली कल्पना निर्दोष नाही.

माणूस स्वतःच एक वास्तव आहे आणि तो वास्तवाने वेढलेलाही आहे ज्या वास्तवाने तो वेढलेला आहे त्या वास्तवाचाच तो भाग आहे. हे वास्तवच मुळात तीन प्रकारचे आहे : पहिले वास्तव प्राकृतिक वास्तव आहे. हे प्राकृतिक वास्तव जमीन, पाणी, हवा, अग्नी, धातू असे जडही आहे. वनस्पतिजगातील सजीवही आहे प्राणी, पशुपक्षी असे सचेतनही आहे. माणूस स्वतःच त्या वास्तवाचा भाग आहे. आपल्या गरजांच्या पूर्तीसाठी तो हे वास्तव वापरीत असतो. ह्या वास्तवाचा वापर करताना माणूस वास्तवावर संस्कार करून त्याचे रूप बदलतो. मातीची वीट करतो विटेचे घर करतो. प्राण्यांची शिकार करतो, त्याचे अन्न करतो. हे वास्तवावर संस्कार करतानाच तो स्वतःही संस्कारित होत असतो–बदलत असतो. वास्तवाला आकार देतानाच माणूस स्वतःलाही आकार देत असतो.

पण माणसाला घेरणारे हेच एक वास्तव नाही. ह्याखेरीज माणसाने निर्माण केलेले दुसरे सामाजिक वास्तव आहे आणि तिसरे सांस्कृतिक वास्तव आहे. प्राकृतिक वास्तवाला आकार देतानाच ही दोन वास्तवे माणूस निर्माण करतो. या निर्मितीच्या प्रक्रियेतूनच माणसाचे माणूसपण निर्माण होते. या तीन पातळींनी घेरलेल्या माणसाची सर्व भीती ह्या घेरणाऱ्या वास्तवातून जन्म घेते आणि सर्व आशा-आकांक्षांचा उदयही तेथूनच होतो. कारण ह्या सगळ्याच व्यवस्था आहेत. ह्या व्यवस्था आपापले नियम पाळतात. स्वतः माणूस हीच एक व्यवस्था आहे. त्याला डोळ्याने पाहून अन्नाचा शोध घ्यावा लागतो. हाताने अन्न गोळा करावे लागते. तोंड त्या अन्नाचा स्वीकार करते. पोट अन्नाचे रक्तात रूपांतर करते. ही व्यवस्था असते तोपर्यंतच माणूस आपले अस्तित्व टिकवू शकतो. ह्या सगळ्या वास्तवाचे निर्दोष आकलन करून त्याचे गतिनियम शोधावे लागतात. ह्या वास्तवात भीतीचे उगम शोधून त्यावर उपाय सांगावा लागतो. माणसाला भीतियुक्त करतानाच वास्तवाची सारी रचना बदलते. नवी व्यवस्था येते. ही नवी व्यवस्था उच्चतर ह्यासाठी म्हणायची की माणसाच्या शक्य त्या आशांच्या पूर्ततेची इथे हमी असते.

भाषा शब्दांची आणि वाक्यांची बनलेली असते. कोणता अर्थ सांगण्यासाठी कोणता शब्द वापरावा हे बंधन पाळल्यामुळे,वाक्यांच्या रचनेचे बंधन व नियम पाळल्यामुळे विचाराचे स्वातंत्र्य मावळत नसते. विचाराचे स्वातंत्र्य सुरक्षित राहून त्याचे निवेदन शक्य होत असते. व्यवस्था स्वातंत्र्य संपवितेलच, हा विचार एक असत्य आहे. माणसाला पंगू करून स्वतंत्र करता येत नाही. भयभीत करून स्वतंत्र करता येत नाही. भयमुक्त करूनच स्वतंत्र करता येते.

ह्या विचारपद्धतीचे प्रमुख वैशिष्ट्य ह्यात आहे की इथे समाज विरोधी व्यक्ती ह्या द्वंद्वाचा परिहार माणसाच्या हितासाठी, समाज व समाजाच्या हितात माणसाचे हित असा होतो. संघटना विरुद्ध स्वातंत्र्य या द्वंद्वाचा परिहार स्वातंत्र्याच्या रक्षणार्थ संघटना असा होतो. सुरक्षितता विरोधी स्वातंत्र्य ह्या द्वंद्वांचा परिहार सुरक्षिततेच्या हमीमुळे स्वातंत्र्य असा होतो. या साऱ्या द्वंद्वांचा परिहार करूनही ही विचारपद्धती मानवी स्वातंत्र्याचा पुरस्कार करते; संपूर्ण स्वातंत्र्याचा पुरस्कार करते.

मानवी इतिहासात वेळोवेळी असे दिसले आहे की, माणसां[ना] स्वातंत्र्य आणि सुरक्षितता असा प्रश्न निर्माण झाला तेव्हा चमत्कारिक वर्तन केले आहे. अपवादभूत व्यक्ती सुरक्षिततेचा त्याग करून स्वातंत्र्याच्या वेदीवर बळी गेल्या; पण नियम म्हणून, समाज स्वातंत्र्याचा अव्हेर करून सुरक्षिततेकडे वळले. म्हणून एक प्रश्न निर्माण झाला तो हा की माणूस स्वातंत्र्याला इतका का घाबरतो? फार मोठ्या मंडळींनी हा प्रश्न उपस्थित केलेला असल्यामुळे ती व्याजप्रश्न आहे, हे लवकर समजत नाही. माणसाची सुरक्षितता मावळत जाते तसतसा तो गुलाम होतो. सुरक्षितपणा काढून घेऊन देण्यात येणारे स्वातंत्र्य हे गुलामीचेच दुसरे नाव असते. सुरक्षितता हे नाव घेऊन येणारे दास्य व स्वातंत्र्य हे नाव घेऊन येणारे दास्य ह्यात माणसाला निवड करता येत नाही. कारण दास्यात त्याची सुरक्षितता व स्वातंत्र्य, दोन्ही गमवावी लागतात. माणूस सुरक्षितता आणि स्वातंत्र्य ह्यांतून सुरक्षिततेची निवड करतो, ह्या विधानाचा खरा अर्थ इतकाच आहे की माणूस अपरिचित दास्याला पाहून भांबावतो व परिचित दास्य सवयीचे असल्याने जतन करू बघतो.

स्वातंत्र्याचा विचार करताना नकळत शरीर व आत्मा ह्यांचा परस्परभेद मानणारे अध्यात्म आपल्या मनात वावरत असते. त्यामुळे सुरक्षितता शरीराची व स्वातंत्र्य मनाचे हा भेद आपण करून ठेवतो आणि माणसाच्या स्वातंत्र्याला स्वातंत्र्य समजण्याऐवजी विचार-स्वातंत्र्य हा स्वातंत्र्याचा गाभा समजतो. विचारस्वातंत्र्य हे सुरक्षित व्यक्तित्वाचे फलित असते, हे विसरण्याची सवय ह्यामुळे लागते. काही-जण असे म्हणतात की स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता असेल तरच विचारस्वातंत्र्याला अर्थ असतो. जणू एकाचा विचार दुसऱ्याला पटणे, अनेकांचा विचार एकसारखा असणे हा गुन्हा आहे.

विचार करण्याच्या ह्या पद्धतीला स्वातंत्र्याची भयमुक्त व्याख्या करण्याची पद्धत असे म्हणता येईल. कलावंतांचे स्वातंत्र्य ही कल्पना ह्या पद्धतीप्रमाणे स्पष्ट करावयाची असेल तर अशी करता येईल : जेव्हा कलावंत भयमुक्त समाज निर्माण करण्यासाठी झगडत असतात तेव्हा स्वतःच्या स्वातंत्र्याचे जतन करीत असतात. कलावंतांना समाज आणि व्यक्तींच्या पूर्ण स्वातंत्र्यात स्वतःचे स्वातंत्र्य शोधावे लागते. स्वातंत्र्य निसर्गात सुटे असे कुणालाच मिळत नाही, ते झगडून मिळवावे लागते.

'स्वातंत्र्य' या कल्पनेचा विचार करण्याच्या मला तरी ह्या तीन पद्धती दिसतात. ह्यांतील नीतियुक्त पद्धत बंधनाचा अभाव सांगताना उच्चतर व्यवस्थेचा पुरस्कार करू लागते. लोकमुक्त पद्धत प्रकृतीच्या बंधनातून मोकळे होण्यासाठी उपासनेची व्यवस्था सांगू लागते. भीतिमुक्त पद्धत तर स्वातंत्र्य हीच एक व्यवस्था आहे असे मानते. ह्यांपैकी कोणती पद्धत सत्याच्या जवळ आहे? मी भीतिमुक्त पद्धतीचा पुरस्कर्ता आहे; पण हा मुद्दा गौण आहे. कोणत्याही पद्धतीने स्वातंत्र्याचा विचार करताना आपण व्यवस्थेजवळ येतो हा मुद्दा महत्त्वाचा आहे.

हे विवेचन म्हणजे विचारार्थ प्रस्तुत केलेले एक प्रकट चिंतन आहे. कोणताही अभिनिवेश असणारी शिस्त मी पुरस्कारलेली नाही. हे प्रकट चिंतन सर्वांच्या समोर ठेवण्याचा माझा मुख्य हेतू माझ्या विवेचनातील त्रुटी समजून घेण्याचा आहे. □

**[ समाज प्रबोधन पत्रिका, नोव्हेंबर-डिसेंबर १९७३ या अंकावरून पुनर्मुद्रित ]**

# नुकसान भरपाई!



● सौ. मंदा विजय टेंबे ●

चेन्ना हातातल्या नोटांकडे किती वेळ तरी पहात होती. त्या किती आहेत त्या मोजण्याचेहि भान तिला नव्हते. त्या पांढरी टोपीवाल्याने नीट मोजायला सांगितल्या होत्या. म्हणाला होता, 'आता आण ह्याची मीठमिरची. पोटाची ददात तरी मिटेल पंधरा दिवस...'

पोटाची ददात ! चेन्नाच्या कानात ते शब्द घण मारल्यासारखे घुमू लागले. होय. हे पोटच शेवटी साऱ्याचं कारण...हे पोटच जाळायला हवं म्हणून...ह्या पोटात काटेकुटे नाही तर मेला कचरा भरता आला असता तर...

आज सहा महिन्यांनी सरकारला जाग आली हीती, तीनशे रुपड्या पाठवायची. अनेकांना अशाच तीनशेच्या नोटा वाटीत तो पांढरी टोपीवाला गेला असेल. हे तीनशे रुपये किती दिवसांची ददात मिटवणार ? अन् ह्या तीनशे रुपयांनी झालेलं काय भरून निघणार होतं थोडंच ? हेच तीनशे रुपये आधी वाटायची सरकारला अक्कल आली असती तर पोरगं पोटभर भाकरी खाऊन पंधरा दिवस तृप्त झालं असतं.

पोरगं...ग्यानू ऽ...ग्यानबा ऽ तिनं सभोवार पाहिलं. ग्यानूची फाटकी विजार अन् शर्ट अजून खुंटीवर लोंबत होता अन् खिळयाला दप्तर. त्यातून पट्टी डोकावत होती. ग्यानबा अगदी नावासारखा. 'शाळंची' त्याला किती आवड ! पोटाला नसलं तरी बी चालल पण शाळा नाय चुकवायचा. पाटीला प्राणापरीस जपायचा; पण मीच मेली चांडाळीण ! त्याला त्या दिवशी पाठवला भाकरी पण खाल्लीन नव्हती. बिचारा मान मोडून पेन्शिलीनं पाटीवर काहीबाई लिहीत होता तर मीच बकुटं धरून वढला अन् म्हटलं, 'पुरा कर तुझ ते शिक्षान ! पाटीवर लिहून पोटा नाय भरत. घासलीट आलंय तर रांगात जावून नंबर लाव !' तर बिचारं म्हणालं, 'आये! एवढं सुद्धलेखन काढतो अन् जातो' तर 'जल्ला तुझा सुधलेखन' म्हणत हातात डबडं देऊन धाडलाच!

सकाळी-सकाळीच लंगडुनाना झोपडीच्या दारातून वराडत गेला, 'घासलीट आलंय वो, नाक्यावर नंबर लावा!' अन् नंबर लावायला ग्यानू गेला. डबडं हालवीत-झुलवीत जाणारी एवढीशी चेडवाला बघून पोटात तुटलं. वाटलं रांगात किती घंटं उभं राहावं लागतं कोणास ठावूक ? भाकर तरी पोटात जायला हवी होती पोराच्या. मोठ्यानं हाकारलं तर कवाच हाकेपलीकडे गेला होता ग्यानू गोफणीतल्या ढगडागत...अन् भाकर तरी होती कुठं घरात द्यायला...

तीन-चार दिवस घरात दिवटी पण पेटली नव्हती. लाकूडफाटा मिळंना म्हणून पदरचे पैसं खर्चून स्टो घेतला. चाय पटकन् व्हायची. कधीमधी भात बी उकडायला बरं पडायचं. अन् सौसाराला हातभार म्हणून कचेरी-शाळा सुटायच्या वेळेला नाक्यावर भजी बी तळायला

बसायची मी ! थोडी चिल्लर गाठीला जमायची; पण आज पंधरा दिवस ' स्टो ' चा बी खडखडाट ! काय झालं व्हतं सरकारला ते त्यालाच म्हाईत ! अख्ख्या म्हम्हईत बी म्हणं घासलीटचा थेंब बी नव्हता...

अन एकदम सकाळी-सकाळी वळवाच्या पावसासारखं घासलीट आल्याचं एकाएकी कळल अन् जो तो गावल ते डबडं घेऊन नाक्यावर पळाला. त्यातच माझा ग्यानू...

बारा वाजल. उन्हा निबरली; पण ग्यानूचा पत्त्याच नव्हता! पोरगं भुकेनं कळवळलं असेल म्हणून आपुनच जावं म्हणून निघाले तो घरासमोर ह्यो गलका. दोघं-तिघं ग्यानूला उचलून आणीत होते. ग्यानूला रांगत भुकेनं झीट आली की काय असं वाटून पोटात गलबललं नि पुढ झाले तो काय ? ग्यानूचा शर्ट रक्तात भिजलेला ! ओरडत जाऊन त्याला उराशी कवळला तर माझा पदरबी रक्तात चिंब भिजला ! चोच वासणाऱ्या पाखरागत ग्यानू तोंड करीत होता. मध्येच आयेऽआयेऽ म्हणत होता. पुढं काय झालं ते कळलंच नाही. सुद आली तो माह्याभोवती घोळका! जो तो टकाटकाऽऽ बघतोय अन् बायाबापड्या कोंडाळं करून कुजबुजतायत. अन् मग लख्खन सारं ध्यानांत आलं.

घासलेटच्या रांगात हमरीतुमरी झाली. दंगा झाला. खेचाखेचीत कुणी तुडवलं गेलं. सोड्याच्या बाटल्यांचा खच पडला. रक्ताचं थारोळं झालं. दंगा पांगवायला पोलिसगाडी आली; पण घासलीटसाठी आलेले लोक सरकारला बधेनात. लाठीमार झाला. वायूची नळकांडी फुटली; पण दंगा जास्तच पेटला ! भोसकाभोसकी झाली अन् सरकारच्या माणसांनी बंदुकीच्या फेरी झाडल्या.

त्यातलीच एक गोळी ग्यानूच्या पोटात आरपार गेली अन् कोथळाच बाहेर आला. दवाखान्याची गाडी आली पण हॉस्पिटलमध्ये नेतानेताच पोरानं डोळे मिटले...मिटले ते कायमचेच...अन् उपाशीपोटी...

दोन बाटल्या घासलीटासाठी जीव गमावून बसला, ग्यानू गेला...पाटीदप्तर मागं ठेवून...आयशीला मागं ठेवून...अशीच कवा तरी घासलीटाच्या नाय तर मिलोच्या रांगंत उभं राहून सरकारची गोळी खायला हातावर हात चोळून तळतळाट केला. या सरकारला काय डोळं न्हाईत ? आठ वर्सांचं उपाशी लेकरू दिसलं नाय ? पोटावर गोळी घातली ती...

आता सगळ्यांच्याच पोटात गोळ्या घाल म्हणावं म्हणजे पोटाची जळ्ळी ददात कायमची तरी मिटेल अस्सा एक एक दिव[illegible] बडबडून काढला. ग्यानूची शर्ट-चड्डी उराश[illegible] धरून बसले. चार दिवस घास बी खाल्ल[illegible] नाय. बायाबापड्यांनी हात धरून तोंडा[illegible] तुकडा कोंबला शेवटी !

सा म्हयनं झालं; पण उरातली जख[illegible] वलीच होती. उजाडता उजाडता सरकारच[illegible] माणूस आला अन् कमरेवर हात घेऊन दारा[illegible] पुकारा केला, ' चन्नाबाई मुंगरे कोण ? आपुन भायर गेलो तर पांढरी टोपी अ[illegible] काळा जाकिटवाला एक अन् तसलेच पांढरे फेक कपडे घातल्यालं आनखी धाऽबारा जण मागं उभं. ' हे काय आक्री[illegible] आणखी !' म्हणून बघतच राहिली मी. त[illegible] जाकिटवाला म्हणाला, ' घासलीटाच्य[illegible] रांगांत मुलगा दगावला त्या तुम्हीच ना ? मी पुढं येत म्हटलं, ' हांऽऽ आता कशाल[illegible] आलायसा सरकारानू ? मीठ चोळायला ! माझा ग्यानू गेला, तुमची गोळी खाऊन, त[illegible] परत न्हाई यायचा!' ऊर बडवून मी रड र[illegible] रडू लागले. तो जाकीटवाला पुढं येऊन म्हणतो, ' बाई ! झालं ते झालं, त्याल[illegible] इलाज कोणाचाच नाही. आता सरका[illegible] नुकसानभरपाई देतंय ती घ्या ! आंगठा पु[illegible] करा !' एका पिवळ्या कागदावर आंगठ[illegible] टेकून नोटा हातात कोंबून म्हणाला, ' बाई ! नीट मोजून बघ. तीनशे रुपये आहेत ! पचकन थुकून मी म्हटलं, ' माझ्या ग्यानूची किमत...तीनशे रुपये ? सरकारा, नकोत तुझ्या त्या नोटा !' म्हणून नोटा फेकल्या; पण ऐकायला होतं कोण ? जाकिटवाले अन् टोपीवाले दुसऱ्या मोहोल्ल्यात केव्हाच गेले होते !

हातातल्या नोटा चुरगाळीत चेन्ना सहा महिन्यांपूर्वीचं आठवीत तशीच बसली होती. डोळ्यांतल्या पाण्यात नोटा चिप्प भिजल्या होत्या. काय म्हणाला होता बरं तो सरकारचा माणूस... ' पंधरा दिवसांची ददात मिटेल, मीठ-मिरचीला होतील !' तो म्हणाला ते खरंच होतं. घरात आठ दिवस अन्नाचा कणही नव्हता. ग्यानू गेला अन् आपण मागं राह्यलो. आपल्याला ' पोट ' हाय. ' पोटाची खळगी भरायला हवीच ' मग मीठ-मिरची पण आणायला हवीच. डोळे पुसून तिनं पदराच्या टोकानं नोटा अलगद हातानं पुसून दुकानातून तेल–मीठ आणखीन काय काय आणायचं ते योजीत एक–एक नोट मोजायला सुरुवात केली...☐




पुस्तके

अंधकवी राम गोसावी यांच्या
डोळस चिंतनाचा संग्रह

# डोळे

सुचित्रा राजुरकर

डोळे हा कऱ्हाडच्या साहित्यसंमेलनाच्या वेळी प्रसिद्ध झालेला, अंधकवी राम गोसावी यांच्या प्रभावी लेखणीतून उतरलेला कवितासंग्रह. हळुवार 'शब्दकळा' अन् प्रतिमात 'अनोखे नाविन्य' हे या कवितांचे वैशिष्ट्य. हे वैशिष्ट्य सांगणारी ही कविता पहा.

अंधार...सलग...जिवलग, बिलगतो अंगाशी
गुबगुबीत मांजरीसारखा
पसरतो अंगावर
घनदाट आषाढमेघांसारखा
दरवळतो सर्वांगात,
गाभाऱ्यातील धुपासारखा
कुरवाळतो, जपून ठेवतो
माझ्या प्रकाशगर्भ अस्थी–
बुद्धाच्या स्तूपासारख्या !!!

मध्यवयात अचानक अंधत्व आल्यावर, आधीसुद्धा ५।१० वर्षे कविता करणाऱ्या या कवीच्या भावविश्वाला गाढ अंधाराची हरवले आकार...हरवले प्रकार अशीच काजळी आली. काळोखाची नदी दुथडी भरून पुढे वहात आहे अन ती पार करून प्रकाशाच्या किनाऱ्यावर पोहोचणं किती अशक्य आहे हे त्याला समजलं. या अंधाऱ्या तळचातून बाहेर काढण्यासाठी तो दिव्य शक्तीला आळवतो. अंतरीची दिव्यशक्ती लाभून जीवन चैतन्यमय बनावं या शोधात कवी एक नवीन प्रतिमासृष्टी निर्माण करतोय. हा काव्यानुभव व्यक्त करणारा 'डोळे' हा कवितासंग्रह मराठी कवितेत वैशिष्ट्यपूर्ण असाच ठरेल यात शंका नाही.

मिरज येथे राहून अंधाराच्या थेंबांमध्ये भावफुलांची नाजूक लेणी कोरीत बसलेल्या या अंध कवीबद्दल अन् त्याच्या कवितांबद्दल कोणी कोणी काय काय उद्‌गार काढलेत ते पहाण्यासारखं आहे.

शिरीष पै म्हणतात, 'सूर्याच्या दिशेनं झेप घेणारे डोळचातले निळे पक्षी जेव्हा दूर निघून जातात, तेव्हा जीवनावर अतोनात प्रेम असणाऱ्या या कवीच्या काळजाला काय वेदना होतात हे जाणून घ्यायचं असेल तर अंधकवी राम गोसावीचे 'डोळे' च डोळचांपुढे आणावे लागतील...मुंबई विद्यापीठाचे मराठीचे प्रमुख व समीक्षक व. दी. कुलकर्णी म्हणतात, 'डोळस माणसांनी अंधत्वाबद्दल खूप लिहिलंय; परंतु डोळसपणे जगलेल्या एका रसिक कवीवर अपघातानं अंधत्वाची कुऱ्हाड पडल्यावर भावानुभव काव्यातून मांडणं यास मराठीत एक वेगळंच स्थान मिळायला हवं.' स्वतः राम गोसावींच्या शब्दात सांगायचं झालं तर ते म्हणतात, 'माझ्या प्रत्येक कवितेनं मला एक आगळाच निर्मितीचा आनंद मिळवून दिलाय...माझ्या कवितेवर माझी गाढ श्रद्धा होती. गुणी जनांनी त्यांची कदर करावी ही आस मनात होती. कमळाच्या पाकळ्यांत अडकून पडलेला भ्रमर ज्याप्रमाणे पहाटेची वाट पहात असतो तसाच मी माझ्या कवितांना रसिक जनांची दाद मिळावी म्हणून तळमळत होतो. हो. आणि गेली १५।२० वर्षे सतत विविध मासिकं, दिवाळी अंकांतून काव्यलेखन करणाऱ्या राम गोसावींना पहिली प्रसिद्धीची लाट अंगावर यायला अन गुणीजनांची भेट व्हायला २० डिसेंबर १९७४चं इचलकरंजीचं साहित्यसंमेलन उजाडावं लागलं.

या संमेलनात त्यांची 'डोळे' ही कविता प्रचंड प्रतिसाद देऊन गेली. 'जळगावच्या साहित्यसंमेलनानं मराठीला जसे बालकवी मिळवून दिले तसेच या संमेलनानं राम गोसावी या गुणी कवीची ओळख करून दिली आहे.' असे गौरवोद्‌गार पु. ल. देशपांडे यांनी काढावेत यामध्ये राम गोसावींच्या काव्याचं झालेलं कौतुक लक्षात येतं.

त्यानंतरच्या कऱ्हाड संमेलनातहि त्यांच्या कविता रसिकांना आवडल्या. याच वेळी शिरीष पै यांच्या धडपडीने हा संग्रह प्रकाशित झाला. पुढच्या संमेलनाच्या वेळी अजून कोणी रसिकदाता प्रकाशक भेटल्यास दुसरा काव्यसंग्रह प्रसिद्ध व्हावा ही त्यांची इच्छा सफल होईलही.

या अंधाऱ्या अनुभवातून कवीच्या प्रकाशगर्भ अस्थी जपणाऱ्या, गेले निळे पक्षी, आता कैची भेटी,- दाटे ताटातुटी, असे काळीज करपवणारे अनुभव निराशा, आधाराचा शोध, जुन्या आठवणी सांगणाऱ्या, देव ते दैववादातून निसर्गात अन माणुसकीत सापडणाऱ्या चैतन्याच्या शोधात रंगलेल्या वाचकालाही रंगवणाऱ्या ६७ कविता. या कविता वाचणं हा एक काळाभोर खोल अंतर्व्यापी नेणारा तळाचा वेध घेऊन मग आकाशात भरारी मारणारा, काव्यातून बुद्धिवादाची किनार अन वास्तवाचे भान सांभाळणारा भावानुभव...तळचात अंधार, अंधारात तळं...तळचात निळं मेलेलं कमळ...मी वर पहाता फाटते आभाळ उरतो गडद अंधार, मी खाली पहाता खोल दऱ्यात जळतो अंधार...माझ्या निःश्वासी...सोन्याची होते माती हे मातीमोल जीवन सोडू कुठे...अशा स्थिर गोठलेल्या निराशामय प्रतिमांच्या जगातून त्याला प्रकाशवेड्या कवितांच्या काव्यरसात चैतन्य शोधणारा, मनाची मरगळ वितळवणारा आशावाद सापडतोय. हीच या कवितांची अंधारातून प्रकाशाच्या दिशेनं झालेली वाटचाल. कविता नव्हे माझी, ही स्निग्ध शांत ज्योत, हिचिया मृदू प्रकाशी माझी सुरम्य वाट...असे कवी थोडा विसावून रसिकास सांगतो. यामधून सापडणारी नवीन प्रतिमासृष्टी, विषयातील विविधता अथवा साध्या विषयातून शोधलेले विविध अर्थ, जीवनाच्या रसरंगात प्रणयशृंगार,

धर्म, विज्ञान या सर्व विषयांतील जीवनानुभवांची झालर या कवितांना लावलेली दिसतेय...तुझ्या स्मृतीचे चंद्रतुकडे, लाललोभस अल्लडवाट, अवखळ चपळ लाट... घोटाळते भोळचा खडकाशी...पिंपळपायाशी झिंगले मुंगळे, नाचत मजेत वर्तुळ चालले... उंच ढोलीत साठवी गुपीत...सरसर खारोटी विजलीच्या नखऱ्यात...आकाशाच्या गोकुळात...कृष्ण खेळे रंग खेळ परतीच्या रस्त्यावरी उडे सोनियाची धूळ अशी विविध रसांची मार्मिक भावचित्रे रंगवणारी प्रतिभा जेव्हा अंधाऱ्या तळातून अंधारावरची काळजाचा वेध घेणारी प्रतिमाचित्रे रंगवणे थांबवून हळूहळू चैतन्यात अन प्रकाशात काव्यरसाच्या आनंदात स्वतःचेच हरवलेले नवे स्वरूप शोधू लागते तेव्हा रसिकालाही आनंद होतो.

आडवळणी डोंगरात फुलावं लेणं–तशा या कविता मिरजच्या ब्राह्मणपुरी–भागातील दुसऱ्या मजल्यावर कुण्या एका धृतराष्ट्राच्या डोळस चिंतनातून उमलल्या. कधी शब्दांचे आधार सापडत नाहीत म्हणून कवी कासावीस होतोय. ही अनुभूती पाऱ्यासारखी तरळ, धुक्यासारखी विरळ ती साकारण्यासाठी सापडत नाहीत शब्दांचे आधार. विपण्ण, विदीर्ण शब्दांनो, तुमच्यावाचून असे सांगताना ही व्यथा ओलावल्या पापणीतून बोलकी होतेय...

किती रे पाखरा करावं कौतुक
झालो अगतिक शब्दावाचून
असे सांगता सांगता हळूहळू
काटेकुटे, कपारी रोधू शके न कोणी
स्वप्ने उदासवाणी, पाठी असता ओझे
कविता प्रकाशवेडी मनिमानसी विराजे
आनंद राउळाशी हा देह शांत व्हावा,

शब्दातला सुगंध असेहि कवी सांगू लागतोय.

डोळे जळूनि जाता अंधार राख उरली
राखेतुनि परी घे चैतन्य पक्षि उसळी...
हा फिनिक्सच. तो उभा राहतोय. नुसताच नाही तर जीवनाचे जयगान
मेघांवर चितारतोय...
अन ती राख ती भरारी...
ते गीत पक्षिरूप...
ज्याच्यात शोधतो मी माझे नवे स्वरूप...

असेही सांगतोय.

जगात स्वतःला डोळस समजणारे अंधश्रद्धा, स्वार्थ अन् नक्कलेत गुंतून नवे दुःख निर्माण करणारे आंधळे थोडे नाहीत. समोर पसरलेला जीवनसागराचा आनंदास्वाद डोळसदृष्टी नसल्यानं ते घेऊ शकत नाहीत. हा अंधकवी मात्र 'प्राणामाजी आता प्रकाशाचा भार, माझी मज वाट गवसली' असं काव्यगंगेच्या काठी काव्यरसात चिंब भिजून म्हणतो. आंधळेपणाचं दुःख हे इतकं भयंकर वाटतंय की, येशुचं दुःखही त्यापुढे खिळाभर कमी असेल. असंच त्याला वाटतंय. कधी कोण मज देईल धीर म्हणून शोधतोय. देवळातला देव पाहून तो म्हणतो,

पायावरी तुझ्या ठेवियला माथा
हाणियेल्या लाथा केवी देहा
त्या देवानं काय केलं ?...
राहो द्यावी माझी निदान लंगोटी।
तीही गा शेवटी ओढलीस।

हा अनुभव घेतल्यावर तिटकाऱ्यानं तो म्हणतो–

देव नाही हा मी पूजिला खवीस।
व्यर्थ कासावीस कष्ट केले.

पारंपारिक देवकल्पनेतून कवी बाहेर येतोय... खरं तर त्याला खूप दूर जायचे होते. कित्येकदा घट्ट काळे आषाढमेघ फुटावेत तसे साठळलेले अश्रूपूर फुटून जाण्यानं फार बरं वाटतं हा अनुभव तो सांगतोय.

कुठे चुकलं पाखरू, तुझे माझे आसु।
क्षणभर हसू दोघेजण ॥

म्हणून तो समदुःखी शोधतोय तर देवाच्या शोधास गळयात घालुनी काजव्याची माळ, फिरलो मी रानोमाळ, पण तू सापडला नाहीस असं म्हणतोय. हाती घेऊन नैवेद्यताट .. पाहिली मी तुझी वाट पण तू आला नाहीस. असं सांगताना–

एकदा मात्र एका
जखमेवर बांधली मी पट्टी.
हाती भरवला घास
एका भुकेल्या पोटी
तेव्हा मात्र घालुनी मला दाट मिठी
तू म्हणालास मी आलो

हे कवीचे आधुनिक भक्तिगीत म्हणावं लागेल.

डोळचापुढच्या अंधाराचे काजळलेले चित्र सांगणारी प्रतिभा निसर्गकवितात अन् प्रणयगीतातही गहिरे रंग भरते.

ती पहिलीवहिली भेट
कर-करात मिळताजुळता
थरारले ओठही...

या ओळी रसिकालीही अशीच एखादी हळव्या पहिल्या प्रेमाची आठवण करून देतील.

चंद्र असा कललेला रात्र अशी सुकलेली
उष्ण धुन्द निश्वासे फुलवेणी सुकलेली

अशी एक आठवण सांगताना चांदण्यांनी एकदा पेट घेतला होता तेही तो सांगतो,

वहरल्या रातराणीतून सुगंधी लहर
पायाशी झुकलेली लाजवन्ती नजर
पहिल्या रात्रीतील पहिलीवहिली भेट...
मिठीत तुला घेताना चांदण्यांनी घेतला पेट!

आषाढवारीमध्ये पावसावर रंगवलेले रूपक असेच देखणे आहे.

अजुनी वाट पहाते कुणाची,
चंद्राची कोर, वेडी पोर
पैलतटावर ज्वारीचे शिवार
झोपले बिनघोर

असंही एक छान निसर्गचित्र कवी रंगवतो. धुक्याची दुलई पांघरून पेंगणारा पिंपळ अन सुगंधी पंख पसरुनी येणारा पहाटवारा ही कवीची डोळस रूपके होत.

यापुढचा त्यांचा संग्रह हा अगदी वेगळा असेल असं ते सांगतात. बालकविता सामाजिक आत्मचिंतनपर कवितांचे संग्रह प्रकाशित व्हावेत या त्यांच्या तळमळीला कोणाचा तरी हातभार हवाय... हसणारे सगळेच भेटतात. आसु पुसणारा एखादाच. वाट चुकवणारे अनेक असतात; वाट दाखवणारा एखादाच... शिरीष पैंचं हे ऋण ते मानतात. एक स्वतःची लायब्ररी असावी छोटीशी. वाचून दाखवायला मदतनीस असावा. यासाठी अंधासाठी मदत करणाऱ्या संस्थांनी पुढे यायला हवंय. महाराष्ट्रात ठिकठिकाणी वाङ्मयमंडळे, क्लबात ठराविकच कवींचे काव्यगायन-कार्यक्रम होतात. या कवितांच्या आधारावर मी जगतोय. जगाला देण्यासाठी अजूनही माझ्याजवळ काही आहे हा आशावाद वाढवण्यासाठी अशा रसिकजनांशी गाठीभेटी व्हाव्यात. काव्यगायन करावे. थोडे मानधन व प्रवासखर्च यामध्ये त्यांना खूपसे समाधान मराठी काव्यप्रेमी मिळवून देऊ शकतील. सभोवताली काळोख असताना आपल्या प्रकाशगर्भ अस्थी बुद्धाच्या स्तूपाप्रमाणे जपून ठेवण्याची दृष्टी कवीला त्याची कविता देतेय. तिचा गौरव, ओळख व्हायला हवीच. उशीरा मात्र नको. नाही तर त्याने मित्रांसाठी रंग जमवले. तेव्हा उरला होता फक्त काळोख. अखेरीस त्याच्या भोवती गर्दी जमली, तेव्हा त्याचा तो उरला नव्हता असे मात्र होऊ नये. □ □



# स्वरानंदने सादर केलेले ग. दि. मां. चे संपन्न चैत्रबन

सुहास तांबे

नाव जितकं वशिष्टचपूर्ण तितकाच कार्यक्रम. ग. दि. मां. च्या निवडक गीतांचा कार्यक्रम ही निवडसुद्धा अशा एका काळातली जेव्हां गदिमा–सुधीर फडके ही जोडी निर्मितीच्या ऐन बहरात होती. एकाहून एक सरस गाणी रसिकांना मिळत होती. कोणताही गीतप्रकार त्यांना निषिद्ध नव्हता, कोणतेही सूर परकीय नव्हते. खास मराठी माणसाच्या साध्यासुध्या जीवनाशी नातं सांगणारी ती गाणी. त्या गाण्यांमधून साधेच पण अर्थानं गच्च भरलेले शब्द असत. त्यांची चाल सोपीच पण हृदयाला सरळ जाऊन भिडणारी असे. भक्तिगीतांसाठी ‘ रथ हाकुनिया पांडवांचा पळविशी कौरवा, केशवा, माधवा ’ असली घाऊक भिकारडी शब्दरचना त्यांना करावीच लागत नसे. ‘ इंद्रायणीकाठी देवाची आळंदी, लागली समाधी ’सारखे अभिजात अभंग लिहून गदिमांनी भल्याभल्यांना तुकाराममहाराजांच्या चोपड्या तपाशीत बसवलं आहे. ‘ये जवळ ये लाजू नको’ असल्या बटबटीत आणि बाजारी अवस्थेप्रत येऊन पोहोचलेली आजची लावणी जेव्हा गदिमांच्या राज्यात होती तेव्हा कशी रसरशीत पण घरंदाज होती. ‘ जाळीमंदी पिकली करवंदं ’ किंवा ‘ बुगडी माझी सांडली ग ’ ह्या जातिवंत लावण्या ऐकून कानशिलं तापतील; पण नजर बुळबुळीत, अधाशी होत नाही. ‘पोटापुरता पसा पाहिजे, नको पिकाया पोळी, देणाऱ्याचे हात हजारो, दुबळी माझी झोळी ’ हे गीत, शब्द फारच सोपे असल्यामुळे ‘ बी. ए. विथ् मराठी ’ला माहीत नसेल; पण फिलॉसॉफीच्या सच्च्या विद्यार्थ्याला मात्र ते वेड लावील. भावगीतं हा तर ग. दि. मां. चा मिरासदारीचा प्रांत. त्यांच्या भावगीतांचं रसग्रहण करताना पानंच्या पानं लिहून अपुरंच वाटेल आणि कदाचित सुधीर फडक्यांच्या सुरांनी ते मनाला इतकं भिडेल की रसग्रहणात शब्दांचा अडथळाच वाटायला लागेल ! ‘ वसन्तकाली वनी दिनांती, एकच पुशिते तुज एकांती, एकांती कर कोमल माझा हाती घेशील का– माझा होशील का ?’ जे दृश्य टिपायला शेकडो फूट सप्तरंगी फिल्म खर्ची घालायला लागेल, ते चित्त ह्या गीतातल्या पहिल्या तीनच शब्दांत गदिमांनी जिवंत केलंय् आणि पुढे तो साधाच पण व्याकुळ करणारा प्रश्न ‘माझा होशील का ?’ इथं हॅटस् ऑफ खेबुडकर वगैरे कवीमंडळी जर प्रामाणिक असतील तर ह्या गाण्याचा मत्सर वाटून आपल्या लेखण्या काड्काड् मोडून टाकतील ! (एवढं कुठं भाग्य आपलं ? )

म्हणून तर ‘ गदिमा–गीते ’ सादर करायची ही कल्पनाच मुळात अफलातून; पण सुधीर मोघ्यांच्या डोक्यात ती आली आणि ‘ स्वरानंद ’मधली त्यांची मित्रमंडळी चक्क सरसावून उभी राहिली. ‘ स्वरानंद ’ ह्या संस्थेनं ह्याआधी ‘ आपली आवड ’ हा उत्कृष्ट कार्यक्रम दिलाच आहे. त्याला जाणकार आणि रसिक (तेदेखील खुद्द पुण्यातले! ) सगळ्यांनीच दाद दिली आहे. पुण्यातल्या बहुतेक संस्थांमध्ये श्रेयासाठी हाणामाऱ्या होऊन त्या प्रथमवर्धापनदिनी पुण्यतिथी साजरी करतात. तेच इथं होतं की काय असं वाटत असतानाच त्यातली काही मंडळी संघवृत्तीनं आणि जिद्दीनं उभी राहिली आणि त्यांनी हा अप्रतिम कार्यक्रम दिला.

सुधीर मोघे ही एक विलक्षण व्यक्ती आहे. रंगमंच, चित्रपट, संगीत इ. सगळ्याच ठिकाणी स्वतःचं वेगळेपण असणारा आणि राखणारा. हा काव्यात तर अखंड डुंबून असतो. स्वःच्या आणि इतरांच्या अशा अक्षरशः शेकडो कविता, गाणी त्याला पाठ आहेत. अत्यंत जाणीवपूर्वक त्यांचं संकलनही त्यानं केलं आहे. शास्त्रशुद्ध असेल–नसेल, पण गोड मनस्वी आवाज आणि लयीची नैसर्गिक जाण त्याच्यापाशी आहे. ह्या कार्यक्रमात तो दोन गाणी म्हणतो आणि अत्यंत रसाळ निवेदनही करतो. जाता जाता त्या काल-परवाच्या परिचित–अपरिचित आठवणी सांगत, सहजपणे मराठी चित्रपट–काव्य –संगीत ह्यातल्या बदलत्या प्रवाहांचा मागोवा घेत तो गाण्यांची गुंफण करीत जातो आणि मग खरोखरच तिथं ते ‘ मंतरलेलं चैत्रबन ’ फुलतं. तुम्ही–आम्ही हरवून जातो आणि

गाणं संपल्यावर टाळ्यांचा कडकडाट करीत सुधीरची वाट पहातो. तो देखील कोरडं रसग्रहण किंवा अप्रशस्त विनोद असल्या वाटा सोडून हसत–हसवत आपल्याला पुढच्या गाण्याशी पोहोचवतो. तुमची–आमची ही स्थिती, तर गेल्या १७ डिसेंबरला रात्री उपस्थितांपैकी गदिमा, सुधीर फडके, राजाभाऊ परांजपे ही खुद्द मंडळी आठवणींनी हळवी झाली होती, त्यात नवल ते काय !

पण चांगली गाणी, चांगलं निवेदन इथं हे संपत नाही. रेकॉर्डबरहुकूम गाणं देणं ही वाटते तेवढी सोपी गोष्ट नाही. रेकॉर्डिंग करताना मोठा वाद्यवृंद असतो. प्रत्येक वाद्याला वेगळा चॅनेल मिळतो, अत्याधुनिक यंत्रसामुग्रीमुळे तर साधे–साधे आवाज कमालीचे उच्च करता येतात. शिवाय रेकॉर्डवरचं गाणं हे दोन–तीन वेगवेगळ्या टेकस्‌मधून निवडलेल्या तुकड्यांचं असतं. स्टेजवर मात्र गायक आणि मर्यादित वाद्यवृंद एकाच पातळीवर असतात. शिवाय त्यांना प्रेक्षकांना सामोरं जायचं असतं. म्हणूनच तीन मिनिटांचं उत्कृष्ट गाणं सादर करायला तीस दिवसांची मेहनत लागते ! तिथंही ही मंडळी कमी नाहीत. मुळात 'स्वरानंद'कडे घसघशीत गुण असणारी माणसं आहेतच. रमाकांत परांजपे, गदगकर, अवचट, गोखले ह्यांची व्हायोलिन्स नोटेशन्स्‌बरहुकूम, आवश्यक त्या कमी–अधिक तीव्रतेनं, अचूक वाजतात. साथ, गॅपपीस, कॉन्ट्रा–काहीही. अजित सोमणांची (मूड असल्यास) बासरी कुठून–कुठून गाण्यातल्या जागा उंचावीत जाते आणि रामकृष्ण वझे सतारीवर कुठेकुठे अल्लद उतरतात ते दाद देण्याजोगं असतं. थत्ते पेटी छान वाजवतो (पण गाण्यापासून अलिप्त का असतो कळत नाही !) आणि शिवाय या सगळ्यालाच एक मजबूत आधार असतो अरुण नूलकरांच्या कसदार तबल्याचा. इतर ऑर्केस्ट्रांमधून मूळ गाण्याच्या आसपास हिंडण्याची आणि प्रत्येक वादकानं आपलं स्वतंत्र अस्तित्व दाखविण्याची वृत्ती असते. इथं सगळं व्यवस्थित तयारीचं आणि समजुतीचं. आपापल्या वाद्याची जागा ओळखून दिलेलं. (पण ही मंडळी थोडंसं हसून एकमेकांना दाद देत वाजवतील तर रंगत किती तरी पटींनी वाढेल !)

विशेष उल्लेख करायला हवा शामकांत परांजपेचा. संगीताच्या क्षेत्रात तो अत्यंत श्रद्धेनं उतरला आहे. तो कोणतं वाद्य वाजवीत नाही, ह्याची यादी सहज करता येईल. कपाचित यादी करावीच लागणार नाही. ह्या कार्यक्रमात तो गिटार, मेंडोलिन आणि (खास 'विकत घेतला शाम'साठी) पेटी वाजवतो; पण गायक आणि इतर सगळ्या वादकांना त्याचा धाक वाटतो. कारण रिहर्सललासुद्धा त्याला चूक चालत नाही.

गायनाच्या बाजूला पहिलं नाव–रंजना पेठे. स्टेजला त्या किंचित नवख्या किंवा अपरिपक्व वाटल्या तरी खूप मोकळेपणानं, मनापासून गातात. 'नाच रे मोरा'चा निरागसपणा, 'गोकुळातला चोर आला'-मधला ठसका, 'या कातरवेळी'साठी व्याकुळता–सगळं त्यांच्यापाशी सहज आहे. त्यानंतर शैला दातार. गाण्याची तयारी–अनुभव जास्त; पण नेहमीच समरसून गात नव्हत्या. तरीसुद्धा 'सावळाच रंग तुझा' आणि 'घननीळा लडिवाळा' ही गाणी त्यांनी सरस पेश केली. शोभा जोशींनी (अरुण आपटेच्या छान साथीनं) 'विकत घेतला शाम' Once more मिळण्याइतकं उत्कृष्ट म्हटलं. गोड आवाजाची देणगी लाभलेल्या जोशी खुलेपणानं गायल्या असत्या (अपवाद : 'ऐकशील का रे माझे अर्थहीन गीत') तर कार्यक्रमाच्या पूर्वार्धातला रंजना पेठ्यांचा एकछत्री अंमल त्यांनी उत्तरार्धात पार विसरायला लावला असता !

सुधीर दातारांनी 'इंद्रायणी काठी' आणि 'रम्य ही स्वर्गाहुनि लंका' प्रभावीपणे म्हटली. कोरस मात्र दातार, जोशी, देसाई, आपटे, मोघे ही पुरुषमंडळी असूनही उठावदार झाली नाहीत.

कार्यक्रम आज आहे तसासुद्धा रसिकांच्या मनाची पकड घ्यायला समर्थ आहे आणि किंबहुना म्हणूनच भोंडे, देसाई इ. ना काही सांगावंसं वाटतं. अशा कार्यक्रमात दुय्यम असला तरीही रंगमंच हा एक अविभाज्य भाग आहे. तेव्हा दृष्टिसुखाची लज्जत वाढवली तर अधिक बरं. उदाहरणार्थ, स्टेजवरचा कलावंतांचा वावर अधिक सहज व्हावा. कपड्यांची रंगसंगती साधावी. थोडीशी सजावट, पूरक प्रकाशयोजना हवी. तसंच थोडंसं हसरं वातावरण. कित्येक कलावंत नाटकांतून मोठमोठी भाषणं पाठ करतात. तेव्हा गायक–गायिकांच्या हातांतल्या वह्या खरंच हव्यात का ? ढोलकी हे केवळ साथीचं सहाय्यक वाद्य नसून 'स्वतंत्र जात असणारं' वाद्य आहे, हे जागवून द्यावं. सगळ्यात शेवटचं–गाणारांनी कुणी सक्ती केल्यासारखं गाऊ नये. गाणं सुरू करण्यापूर्वी (विंगमधून प्रेक्षक न्याहाळण्याऐवजी) थोडं मनःपूर्वक त्या गाण्याच्या मूडमध्ये शिरून उत्कटतेनं गाणी द्यावीत. तितकीच उत्कट दाद प्रेक्षक आपोआप देतील. ह्या कार्यक्रमाचे सूत्रधार जाणते आहेत. कदाचित ह्या गोष्टींकडे त्यांनी आता लक्ष दिलंही असेल.

हा कार्यक्रम आवर्जून ऐकण्याचा. कारण सुधीर मोघेंच्याच शब्दात सांगायचं तर– 'हे संपन्न चैत्रबन फुलवणारी ही लेखणी म्हणजे केवळ बोरूची पोकळ नळी नव्हे. ह्या लेखणीत एक विलक्षण सामर्थ्यशाली कुंचला आहे. अंतःकरणाच्या तारांशी हितगुज करणारी एक लडिवाळ सतार आहे. गंभीर तत्त्वांशी संवाद करणारा एक धीरगंभीर सरोद आहे. चित्तवृत्ती अस्वस्थ करणारी एक तप्त ढोलकी आहे. पटबंधाची गाठ तोडणारा एक शाहिरी डफ आहे. आधिव्याधी विसरून नामगजरात रंगणारी एक भक्तिवीणा आहे आणि ढळत्या सायंकाळी आर्त विराणी आळवणारी एक एकतारीदेखील आहे.' म्हणूनच प्रत्येकानं जरूर घ्यावा असा हा एक अनुभव.

☐ ☐

# त्लायुकन

पृष्ठ ९ वरून

जत्रा म्हणजे निकोला पर्वणीच वाटते. तो दिवसभर आपल्या आवडीचा एकच धंदा करतो. बर्फाच्या गाड्यांना लोंबकळून, आइस्क्रीमच्या गाड्यांवर अगदी मिळेल तिथून बर्फाचे खडे पळवतो आणि कचाकच खातच रहातो. त्याचे आईबाप आपल्याच सुखात दंग असतात. परिणाम अगदी उघडच असतो. निको नंतर आजारी पडतो. तापानं फणफणतो. चवेला शेतावर राबणाऱ्या नवऱ्याला बोलावून आणते. डॉक्टर आणते. निदान होतं ब्रांकोनिमोनिया ! आजार तसा काळजीचाच ठरतो. डॉक्टर इंजेक्शन देतो. वर हजार सूचना करतो. नर्स हवी, औषधं हवीत. इथे सुद्धा अल्कोरिझो तयारच असतो. कारण डॉक्टर जातानाच धक्की देतो. आज आलो उपकारच झाले. कारण मुफेमियोचं कोणाशीच बरं नाही. फॅक्टरीमधल्या मालकांना तर मुळीच आवडणार नाही वगैरे. मरत्या पोराच्या चेहऱ्याकडे उदास पहाणारा मुफेमीच आपल्याला दिसत रहातो.

युफेमियोची मतीच गुंग होते. कुठलाच मार्ग दिसत नसतो. ताप उतरवायचा तर औषध. औषधं हवीत तर पैसा. पैसा असेल तरच पोराचा प्राण! पोरावर तर त्याचं फार प्रेम असतं. असण स्वाभाविकही ठरतं. युफेमियो पैशाच्या शोधात बाहेर पडतो. फॅक्टरीवर जातो. काम करणारे दोस्त दाद देत नाहीत. त्यांच्यासाठी भांडून बेकार बनलेला युफेमियो. दोघे पुढे होतात; पण काळ कठोर असतो. त्यांच्याकडे त्याला पाजायला दारू असते; पण औषधाला दमडे नसतात. मग तो मोठी डुकरीण विकायला काढतो. कोणीच गिऱ्हाईक मिळत नाही. कारण ती अगदीच म्हातारी झालेली. मग त्याला आणखी एक मार्ग दिसतो. तो सरळ मिस प्रिन्सेस्काच्या बंगल्यावर धरणं धरतो; पण त्याच्या घाणेरड्या वर्तनानं आधीच बिथरलेली ती म्हातारी त्याला सरळ हाकलून लावते. चवेला पण विचारात असतेच. मग अगतिक होऊन ती म्हाताऱ्या डॉम टॉमसची हवेली चढते. म्हातारा यादी बघतो. हजार पेन्स पडतील असा अंदाज बांधतो. आता दिग्दर्शक डॉम टॉमसला बोलता करतो. पैसे देईन; पण त्याची किंमत पुरती वसूल करून घेईन ! कशी ते तुला ठाऊक आहेच. म्हातारा बोलत नसतो, परिस्थिती बोलत असते. आपल्या शरिरावर डोळा ठेवणाऱ्या म्हाताऱ्यावर चवेला खवळते. त्याला डुक्कर म्हणते. शिव्यांची लाखोली वहाते. इतकंच काय त्याच्या गोवऱ्या पोचवल्याशिवाय रहाणार नाही अशी धमकी पण देऊन येते.

सारे मार्ग अल्कारिझो रोखून ठेवतो. परिस्थिती कोंडी करते. पोराची प्रकृती तर अधिकच बिघडत चाललेली. मग भरपूर प्यालेला युफेमियो सरळ सेंट लुइसालाच शरण जातो. ढोंगी फादर त्याचं अचूक निर्णय घेतल्याबद्दल अभिनंदन करतो आणि दारू पिऊन चर्चमध्ये आल्याबद्दल डाफरतोही. लुइसा पुढे बेभान होऊन आपल्या पोराचे प्राण मागणाऱ्या मुफेमियोचे अमेरिकन प्रवासी चर्चच्या वरच्या खिडकीतून फोटो काढतात. नकळत पण अचानक फ्लॅश चमकतात. मुफेमियोला त्यात चमकलेले लुइसाच्या मखराचे दोन मोतीच प्रथम दिसतात. तो फसतो. त्या भाबड्याला वाटतं, देवीच प्रसन्न झाली. मोती घे म्हणाली. तो मोती चोरतो. खिडकीतून पहाणारे अमेरिकी प्रवासी चोरीचेही स्नॅप्स घेतात व फादरला दाखवतात. मग साराच मोर्चा मुफेमियोकडे वळतो. घाबरलेला तो ते मोती डुकराच्या खाण्यात टाकून दडवतो. मग नकार देतो; पण फोटो पाहिल्यावर चोरी कबूल करून टाकतो; पण तेवढ्यात तो मोती गायब होतो. डुकराच्या पोटात जातो. साऱ्यांचीच मती गुंग ! मग ते म्हणतात, आपण डुकरं मारू. एखाद्याच्या पोटात तो मिळेल; पण डुकरांचे मालक तयार नसतात ते विरोध करतात. मग फादर साराच लवाजमा चर्चमध्ये आणतो. इथे अल्कारिझो एक भन्नाट कल्पना लढवतो. तो फादरकरवी डुकरांना जुलाबाचं औषध पाजतो. मग वाट पहाणं आलंच. सारेच मन लावून मोती पडायची वाट बघू लागतात. अल्कारिझो माणसांच्या मनोवृत्तीला सहज थपडा मारतो. त्यांच्या खुळेपणाला हसतो. लोक तरीसुद्धा मुफेमियोला माफ करायला तयार नसतात. ते त्याला तुरुंगात अडकवतात. इकडे पोराची तब्येत फार ढासळू लागते. चवेला डॉक्टर आणते. डॉक्टर म्हणतो, पोराचा श्वास जड होतो. ऑक्सिजनमास्क आणायला हवा. नाही तर आता पोरगा मरेलच ! वातावरण ताणलेलं. चवेलाचा आक्रोश अखेर म्हाताऱ्या डॉम टॉमसला सहन होत नाही. तो हजार पेसो काढून देतो. म्हणतो, हे कर्ज नाहीयेय. हे बक्षीस आहे बक्षीस ! तिलाच काय आपल्यालासुद्धा धक्काच बसतो; पण डॉम टॉमस नंतर तिलाच सांगून टाकतो, 'तू वयात आल्यापास्नं मला आवडतेस. तुझ्या बापाकडून तुला विकत घ्यायचा खूप प्रयत्न केला. तू बधली नाहीस ! एका भिकारी माणसाशी लग्न करून बसलीस ! आजही तू मला आवडतेस; पण मी झालोय म्हातारा घोडा! म्हणून तुझं चालणं-बोलणं पाहूनच केवळ मी जगतो. आता पोरग्याच्या आजारानं तू पण दुःखी झालीयस. मला तुझा रडवा चेहरा बघवला नाही. पैसे घेतलेस. पोराला वाचवलंस. आता तरी तू हास ! गा ! मग मी पण सुखी होईन ! अल्कारिझोचा हा म्हातारा आता विलक्षण भन्नाट वाटू लागतो. ह्या



शब्दांतून तो त्याचं दुःखच बोलतं करतो. ऐन मध्यरात्री एकाकीपणानं पिसाटून हवेत पिस्तूल झाडणारा डॉम टॉमस आपल्याला लख्ख दिसू लागतो. अल्कारिझो त्याच्या वागनाच उंच नेऊन ठेवतो. आपणसुद्धा त्या केविलवाण्या श्रीमंताला न्याय देतो आणि भोगांच्या नागव्या दर्शनानं चक्रावून पण जातो.

अल्कारिझो परत एकदा प्रिन्सेस्काला पुढे करतो. खोटी स्वच्छता बाळगणाऱ्या ह्या म्हातारीला कुणीच नसतं. कुणी येतही नसतं. म्हणूनच न विसरता तिच्या दर वाढ-दिवसाला शुभेच्छा देणाऱ्या आंधळ्या कॅस्तीनोबद्दल तिला विलक्षण जिव्हाळा वाटतो. अशाच एका दिवशी ती त्याला दारू पाजते. स्वतः पण पिते आणि मग त्या धुंदीत ती कुवार प्रौढा त्याचा उपभोग पण घेते. मग पापाच्या जाणिवेनं भारलेली प्रिन्सेस्का परत एकदा फादरकडे धावते. सल्ला मागते. तो व्यवहारी माणूस दुसरं काय सांगणार? तो तिला कॅस्मीनाशी सरळ लग्न करायचा सल्ला देतो. अल्कारिझो ह्या लग्नसमारंभा-नंतर गावातल्या खट्याळ पोरांना ह्या विचित्र नवविवाहित जोडप्यावर दगडही फेकताना दाखवतो आणि जीवनातली विलक्षण वास्तवताही प्रत्ययाला आणून देतो.

लोक युफेमियोला माफ करत नाहीत. शेरीफ बोलावला जातो. कोर्ट भरतं. युफे-मियोची शिक्षा अटळ असते. लोक रदबदली करतात. त्याला भला माणूस म्हणतात. मग तोडगा सुचवतात, डॉम टॉमसला जमिनीचा तुकडा द्यावा. नुकत्याच श्रीमंत झालेल्या कॅस्तीनोनं तो द्यावा. इतरांनी मदत करावी व युफेमियोनं शेत पिकवावं. येईल त्या पैशातून युफेमियोनं मोत्याची भरपाई करावी. उपाय मान्य होतो. युफेमियो तुरुंगा-तून मुक्त होतो. गावकऱ्यांच्या-- प्रेमानं भारावतो. त्यांची चुंबनं घेत रहातो. आता दैव पण सरसावतं. काळाची पावलं पण वेगळीच पडतात. चबेलाला परसातच मोती सापडतो. म्हणजे तो डुकरांनी गिळले-लाच नसतो ! ती युफेमियोकडे धावते. तो आता शहाणा झालेला दिसतो. मोती उघड परत करून त्याला चोरीवर शिक्कामोर्तब करायचं नसतं. मग एका मध्यरात्री चर्चच्या प्रेत पुरणाऱ्या नोकराला सेंट लुइसाचा मोती परत जाग्यावर परतलेला दिसतो. तो घंटा वाजवून सारं गाव गोळा करतो. तो म्हणतो, डुकराच्या मालकांनीच मोती आणून ठेवला. ते कानांवर हात ठेवतात. युफेमियो पण नकार देतो. तो म्हणतो, हा पण चमत्कारच आहे. माता लुइसानंच घडवलेला. साऱ्यांचा विश्वास बसतो. फादरचं ऐकण्याच्या मनः-स्थितीत नसलेला तो जमाव माता लुइसाची प्रार्थना आळवू लागतो. कारण असले चम-त्कार घडवणारी जगातली ती एकच थोर शक्ती असू शकते.

त्लायुकन हा दिग्दर्शकाचाच चित्रपट आहे. मेक्सिकोतल्या मातीतली ही विलक्षण प्रभावी चित्रकथा. स्पॅनिश भाषेत बोलणारी. ह्यातले सारेचजण नायक आहेत. प्रसंगी सारेही खल-नायकसुद्धा बनतात. साध्या माणसांच्या साध्या आयुष्याचे गुणदोष अल्कोरिझो सहज चित्रित करत जातो. मानवी समाजातील विकृतींबरोबरच तो प्रकृतींनाही आपल्या-बरोबर पुढे नेतो. ढोंगी धर्मगुरू, वासनांनी झपाटलेला डॉम टॉमस, शरीर विसरणारी प्रिन्सेस्का, अंधारात जग वाचणारा कॅस्तीनो, बर्फ चोरून खाणारा निको, स्वप्नांची घरं बांधणारी मोहक चबेला आणि साऱ्यांहून अधिक जाणवणारा उमदा युफेमियो. अल्को-रिझोचा हा चित्रपट खदखदा क्वचितच हसवतो किंवा तीव्र खिन्नतेनं क्वचितच झपाटतो. तो पैशानं मोजलेलं जग दाखवतो तसंच पैशाच्या नसण्यातून येणारा अस्वस्थ संघर्षही सहज उभा करतो. त्लायुकनमधला विनोद मात्र अस्वलाच्या गुदगुल्यांसारखा जीवघेणा वाटतो. इतकंच काय समाज-पुरुषाला तो विलक्षणपणे बोचकारतही रहातो.


बॉम्बे डाइंग

एकमेव वितरक

पराग

डेक्कन जिमखाना. ● लक्ष्मी रोड, पुणे

आज आपल्यासाठी

खास नवीन प्रकार

उबदार

फ्लॅनेल

१४ सुंदर रंगात

व

डिझाइन्समध्ये



पॅपिलॉन पुस्तक योजना

पॅपिलॉन पुस्तकयोजनेतील तिसरे पुस्तक

**देवाघरचा पाऊस**

**लेखक : रवींद्र पिंगे**

५ जानेवारीला प्रसिद्ध होत आहे.

समक्ष पुस्तक नेणाऱ्या सभासदांनी ५ जानेवारी ते १२ जानेवारी या मुदतीत आपली प्रत माणूस कार्यालयातून घेऊन जावी. सोबत पावती असावी.

ज्यांनी पुस्तक व्ही. पी. ने मागवले आहे त्यांना पुढील आठवड्यात व्ही. पी. केली जाईल.




Sista's-MBT-336-R/75-G-Mar

क्रीडांगण

# भारतीय क्रिकेट झिंदाबाद !

मुकुंद मणूरकर

क्रिकेट टेस्ट मॅचेस्च्या आधी पत्रकार परिषदा होतात यात विशेष असं काहीच नाही. या पत्रकारपरिषदातून विशेष असं काहीच सांगितलं जात नाही यातही विशेष काही नाही; पण परवा मात्र एक नवल घडले. अर्थात ही पत्रकार परिषद आपल्याकडील नव्हतीच.

वेस्ट इंडीज आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील पहिला कसोटी सामना सुरु होण्यापूर्वीची ही पत्रकारपरिषद. विंडीज कर्णधार क्लाइव्ह लॉइड या वेळी म्हणाला की, कालिचरण पहिल्या स्लिपमध्ये उभा राहील, दुसऱ्या स्लिपला लॉरेन्स रो उभा राहील. (डोळ्यावरील शस्त्रक्रियेनंतर त्याला आता चांगले दिसायला लागले आहे.) तिसऱ्या स्लिपमध्ये स्वत: मी राहीन, तर चौथ्या स्लिपला रिचर्ड राहील. रॉय फ्रेडरिक्स लेगस्लिप संभाळील वगैरे वगैरे. लॉइडचे हे म्हणणे तर ऑस्ट्रेलियन कर्णधार ग्रेग चॅपेलला काळजी याची की डग वॉल्टर्स जायबंदी झाल्यामुळे कव्हरला क्षेत्ररक्षणासाठी कुणाला उभं करायचं?... याचा सारांश तुमच्या लक्षात आला असेलच. वेस्ट इंडीज आणि ऑस्ट्रेलियामध्ये चर्चा होतात त्या अशा–म्हणजे क्षेत्ररक्षणाच्या जागांबद्दल !

आणि आपल्याकडे कसल्या चर्चा होतात ? अंशुमन गायकवाड सलामीला खेळणार का ? गावसकरचा पार्टनर कोण ? नवीन चेंडू कोण हाताळणार ? यष्टी कोण संभाळणार ? आणि इतकं सगळं झाल्यानंतर कॅप्टन कोण असणार? मॅनेजर कोण असणार ? शेकडो प्रश्न आणि प्रत्येक प्रश्नाची शेकडो उत्तरे !

हे काय क्रिकेट आहे ? भारतीय क्रिकेटरसिकांची क्षमा मागून म्हणतो की हे जे काय आहे ते लूत भरलेलं क्रिकेट आहे. एक वेळ सूज परवडली. 'बाळसं–बाळसं' म्हणून आम्ही नाचू !

आणि नाचलो नव्हतो काय ? मागे वेस्ट इंडीज आणि इंग्लंड यांना त्यांच्याच गल्लीत मार दिल्यावर आता भारताला विश्वविजेतेपद मिळविण्यासाठी आणखी कुणाकुणाला मारायची गरज आहे याची बोटांनी मोजदाद आम्हीच केली होती. विजेता संघ परतल्यावर त्यांच्यापुढे पायघड्या घालताना अक्षरश: मोहरून गेलो होतो आम्हीच ! मग मिरवणुका काय, सत्कार काय, भेटींचे वर्षाव काय... अगदी रेलचेल उडाली होती ! मुंबईत त्या वेळी मराठी नाटकांच्या शतकमहोत्सवी समारंभासाठी पाहुणे म्हणून अजित वाडेकर, सुनील गावसकर, एकनाथ सोळकर ही मंडळी असायची. इतकच कशाला, मध्यंतरी संघाचे तीन तेरा वाजल्यानंतरही मागील वर्षी विश्वचषक स्पर्धेच्या वेळी 'आम्ही विश्वविजेते होऊ शकलो असतो' अशी स्वप्ने रंगवली होती संघाचे व्यवस्थापक रामचंद यांनीच ना ?

कधी कधी वाटतं भारताने हे जे काही विजय मिळविले होते ते खरोखरच विजय होते का ? का 'क्रिकेट इज ए गेम ऑफ चान्स' म्हणतात त्यातलाच हा प्रकार ? ते खरेही असावं वर्षभर मरेमरेतो अभ्यास करून एखादा विद्यार्थी जेवढे मार्कस् मिळवितो तेवढेच मार्कस् दुसरा एखादा फक्त आदल्या रात्रीच अभ्यास करून 'मटके परफेक्ट बसल्यास' मिळवितो. फरक इतकाच की परीक्षा झाल्यावरही पहिल्याला त्या विषयाचं 'ज्ञान' असतं तर दुसऱ्याला पेपर टाकल्यानंतर त्या विषयाची एक ओळही धड लिहिता येत नाही ! या दुसऱ्या प्रकारच्या विद्यार्थ्यासारखे आपले ते विजय असावेत !

मागील वर्षाच्या सुरुवातीला, म्हणजे बरोबर १ जानेवारी १९७५ रोजी भारताने वेस्ट इंडीज विरुद्धचा तिसरा सामना जिंकला. त्यानंतर लगेच चौथाही जिंकला. हे दोन सुखद क्षण सोडले तर पंचाहत्तर सालच भारतीय क्रिकेट हे शब्दश: 'पंचाहत्तरीतल क्रिकेट' होतं. लिबलिबीत आणि म्हातारं या वर्षी इंग्लंडमध्ये पहिली विश्वचषकस्पर्धा झाली. तिथे आपण गेलो आणि हात दाखवून अवलक्षण केलं ! आपली छी: थू झाली. नंतर 'अनधिकृत' दर्जाचा श्रीलंकेचा क्रिकेटसंघ आपल्याकडे आला आणि त्यांनी आपल्या नाकी दम आणले. थोडक्यात अब्रू वाचली आपली! हे झाले आंतरराष्ट्रीय सामने. रणजी आणि दुलिप स्पर्धेत आनंदच होता. एका तरी सामन्यात कस दिसला का कुणाचा ? सर्व सामने अगदी रडतखडत आणि 'खेळायचं म्हणून खेळायचं' या पद्धतीने झाले. स्पर्धा अशी कुठे दिसलीच नाही. बॉबी तल्यारखान मागे एकदा म्हणाले होते की जागतिक क्रिकेटमधलं सौंदर्य लुप्त झालंय् सध्या. जागतिक क्रिकेटमधलं नसलं तरी भारतीय क्रिकेटमधलं सौंदर्य मात्र पूर्ण लयाला गेलंय !

तसं म्हटलं तर क्रिकेटचा राजस मुखडा भारतात कधी नव्हताच आणि असलाच तर राजेरजवाडे खेळायचे एवढ्याच अर्थाने असावा ! क्रिकेटच्या राजस स्वरूपात करडी शिस्त हा प्रकार अंगभूत आहे आणि आपल्याकडे तिचा पूर्ण अभाव आहे. गावसकरला धडक मारली म्हणून ऐन भरातल्या आणि भारताला 'टेरर' असलेल्या जॉन स्नोला इंग्लंडने पुढच्या सामन्यात वगळलं होतं. अंपायरला असभ्य शब्द बोलला म्हणून ऑस्ट्रेलियाचा नंबर वन फलंदाज समजल्या जाणाऱ्या आयन चॅपेलला जाहीर दम तिथल्या बोर्डाने दिला होता. आपल्या इथे मात्र बेदीने कितीही धांगडधिंगा घातला तरी त्यावर 'पडदा' टाकण्यात येतो आणि मोठ्या मानाने कर्णधारपद त्याला बहाल करण्यात येतं. मागील वर्षीही बेदीच्या अशाच एका प्रकरणा-

वर पडदा टाकला होता. आपल्या क्रि. कं. बोर्डाचे अधिकारी एकंदरीत पडदा टाकण्याची कामं करण्यात पटाईत दिसतात !

परवा एक सद्गृहस्थ आम्हाला म्हणाले, म्हणजे अतिशय प्रामाणिकपणे ते बोलले, तिरकसपणा कुठेही नव्हता—की ऑस्ट्रेलिया-वेस्टइंडिजमधील पहिले तिन्ही सामने ३॥—४ दिवसांत संपले, तेव्हा भारतावरोबरचे सामने तीन दिवसांत संपले (म्हणजे आपण तीन दिवसांत हरलो!) तर विशेष वाईट वाटायला नको ! काय बोलायचे यावर ? काहीजण तर अतिशय आध्यात्मिक पातळी-वर येतात. म्हणतात, हे एक चक्र आहे. सारखं फिरतंय. आपण सध्या चक्राच्या खालच्या आऱ्यांवर आहोत. पुन्हा वर जाऊच !

जावो, जावो आणि गेल्यावर ते चक्र वर्षभर तरी निथंच स्थिर राहो ही सदिच्छा शहात्तर सालच्या सुरुवातीला व्यक्त करण्या-शिवाय आपल्या हातात आणखी काय आहे?

¤

न्यूझिलंड—वेस्टइंडीज-दौऱ्यासाठी भारतीय संघातल्या सतराजणांची निवड जाहीर झाली. आणखी पाच खेळाडू निवडले असते म्हणजे दोन संघ तयार झाले असते आणि सर्वांचे समाधान झाले असते. कारण फक्त चार-पाच खेळाडूंच्या बाबतीतच 'यांना का घेतले नाही' म्हणून ओरड झाली. त्यांनाही घेतले असते म्हणजे प्रश्न मिटला असता. निवडसमिती ही वस्तूच अशी आहे की जिला स्तुतीची ॲलर्जी आहे तिला नेहमी शिव्याच घालायच्या असतात !

पण प्रांजलपणे बघितलं तर निवड-समितीने एखादा अपवाद सोडल्यास सर्वो-त्कृष्ट संघच निवडला आहे. यापेक्षा चांगला संघ निवडणे भारताला सध्या तरी शक्य नाही.

संघातील चार स्पिनर्स, विकेटकीपर कृष्णमूर्ती, गावसकर व विश्वनाथ यांनी वेस्टइंडीजचा दौरा पूर्वी केला होता तर पटेल, गायकवाड, मोहिंदर यांनी गेल्या वर्षी इंग्लंडमध्ये न्यूझिलंडविरुद्ध लढत दिली होती. या गोष्टी विचारात घेतल्यामुळेच की काय आपल्या बोर्डाने दौऱ्यावर जाण्यापूर्वी खेळाडूंचे एकत्र शिबिर घेण्याची आयडियाच कॅन्सल केलेली दिसतेय. हे सर्व खेळाडू मद्रासमध्ये फक्त तीन दिवस जमणार आहेत आणि हा वेळ त्यांच्या वैद्यकीय तपासणीतच बहुधा जाईल.

नुकताच क्रिकेट-हंगाम संपल्यामुळे या खेळाडूंना सरावाची आवश्यकताच कशाला पाहिजे ? आणि वेस्टइंडिजला जाण्यापूर्वी न्यूझिलंडमध्ये यांचा एकत्रित सराव होईलच की !

तर बेदी, गावसकर आणि मंडळी : शुभास्ते पंथानः !

¤

## ओळख—परेड

न्यूझिलंड-वेस्टइंडीज-दौऱ्यासाठी भारताचा संघ जाहीर झाल्यावर मुंबईच्या एका इंग्रजी पत्रात सर्व खेळाडूंची सचित्र ओळख आली होती. त्यात सुनील गावसकरची माहिती देताना हा नवीन चेंडूवर गोलंदाजीही करतो असं म्हटलं होतं. ते वाचल्यानंतर वाटलं की, ओळख-परेडसाठी त्या पत्रानं जे अर्धं पान खर्च केलंय त्याची मुळीच आवश्यकता नाही. थोडक्यात हे करता येईल: खेळाडूंचे तीन वर्ग करायचे. फलंदाज, गोलंदाज व यष्टि-रक्षक. फलंदाजांची नावे ओळीने लिहून त्यापुढे लिहायचं—'हे सर्व उत्कृष्ट फलंदाज असून नवीन चेंडूवर गोलंदाजी करतात.' मग गोलंदाजांची नावे लिहून त्यापुढे लिहायचं, 'हे सर्व उत्कृष्ट गोलंदाज असून वेळप्रसंगी पाचपन्नास धावाही करू शकतात.' यष्टिरक्षकांपुढे 'हे उत्कृष्ट यष्टिरक्षक असून आघाडीला फलंदाजी करतात' असं लिहायचं.

इतकं झाल्यावर पुढल्या पॅरेग्रॅफमध्ये सर्व खेळाडूंची नावं लिहून त्यापुढे एक ओळ लिहायची, 'हे सर्वच खेळाडू उत्कृष्ट कर्णधार सुद्धा आहेत !'

भारतीय क्रिकेट झिंदाबाद !

## साप्ताहिक भविष्य

कृष्ण माईणकर

१०।१।७६ ते १६।१।७६

### मकर—संक्रमण
### भारताच्या राजकारणाला कलाटणी

रविबदल हा भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थित्यंतराशी निगडित आहे. भारताची रास मकर व पंतप्रधानांची रासदेखील मकर. या राशीत दि. १४ ला होणारे रवीचे पदार्पण भारताचे सामर्थ्य वाढवील. तसा प्रत्यय आणून देईल. इंदिरा गांधी आजच्यापेक्षा जास्त सामर्थ्यशाली बनतील. त्या या वेळी एखादा धाडसी निर्णय घेतील व त्याचे परिणाम प्रामुख्याने काँग्रेस-पक्षाला अपरिहार्यपणे भोगावे लागतील. लोकसभेत त्या विशेष गाजतील. आर्थिक-बाबतीत भारताचे पाऊल अधिक पुढे पडेल. चीन, अमेरिका यांच्याकडून नरमाईची भाषा ऐकू येईल. पाकिस्तान भारताबरोबर मैत्रीचे नवे गीत गाऊ लागेल. विरोधी पक्षात काही मूलभूत असे नवे विचारमंथन सुरू होईल. या सर्व परिस्थितीत लोकांचा उत्साह थोडा-फार मावळण्याची शक्यता आहे. कदाचित तक्रारही निर्माण होईल. महाराष्ट्रात राज-कीय क्षितिजात अचानक बदल व वादा-वादीचे वातावरण निर्माण होऊ शकेल.

### मेष : यशाची चढती कमान

याच आठवड्यात दिनांक १४ रोजी रवी दहावा होणार आहे. हे मकरसंक्रमण आपल्या व्यावसायिक जीवनातही संक्रमण घडवून आणणार आहे. आजवर अपुरी राहिलेली स्वप्ने आणि आशाआकांक्षा सफलतेच्या तीरावर येऊ लागतील. जे आज-वर घडले नाही ते अघटित पण अनुकूल असे घडेल. नोकरीत तुमच्या कर्तृत्वाची वरिष्ठांना ओळख होऊन आजवर तुम्हाला न दिलेले लाभ या वेळी मिळतील. महत्त्वाच्या मागण्या

मान्य होतील. नोकरीसाठी या वेळी कुणाला वणवण करावी लागणार नाही. ती सहज मिळू शकेल. स्वतःचा धंदाही सुरू करू शकाल. मंगळवार तुमचा अनुकूल वार आहे. त्या दिवशी विशेष महत्त्वाचे काही तरी घडेल. आर्थिक ताण राहणार नाही. महिलांना आशाआकांक्षा सफल झाल्याचा आनंद मिळू शकेल. त्यांची जुनी परिचित माणसे भेटतील. विद्यार्थ्यांना अनेक क्षेत्रांत वाव मिळू शकेल.

## वृषभ : अडचणींची उकल होईल

विवंचना आणि काळज्या यांनी तुम्ही जरी बेजार झाला असलात तरी हा आठवडा तुम्हाला प्रकाश दाखवणार आहे. जे अडचणीचे होते ते दूर होईल. मकरसंक्रमणापासून काही नवे व तेजस्वी असे स्वतःच्या उद्योगात निर्माण करू शकाल. केतू जरी व्ययस्थानी असला तरी आर्थिक ओढाताण या आठवड्यापासून कमी तर होईलच; पण काही अचानक मार्गही सापडू शकेल. या आठवड्यात जरी स्वतंत्र धंदा सुरू करावयाचा असला तरी तो या वेळी होणार नाही. नोकरीत तरी अनिष्ट काहीच नाही; पण शक्यतो कचेरीत व कामात काटेकोर रहावे. मंगळवार व शुक्रवार महत्त्वाचे ठरावेत. चार पैसे हाती येतील. महिलांना प्रवासाचा योग आहे. नोकरीत महत्त्वाची कामगिरी करावी लागेल. विद्यार्थ्यांनी खर्चावर मर्यादा ठेवावी.

## मिथुन : तब्येत सांभाळा

वक्री मंगळाची कटकट अजूनही तुम्हाला छळणार आहे. डोक्यात वाईट विचार येणे, नैराश्य थैमान घालणे, खर्च हाताबाहेर जाणे असे काही तरी सतत घडत असते; परंतु गुरुमहाराजांची तुमच्यावर कृपा आहे. त्यामुळे या साऱ्या कटकटींतून तुम्ही बाहेर पडाल. त्यामुळे निराश न होता कुलदेवतेची उपासना करीत दैनंदिन जीवनात मार्गक्रमण करावे. यातून तुम्ही सहज पार पडू शकाल. ज्यांच्या सेवानिवृत्तीची मुदत जवळ आली आहे त्यांनी वरिष्ठांना जर आपली बाजू पटवून दिली तर त्यांना ती पटेल व त्यांना मुदतवाढ मिळेल. मानापमानाची कल्पना सोडून द्या व उद्योगाला लागा. काम वाढेल; पण कुरकुरू नका. तब्येत या आठवड्यापासून सुधारू लागेल. शक्ती व उत्साह वाढेल. मंगळवारचा उपास करा. महिलांना शारीरिक थकवा आला तरी काळजी नको. नोकरीत काम वाढेल. विद्यार्थ्यांना अनश्चित ताप सहन करावा लागेल.

## कर्क : पुढे पाऊल पडेल

कर्क व्यक्तींनी आता तक्रार करावी असे काही नाही. दि. १४ ला रवि समोर मकरराशीत येत आहे तेव्हापासून तुमचे पाऊल सर्वच क्षेत्रात प्रगतिपथावर पडणार आहे. पैसा, व्यवसाय, नोकरी, प्रवास, आरोग्य वगैरे सर्व बाबतीत तुमचे बेत पुरे होऊ लागतील. नोकरीत तुमच्यावरचा अन्याय दूर होईल किंवा तुम्हाला काही आश्वासने मिळाली असल्यास ती पुरी होतील. कारखान्यात काम करणाऱ्या लोकांसाठी काही तरी महत्त्वपूर्ण अशी घोषणा या वेळी होईल. बढती, प्रमोशन, पगारवाढ असे काही तरी मिळेल. प्रवासाचा योग या वेळी असला तरी प्रवास टाळा. सोमवार तुम्हाला लाभदायक आहे. त्या वेळी विशेष घडेल. महिलांना स्वतःचा लहानसा उद्योग सुरू करण्यास अनुकूलता आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्यास किंचित त्रास.

## सिंह : तुमची गरज भासेल

तुमचे विरोधक सध्या शिरजोर झाले आहेत. तुम्हाला साडेसाती आहे. त्यामुळे तुम्हाला काही नाही तरी जरासे सतावता आले तर ते पहावे असे विरोधक करीत आहेत. पण या आठवड्यात रवीचे मकरसंक्रमण होताच तुम्ही जिंकणार आहात! तुम्ही ह्या विरोधकांना चांगला धडा शिकवू शकाल. चालू नोकरीत जास्त काळजीपूर्वक वागा. चुका, टाळाटाळ असे काही होऊ देऊ नका. वरिष्ठांबरोबर कोणताहि भांडणाचा प्रसंग येऊ देऊ नका. बेकारांना नुसते आश्वासन मिळेल. कॉल येण्यासाठी अजून वाट पहावी लागेल. आर्थिक परिस्थिती थोडी सुधारेल. तब्येतीची काळजी नसली तरी थंडीपासून स्वतःचे संरक्षण करा. मंगळवार चांगला दिवस आहे. महिलांना सार्वजनिक कार्यात त्रास व विरोध निर्माण होईल. विद्यार्थ्यांच्या गरजा कशा तरी भागतील.

## कन्या : नोकरीत समाधान

सध्या तुम्हाला तसे वाईट ग्रहमान नाही. मंगळ वक्री असला तरी तो भाग्यस्थानी आहे त्यामुळे त्याचा काही फारसा त्रास नाही. या मकरसंक्रमणापासून रवि पाचवा होत आहे. त्या वेळेपासून तुमचे पाऊल प्रगतीकडे वळेल. तुमच्या बाबतीत नोकरीत काही तरी महत्त्वाचा अनुकूल विचार होऊ लागेल. तुमच्या मागण्यांच्या बाबतीत वरिष्ठांकडून सहानुभूतीचा दृष्टिकोण निर्माण होईल. आर्थिक परिस्थिती थोडीफार सुधारेल. स्वतःचा उद्योग तुम्ही सुरू करणार असाल तर त्याला हा आठवडा अनुकूल आहे. दुय्यम धंद्यात काही तरी प्रगतिकारक असे घडेल. शुक्रवार व मंगळवार तुम्हाला शुभकारक असतो. महिलांना संसारात अत्यंत त्रास पडणार नाही. पैशाची अडचण भासणार नाही. विद्यार्थ्यांना अभ्यासात क्रेडिट मिळेल.

## तूळ : व्यावसायिक बदल

तुमच्या सुखस्थानावर या आठवड्यात दि. १४ पासून रवीचे संक्रमण होत आहे. हे संक्रमण तुम्हाला आगामी काळाची अनुकूल अशी महत्त्वाची चाहूल घेऊन येणार आहे. व्यवसायात हे संक्रमण होणार आहे. बदल होईल तो यशस्वी प्रगतीचे नवे पर्व देऊन जाईल. चालू नोकरीत कामाच्या दृष्टीने बदल होण्याची शक्यता आहे. जे काय मिळेल ते महत्त्व वाढवणारे व जबाबदारी वाढवणारे असेल. सेवानिवृत्ती नजीक आलेल्या व्यक्तींना मुदतवाढ वा शाश्वती मिळेल. बेकारांच्यासाठी एखादा उद्योग सुरू होण्याची शक्यता आहे. गायक, नट यांना लोकप्रियता लाभून थोडेफार स्थैर्य येणार आहे. शुक्रवार व मंगळवार अतिशय शुभदिवस आहेत. काही तरी लाभदायक असे महत्त्वाचे घडेल. महिलांच्या बाबतीत नोकरी किंवा स्वतंत्र धंदा नव्याने सुरू होईल. पैसा जपून वापरावा. विद्यार्थ्यांना चैनीची आवड अनावर होईल.

## वृश्चिक : मैत्रीची सावली

दि. १४ पासून होणारे संक्रमण तिसऱ्या स्थानी होणार आहे. त्यामुळे अनुकूलतेचे एक पाऊल पुढे पडणार आहे. स्तुति ऐकायला मिळेल. व्यवसाय व राजकरण यात दुरावलेले सबंध पुन्हा जोडले जातील. नाते-

वाइकांना तुमची शक्ति पटेल व ते समंजसपणाने वागू लागतील. अनेक दिवस बिघडलेल्या संबंधात असे एखादे परिवर्तन घडून येईल. नोकरीत वरिष्ठ जागी बदली—बढती मिळू शकेल. मनात जाणून ठेवलेली महत्त्वाकांक्षा साकार होऊन जाईल. चालू नोकरीत व्याप वाढला तरी काळजी नको. हर्षल व राहू बारावे आहेत त्याकडे दुर्लक्ष करू नका. प्रामुख्याने तब्येतीला जपा व खर्चावर बंधन ठेवा. कर्ज काढण्याची पाळी येणार आहे. मंगळवारचा उपास करा. शुभ दिवस आहे. महिलांना घरखर्चात पैशाची टंचाई भासणार आहे. स्वभाव त्रासिक बनणार आहे. विद्यार्थ्यांना चळवळीत त्रास होणार आहे.

**धनु : नव्या पर्वाची सुरुवात**

सध्या रवि राशीत आहे त्याचे दि. १४ ला मकरराशीत संक्रमण होणार आहे. हे मकरसंक्रमण तुमच्या बाबतीत क्रांतिकारक ठरणार आहे. जीवनांत अनेक दिवस जे घडण्याची वाट पहात होतात ते अचानक घडून येईल. नकळत असे तुमच्यासाठी मित्रांकडून अगर उच्च राजकीय व्यक्तींकडून काही तरी केले जाईल. नोकरीत तुम्हाला सतत साशंकता वाटत असते पण प्रत्यक्षात तसे प्रतिकूल काहीच घडत नाही, हाच अनुभव या वेळी देखील येईल. चालू व्यवसायात नवे योजनाबद्ध असे निश्चय करू शकाल. चालू नोकरीत तुमच्या मागण्या कौशल्याने वरिष्ठांकडे अगर मालकाकडे मागा. यश मिळेल. प्रवासाचा अचानक योग येण्याची शक्यता आहे. स्तुति, मोठेपणा, प्रसिद्धि असे काही तरी घडू शकेल. गुरुवार शुभ आहे. नव्या कामाची सुरुवात करा. महिलांना आत्मप्रौढी मिरवण्याची हौस निर्माण होईल. कर्तबगारीला वाव मिळेल. विद्यार्थ्यांना नव्या मार्गाचा व प्रगतीचा प्रत्यय येईल.

**मकर : प्रगतीकडे वाटचाल**

या आठवड्यात दिनांक १४ पासून रवि तुमच्या चंद्रावर येत आहे तेव्हापासून तुम्ही प्रगती व यश यांच्या शिखरावर आरूढ होणार आहांत. तुमच्या ठरलेल्या योजना व ठरलेल्या कल्पना प्रत्यक्षात येण्याची ही सुरुवात ठरेल. विरोधक व स्पर्धक आता तुमच्या पुढे टिकणार नाहीत. तुमचा कोणताहि उद्योग असो त्यांत तुम्हाला जे काही करावयाचे आहे ते या वेळी तुम्ही करू शकाल. व्यापारउदीम आता अडचणीत होणार नाही. नोकरीत आतां तुम्हाला त्रास देणे कुणाला शक्य होणार नाही. तुमची बदली झाली असेल तर ती या वेळी बुधवारनंतर रद्द करून घेण्याचा प्रयत्न करा. बुधवारपर्यंत मात्र खर्चाचे मात्र सांभाळा. पैशाची गरज भासेल. महिलांना राजकारणात मोठे स्थान मिळणार आहे. नोकरीत उच्चता प्राप्त होईल. विद्यार्थ्यांना पोटापुरते काम मिळेल.

**कुंभ : थोडे कडू थोडे गोड**

या आठवड्यात रवि १४ पासून तुम्हाला त्रासच देणार आहे त्याकडे दुर्लक्ष करू नका. तुमची महत्त्वाची कामे त्याआधी पुरी करून घ्या. प्रवासाचा बेत बुधवारनंतर ठरवू नका. विशेषतः हवाईदलाने जाणाऱ्यांनी जास्त काळजी घ्यावी. नोकरीत तसे धोकादायक असे काही नाही; परंतु गाठीभेटी घेणे, वरिष्ठांकडे रदबदली करणे, तुमच्या मागण्या मागणे ह्या साऱ्या गोष्टी बुधवारपर्यंत पुऱ्या करा. नंतर लांबणीवर पडेल. राजकारणांत ज्याचा आज महत्त्वाचा क्रम आहे त्यांना बुधवारनंतरचे मकरसंक्रमण माघारीचे व त्रासाचे जाणार आहे. त्यांचे वर्चस्व विरोधामुळे कमी होऊ लागेल. नोकरीत वरिष्ठ जागी असणाऱ्यांनी आठवड्याच्या उत्तरार्धात जास्त काळजीपूर्वक वागावे. महिलांना व्यापार सुरू करण्याला हा आठवडा अनुकूल आहे. विद्यार्थ्यांचे पाऊल चढते राहील.

**मीन : सर्वसाधारण चांगला**

मीन राशीच्या लेखकांनी व पत्रकारांनी आपल्या प्रतिभेचा वारू मकरसंक्रमणानंतर थोडा काबूत ठेवणे आवश्यक होणार आहे. कारण बुधवारी रवि अकरावा होणार आहे तो बरेच मोठे धाडस करण्याचे सामर्थ्य देईल. पण ते मीन—व्यक्तींनी विचारपूर्वक वापरावे. एरवी हा आठवडा अनेक चांगल्या घटना घेऊन येणार आहे. एखादे बक्षीस, आर्थिक लाभ असे काही तरी देईल. नोकरीधंद्याची स्थिती समाधानकारक राहील. वरिष्ठांकडे तुमच्या काही मागण्या करावयाच्या असल्यास त्या त्या वेळी करा. बेकरीच्या त्रासातून तुमच्यापैकी काही भाग्यवंत लोक मुक्त होणार आहेत. सोमवार शुभकारक आहे. महिलांना भरतकाम, विणकाम, शिवणकाम अशा काही उद्योगांची सुरुवात करता येईल. विद्यार्थ्यांनी लॉटरीत भाग घ्यावा. □ □

# । स्टुडिओ चक्कर ।

**रविकिरण साने**

## मजनू नव्हे मजनून

मेहबूब स्टुडिओचे आवार. प्रवेशद्वारापासूनच फुलांचा साजशृंगार. पाहुण्यांचे स्वागतार्थ बॅन्ड. वीजकपातीमुळे जनरेटरवर विसंबून केलेली विद्युतरोषणाई. तंग भडक कपड्यातील निमंत्रित बड्या कलाकारांना पाहण्यासाठी बाहेर खच्चून गर्दी. त्यावर नियंत्रण करणारे पोलीस. या सगळ्या धामधुमीचे प्रयोजन ? अर्थातच राजेश खन्नाचा वाढदिवस आणि 'मजनून' या नव्या चित्राचा मुहूर्त.

मजनूनच्या मुहूर्ताची जाहिरातच धडाकेबंद होती. स्क्रीनची अख्खी पुरवणीच या जाहिरातीने खाऊन टाकली होती. राजकपूर, अशोककुमार, शम्मी कपूर आणि स्वतः राजेश खन्ना असे चार बडे कलाकार आणि शिवाय राखी, परवीनबाबी, डिंपल कापडिया या तीन नायिका या चित्रात आहेत. आणखी एखाद्या नायिकेची भर पडण्याचीही शक्यता आहे. पटकथालेखक राही मासूम रझा आहेत, तर गीतलेखन जान निसार अख्तार आणि स्वतः रझा करणार आहेत. छायालेखन आहे जाल मिस्त्री यांचे. खय्याम हे संगीताची बाजू संभाळणार आहेत आणि या भव्य चित्राचे दिग्दर्शन पाकीजाचे कमाल अमरोही करणार आहेत.

मुहूर्तासाठी एक टेकडीचे दृश्य उभे करण्यात आले होते. तिच्यावर आठ-दहा फूट उंचीची नीट मिठी मारता येणार नाही अशी मेणबत्ती उभी करण्यात आली होती. डिंपलने मुहूर्ताचा क्लॅप मारला आणि राजेश खन्ना टेकडी चढू लागला. टेकडीच्या उजव्या बाजूला पायथ्याशी राजकपूर सारंगी वाजवत बसला होता. काळा पायघोळ झगा घातलेला, झोकांड्या खाणारा राजेश खन्ना टेकडीवर

चढला आणि मेणबत्तीला मिठी मारता झाला. त्याबरोबर मेणबत्तीत पुतळ्यासारखी बसलेली राखी हळूहळू प्रकट झाली. टाळ्यांचा कडकडाट झाला. कॅमेरामनने ओके दिला आणि मुहूर्त संपला !

जाहिराती, मुहूर्त हे सगळे पाहून पत्रकार-मंडळीची समजूत हीच की कथा लैला मजनूवर आधारित असावी; पण अमरोही-साहेबांनी सर्वांची विकेटच काढली. ते म्हणाले, 'लैला मजनूशी या कथेचा काही संबंध नाही. मुळात चित्राचे नाव मजनू नसून मजनून असे आहे.' मजनून याचा अर्थ 'दैवी पागलपणा' असा आहे. ही कथा अगदी वेगळी आहे. कशी आहे ते मात्र अमरोहींच्या तोंडून बाहेर येईना. कशीही असो फक्त आता अमरोही काढतायत म्हणजे चित्र केव्हा बाहेर येणार एवढाच प्रश्न आहे. ※

## धरम करम

राजकपूरला प्रसिद्धीचे तंत्र जेवढे अवगत आहे तेवढे अन्य फारच थोडयांना आहे. चित्राची घोषणा झाल्यापासून तो थेट चित्र सर्वत्र झळकून परत येईपर्यंत त्याची तुफान जाहिरातबाजी चालू असते. आर. के. चा धरम करम देखील अशीच आधीपासून चिक्कार प्रसिद्धी मिळवून आहे. आर. के. चा पिक्चर कितीही वाईट निघाला तरी काही किमान चित्रमूल्ये त्यात सापडतात. त्यामुळेच एक विलक्षण आकर्षण आर. के. प्रॉडक्शन-बद्दल अजूनही टिकून आहे.

धरम करम २ जानेवारीला पुण्यात दाखल होणार म्हटल्यावर तमाम पेपरवाल्यांनी मेन फीचरसाठी हा विषय राखून ठेवायचे नक्की केले; पण २ तारखेची दुपार झाली तरी कोणालाच निमंत्रण नाही. पत्रकारांची आपापसात विचारपूस चालू झाली. 'अरे, प्रेस शो आहे का नाही ?' शेवटी अखेर ४॥ ते ५ च्या दरम्यान काही निवडक वृत्तपत्रांचे टेलिफोन खणखणले. निरोप एकच. पावणे-सहाला निलायम टॉकीजला या! रीतसर लेखी निमंत्रण-पासेस यांचा पत्ताच नाही ! पण नेहमीचे संबंध म्हणून पत्रकार निलायमवर हजर झाले; पण दारावर कोणाचाच पत्ता नाही ! १५-२० मिनिटे अशीच गेली वाट पाहाण्यात. मग एक-दोघे आतल्या ऑफिसात चक्कर टाकून आले. चौकशी केली; पण हेम्बॉल पब्लिसिटीपैकी कोणीच नाही. सव्वा सहा वाजून गेले. चित्रपटगृहात जाहिराती संपून न्यूजरील सुरू झाले होते. निमंत्रण-पत्रिकाच दिल्या नसल्याने पत्रकार बाहेर खोळंबून बसले. पावणेसातपर्यंत वाट पाहून सगळे वैतागले. बहुतेक सर्वजण चित्र-नाटय-पत्रकार संघाचे सभासद. तिथेच मग सभा भरली. अशा गोष्टींबद्दल आक्रमक भूमिका घेतली पाहिजे असे सर्वांनी प्रतिपादन केले. पत्रकारांना बोलावून अशी अपमानास्पद वागणूक देणाऱ्यांना या गोष्टीची जाणीव दिली पाहिजे. शेवटी निर्णय झाला, 'आर. के. च्या धरम करमवर बहिष्कार! त्या संदर्भात एक ओळही छापायची नाही. घडलेलं वृत्त सर्व वृत्तपत्रांच्या व्यवस्थापकांना कळवून त्यांचे सहकार्य घ्यायचे. हेम्बॉल पब्लिसिटी व महाराष्ट्राचे वितरक यांचेकडेही निषेध नोंदवायचा.' एवढे सगळे झाले आणि मंडळी निलायममधून बाहेर पडली. तेवढ्यात एक माणूस बाहेरून धावत आत शिरला. एकाला त्याने ओळखले. 'साहेब, एवढा वेळ कुठे होता? मी तुम्हाला शोधत होतो.' 'कुठे बाहेर ?' असा संवाद झडला. या माणसाला बाकी पत्रकार कोणीच ओळखत नव्हते. वरं तोही उगवला ७ नंतर. म्हणजे औरच प्रकार ! बरं एवढे सगळे होऊन दोन दिवस उलटले तरी हेम्बॉलकडून काहीच खुलासा नाही. तेव्हा मंडळी, धरम करमचे परीक्षण तूर्त स्थगित. ※

## वॉटरगेट वॉटरगेट

आपल्या त्या लांब नाकेल्या निक्सन-साहेबांची उचलबांगडी करणारे वॉटरगेट-प्रकरण आठवत असेलच. अख्खं ७४ साल त्याच गदारोळात बुडून गेले होते. अमेरिकन लोकशाहीची शोकांतिका हॉलीवूड निर्मात्यांना चित्रपटयोग्य वाटावी यात नवल नाही. नवल एवढेच आहे की एवढ्या अल्पावधी-मध्ये तो चित्रपट जवळजवळ पूर्ण झाला आहे. म्हणजे ७४ च्या नववर्षाला प्रत्यक्ष वॉटरगेटची भेट आपल्याला मिळाली आणि आता ७६ च्या प्रारंभी त्यावरचा चित्रपट प्रकाशितही होईल.

या वर्षभरात वॉटरगेटवर अमेरिकेत बरीच पुस्तके प्रसिद्ध झाली; पण बॉब वुडवर्ड आणि कार्ल बर्नस्टीन या रिपोर्टर दुकलीने लिहिलेले 'ऑल द प्रेसिडेंटस् मेन' खूप गाजले आणि एकाच वेळी दोन-चार निर्मात्यांच्या या पुस्तकावर उड्या पडल्या; पण वॉर्नर-ब्रदर्स या प्रसिद्ध कंपनीने त्यातही आघाडी मारली आणि साडेचार लक्ष डॉलर्स खर्चून चित्रीकरणाचे सर्व हक्क विकत घेतले. मात्र प्रत्यक्ष जबाबदारी त्यांनी रॉबर्ट रेड-फोर्ड आणि डस्टीन हॉफमन यांचेकडे सोपवली. या नटद्वयाने दिग्दर्शनाची जबाबदारी 'द परलक्स व्ह्यू' या गाजलेल्या चित्राचा दिग्दर्शक ॲलन पाकुला याच्या गळयात अडकवली. 'बूच कॅसिडी ॲण्ड हसनडॅन्स किड' या चित्रांचा पटकथालेखक विली गोल्डमनने वॉटरगेटची पटकथा लिहिली आहे. रॉबर्ट रेडफोर्ड ही बॉब वुडवर्डची भूमिका करतोय तर डस्टीन हाफमन (द ग्रॅज्युएट मिडनाइट काऊबॉय फेम) कार्ल बर्नस्टीनची भूमिका करतो आहे.

वॉटरगेटमधले नाटय प्रत्यक्ष दरोडा-प्रकरणात जितके भरले आहे तितकेच त्या-नंतरच्या घडामोडीत आणि निक्सनच्या ट्रायलमध्ये आहे. या सनसनाटी प्रसंगमालि-केची सुरुवात फक्त त्या दरोड्याने झाली आणि त्यानंतर निक्सनचे दबावाचे राजकारण आणि वृत्तपत्रांची त्याविरुद्ध आघाडी, ट्रायल आणि राजीनामा असे ते नाटय चढत गेले; पण हे सारे रंगवायचे तर जरा अवघडच. मग पाकुलासाहेबांनी निर्णय घेतला की हे प्रकरण डॉक्युमेंटरीच्या पद्धतीने रंगवायचे. निक्सन ट्रायलचे प्रसंग चक्क टी. व्ही. न्यूज-रीलमधून तसेच्या तसे घ्यायचे. म्हणजे निक्सन आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची कामे नटांना करायला नकोत. शिवाय वास्तव ऐतिहासिक चित्रण वगैरे साधता येईल.

वॉटरगेटवर पुन्हा एकदा दरोडा पडला तो या चित्रपटवाल्या मंडळींचा. वॉटरगेटची मूळ चोरी ज्या पहारेकऱ्याने पकडली त्याच फ्रँक विल्सने याही चोरांना पकडले. या सर्व चित्रणाचे वेळी खुद्द लेखकद्वय तर होतेच; पण ज्या वॉशिंग्टन पोस्टने वॉटरगेटला तोंड फोडले त्या वृत्तपत्राचे कर्मचारीही हजर राहून खरे काय घडले याचे मार्गदर्शन करत होते. या सबंध प्रकरणात वुडवर्ड आणि बर्न-स्टीन या जोडीची मनःस्थिती कशी होती हे समजून घेण्यासाठी त्यांची भूमिका करणारे रेडफोर्ड आणि हाफमन त्यांना हैराण करीत आहेत. हे 'ऑल द प्रेसिडेंटस् मेन' आपल्या-कडे केव्हा येताहेत पाहू या. एकूण काय ७५ साल पुन्हा एकदा निक्सनसाहेब गाजवणार ! ■ ■